16-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1



**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी</u>**

**उप सभापती** : आज सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. या सूचनेवर त्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सीमा भागातील मराठी बांधवांचा महाराष्ट्रामध्ये येण्यासाठी गेल्या 50 वर्षांपासून लढा चालू आहे. या भागातील मराठी जनता सातत्याने व सतत या कानडी अत्याचारामध्ये भरडली जात आहे. या सदनाने कर्नाटक सरकारच्या विरोधामध्ये व सीमा भागातील मराठी माणसाच्या बाजूने एकमुखाने सतत कौल दिलेला आहे. सीमा भाग महाराष्ट्रात यावा याकरिता महाराष्ट्रातील सर्व पक्ष आग्रही आहेत. अनेक वर्षे हे भिजत घोंगडे पडले असल्यामुळे शेवटी नाईलाज म्हणून योग्य की अयोग्य याचा विचार बाजूला ठेवून सर्वोच्च न्यायालयामध्ये महाराष्ट्र सरकारच्या वतीने गेलेलो आहोत. कोणतीही बाब न्यायप्रविष्ट असते त्यावेळी जैसे थे परिस्थिती चालू ठेवण्याची सरकारची भूमिका असणे आवश्यक आहे. परंतु कर्नाटक सरकार तेथील सीमा भागातील महाराष्ट्रातील मराठी बांधवांवर प्रचंड जुलमी अत्याचार करीत आहे. मला त्याचा खेद एवढयासाठी वाटतो की, प्रत्येक वेळी विधिमंडळात आम्ही आवाज उठवितो आणि सरकारकडून त्याला मम म्हटले जाते. पण सरकार स्वत:हून कर्नाटक सरकारला तुम्ही हे कराल तर याद राखा असे म्हणत नाही. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेद्वारे सुध्दा कर्नाटक सरकारवर दबाव निर्माण होत नाही. याचा परिणाम असा झाला आहे की, कर्नाटक सरकारमधील राज्यकर्ते सवकले आहेत, मुजोर झालेले आहेत. मराठी बांधवांच्या दैनंदिन जीवनावर, त्यांच्या अस्तित्वावर, त्यांच्या राहणीमानावर कानडी अत्याचाराचा वरवंटा रोज फिरविला जातो.

1 नोव्हेंबर हा दिवस वर्षानुवर्षे एकीकरण समितीच्या वतीने काळा दिवस म्हणून पाळण्यात येतो. बेळगावमधील मराठी भाषिकांनी निवडून दिलेल्या महापालिकेतील महापौर व उपमहापौर हे या दिवशी निषेधामध्ये सामील झाले होते. या कारणास्तव लोकशाही पध्दतीने निवडून आलेल्या महानगरपालिकेला, बहुमत असलेल्या महानगरपालिकेला कर्नाटक

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सरकारने बरखास्त करण्याचे पाऊल उचलले आहे. हे अत्यंत निषेधार्ह आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या भावना अत्यंत ज्वलंत व तीव्र आहेत. घटनेचा निषेध करण्यासाठी आज कोल्हापूर व सांगली बंद आहे. म्हणून माझी या आपल्याला विनंती आहे की, सभागृहात कोणतेही काम करु नये. आज आम्ही सभागृहात कोणतेही कामकाज करण्याच्या मन:स्थितीमध्ये नाही. कारण सतत व सातत्याने अन्याय करणारे कर्नाटक सरकार तातडीने बरखास्त झाले पाहिजे अशा प्रकारचा प्रस्ताव आज विधिमंडळामध्ये सरकारच्यावतीने मांडण्यात आला पाहिजे. याबाबत तीव्र भावना व्यक्त केली पाहिजे. म्हणून कोणतेही कामकाज न करता या विषयावर तातडीने चर्चा सुरु करावी अशी मी विनंती करतो. या प्रस्तावावर रितसर चर्चा सुरु होईल त्यावेळी आम्ही आमच्या भावना सविस्तरपणे मांडू. लोकशाहीची पायमल्ली करणारे कर्नाटक सरकार तातडीने बरखास्त करावे असा प्रस्ताव शासनाने आणावा अन्यथा शासनाला सुध्दा येथे आज कोणतेही कामकाज करु देणार नाही, ही आमची भूमिका आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य व गट नेते श्री.दिवाकर रावते यांनी आज अत्यंत महत्वाच्या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्याच्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

या देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाली आहेत. स्वातंत्र्याची फळे आपण सर्वजण चाखत आहोत. पण बेळगाव, कारवार, निपाणीसह सर्व मराठी बांधव आज देखील पारतंत्र्यात दिवस काढत आहेत. गेल्या सतत 50 वर्षापासूनचा लढा आजही चालू आहे. सर्वोच्च न्यायालयामध्ये गेली 10 वर्षे आपण लढत आहोत. या राज्याच्या तत्कालीन माननीय गृह मंत्र्यांनी महाराष्ट्राच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात ॲफिडेव्हिट सादर केलेले आहे. मी नोटीस न दिल्यामुळे त्यांचे नाव घेणार नाही. म्हणून मराठी बांधवांना कानडी अत्याचाराला तोंड द्यावे लागत आहे. ते आपल्याला असे सांगत आहेत की, आम्ही तुमची भावंडे आहोत, मराठी आहोत. त्या भागात सक्तीने कानडी भाषा लादली जाते. कानडी गुंडांकडून तेथील महापौरांना बोलावून त्यांच्या तोंडाला काळे फासण्याचे काम केले जाते. तेथील मराठी भाषेतील बोर्ड खोडले जातात. तरुण मुलांवर केसेस नोंदवून त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त केले जात आहे. मग आम्ही नेमके हिंदुस्थानामध्ये आहोत की



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.रामदास कदम....

पाकिस्तानमध्ये आहोत अशा कैचीमध्ये सापडलेल्या मराठी बांधवांना न्याय कधी मिळणार आहे, महाराष्ट्राचे सरकार त्या मराठी बांधवांसाठी नेमके काय करणार आहे ? हा विषय उपस्थित केल्याशिवाय आपले एकही अधिवेशन पार पडत नाही.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये बेळगाव सीमा भागाचा मुद्दा शेवटी नमूद केलेला असतो. यावेळी अपवाद म्हणून तो मुद्दा वगळण्यात आला आहे. मी खालच्या सभागृहामध्ये व याही सभागृहामध्ये अनेक वेळेला हा विषय उपस्थित केलेला आहे. म्हणून या विषयाचा एकदा शेवट होणे आवश्यक आहे. कर्नाटक सरकारने बेळगाव महानगरपालिका बरखास्त करण्याचे काम केलेले आहे. मराठी बांधवांवर तेथे अन्याय होत असताना महाराष्ट्राचे सरकार हातावर हात ठेवून गप्प बसणार आहे का ? मी या निमित्ताने एक इशारा देऊ इच्छितो. कर्नाटकमध्ये मराठी माणसांवर अन्याय होत आहे. महाराष्ट्रातही कानडी माणसे आहेत. हे त्यांनी लक्षात ठेवावे. कर्नाटक सरकारने आम्हाला अनपेक्षित असलेली पावले उचलण्यास भाग पाडू नये. आमची इच्छा नाही. परंतु मराठी माणसांना अपमानास्पद वागणूक मिळत असेल तर तुमचे कानडी भाषिक या राज्यात आहेत हे त्यांनी लक्षात ठेवावे. या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी दिल्लीला माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत केंद्रीय गृह मंत्री श्री.चिदंबरम यांच्याकडे शिष्टमंडळ गेले होते. त्यावेळी त्यांनी आम्हाला जी वागणूक दिली, ते जे बोलले ते मी येथे बोलू शकणार नाही. त्यांनी असे म्हटले होते की, ते लोक पाकिस्तानमध्ये आहेत काय ? आज सातारा, सांगली व कोल्हापूर ही शहरे बंद आहेत. असे असताना या विधिमंडळात आपण इतर विषयांवर चर्चा करीत बसावयाचे का ? या सदनाचे कामकाज तहकूब करावे, सन्माननीय मुख्यमंत्री व सन्माननीय उप मुख्यंत्री व या सदनाचे नेते यांना बोलवावे अशी विनंती करतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे एकमताने ठराव पास झाला पाहिजे. कर्नाटक सरकार बरखास्त करण्याचा निर्णय करण्यात यावा. जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होत नाही तोपर्यंत बेळगाव, निपाणी हा सर्व भाग केंद्रशासित व्हावा अशी या ठिकाणी मागणी करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

नंतर श्री.गिते......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि डॉ.दीपक सावंत यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने काही सन्माननीय सदस्यांना थोडक्यात भूमिका मांडण्यासाठी मी परवानगी देत आहे. परंतु या प्रस्तावाच्या सूचनेवर चर्चा करावयाची की नाही यासंबंधीचा जोपर्यंत निर्णय होत नाही, त्या अगोदरच सर्व सन्माननीय सदस्य आधीच आपली भूमिका मांडावयास लागले तर ते कसे काय चालेल ? या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे हे जाणून घेण्यासाठी मी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना या सभागृहात उपस्थित राहण्यासंबंधीचा निरोप पाठविलेला आहे. ते येईपर्यंत एक-दोन सदस्यांनी या प्रस्तावाच्या सूचनेच्या बाबतीत आपले मत मांडावे. आता मी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना बोलण्याची परवानगी देत आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आपल्या शेजारच्या कर्नाटक राज्यातील सीमा भागामध्ये बहुतांशी मराठीच असलेल्या माणसांच्या शहरामध्ये एक जुलमी राजवट सुरु आहे. लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या महापालिकेतील महापौर आणि उप महापौर पदावर मराठी भाषिक व्यक्ती असल्यामुळे मराठी संस्कृती जपण्यासाठी त्या प्रदेशावर आपलाच हक्क आहे असे अभिमानाने सांगणारी मंडळी आहेत. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील मराठी भाषिकांवर कर्नाटक सरकारकडून होत असलेला अन्याय आणि अत्याचार या संदर्भात सदनशीर मार्गाने निषेध नोंदवित असताना तसेच कोणत्याही प्रकारे कायद्याचे उल्लंघन केलेले नसताना अतिशय चांगला कारभार करीत असताना, ज्या गावातील बहुसंख्य लोकसंख्या मराठी बांधवांची आहे, ज्या गावातील बाजारातील दुकानांवरील 90 टक्के बोर्ड मराठी भाषिक आहेत. तेथील मराठी भाषिकांच्या सांस्कृतिक गळचेपीसाठी जर कोणी दडपशाहीने, दंडेलशाहीने त्यांना लोकशाहीने दिलेला हक्क आणि अधिकार हिरावून घेत असेल तर ती अत्यंत निषेधार्ह गोष्ट आहे. आज आपण महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील मराठी बांधवांच्या मागे उभे राहिलो नाही तर त्यांना सुध्दा असे वाटेल की, आम्ही गेली 50 वर्षे झगडतो आहोत, त्याचे मोल आपल्या मराठी माणसांना वाटते किंवा नाही?

महोदय, बेळगांव-कारवार भागातील मराठी बांधवांनी कर्नाटकात कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य केलेले नाही. कोणत्याही प्रकारचा कायदेभंग केलेला नाही. सनदशीर मार्गाने, लोकशाही मार्गाने आपल्या न्याय हक्कासाठी ते लढा देत आहेत. सभागृहातील सर्व सदस्यांचे नैतिक कर्तव्य असे आहे की, बेळगांव-कारवार भागातील मराठी भाषिकांच्या लढयासाठी त्यांच्या समवेत समर्थपणे उतरले पाहिजे. त्यांच्यासोबत नेहमी राहिले पाहिजे. अशा पध्दतीने अन्यायकारक निर्णय होणार असतील तर त्या सरकारचा केवळ निषेध करुन चालणार नाही तर एक पाऊल पुढे जाऊन आपण एकमताने तेथील सरकार बरखास्तीची मागणी केली पाहिजे. या मागणीचे आम्ही सगळे सदस्य समर्थन करत आहोत. या ठिकाणी केलेल्या मागणीप्रमाणे कार्यवाही व्हावी, अशी मी राज्य सरकारला विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

----------

3..



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री. खंदारे 11:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि डॉ.दीपक सावंत यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे, त्या सूचनेस पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, आपण बेळगांव-कारवार भागातील मराठी भाषिकांच्या प्रश्नाच्या बाबतीत गेल्या अधिवेशनामध्ये बरीच चर्चा केली. या प्रश्नातील तिढा सुटावा म्हणून एक सर्वपक्षीय शिष्टमंडळ दिल्ली येथे माननीय पंतप्रधानांना भेटावयास गेले. मी देखील त्या शिष्टमंडळात होतो. त्या शिष्टमंडळाने बेळगांव-कारवार इतर मराठी भाषिक असलेला सीमा भाग आहे तो केंद्र शासित करावा अशी मागणी केली. कर्नाटकातील जनतेची जी भूमिका आहे, त्या राज्यात कोणाचेही सरकार आले तरी कर्नाटकची जनता मराठी भाषिकांच्या प्रश्नाच्या बाबतीत विरोधकाची भूमिका घेत असते. महाराष्ट्र शासनाकडून तशी भूमिका घेतली जात नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांवर कानडी माणसांकडून अत्याचार केला जातो, त्यावेळी आपण या सभागृहात निषेधाचा ठराव करतो. या ठिकाणी त्यांच्या बाबतीत सहानुभूती दाखवितो. परंतु त्यांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची कृती मात्र करीत नाही. बेळगांवची महापालिका बरखास्त केलेली आहे. त्याबाबतीत राज्य शासनाकडून निषेध करुन चालणार नाही. सीमा भागातील मराठी भाषिकांच्या जनतेच्या रक्षणासाठी महाराष्ट्रातील 11 कोटी जनता त्यांच्या पाठिशी आहे, अशी परिस्थिती केंद्र सरकारला दिसली पाहिजे म्हणून या सभागृहाचे सन्माननीय नेते श्री.अजित पवार यांनी या सभागृहात महाराष्ट्र शासनाची भूमिका स्पष्ट करावी अशा प्रकारची मागणी करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

----------

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सभागृहाचे सदस्य श्री.दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्या सूचनेचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाचा प्रश्न हा आजचा नाही. गेल्या पन्नास वर्षापासून सीमावादाचा लढा कर्नाटकात सुरु आहे. देशाने भाषावार प्रांतरचना मान्य केली आहे. कर्नाटकाच्या सीमेलगत राहणारा मराठी माणूस, मराठी भाषा बोलणारा मराठी माणूस प्रांतरचना होत असताना दुर्देवाने कर्नाटक राज्यात राहिला आणि तेव्हापासून तेथील मराठी माणसांवर सतत अन्याय आणि अत्याचार होत आहेत. नुसती बेळगाव महानगरपालिका बरखास्त करणे हे आज जरी घडले असले तरी यापूर्वी सुध्दा प्रचंड असे अन्याय, अत्याचार तेथील मराठी माणसांवर झाले आहेत व होत आहेत. ज्या ज्या वेळी अशा घटना घडतात, त्या त्या वेळी आपण महाराष्ट्राच्या विधानसभेत ठराव करतो आणि ते ठराव केंद्र शासनाकडे पाठवितो. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी जे सांगितले ते खरे आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावर तोडगा निघावा म्हणून महाराष्ट्रातून एक शिष्टमंडळ माननीय पंतप्रधान यांना भेटण्यासाठी दिल्ली येथे गेले होते. त्या शिष्टमंडळात आम्ही होतो. त्या शिष्टमंडळाने एकमुखी मागणी करुन सुध्दा केंद्र सरकारकडून आम्हाला सुप्रीम कोटाचे कारण सांगितले गेले. अशा प्रकारची कारणे सांगितल्यामुळे हा प्रश्न तसाच लोंबकळत पडला आहे. लोकशाहीमध्ये लोकांनी निवडून दिलेली जी सत्ता असते, जे सरकार असते, ते बरखास्त करण्याचे अधिकार कोणत्याही राज्य सरकारला नसतात. कोणत्याही प्रकारचे कारण न देता कर्नाटक सरकारने बेळगांव महानगरपालिका बरखास्त केली. बेळगाव महानगरपालिकेत मराठी माणूस महापौर म्हणून कार्यरत आहे आणि तो मराठी माणूस कानडी लोकांना चालत नाही. म्हणून ती महानगरपालिका बरखास्त करणे ही बाब निश्चितच अन्यायकारक आहे. तसेच ही बाब लोकशाहीला मारक आहे..

महोदय, महाराष्ट्र पुरोगामी राज्य आहे, महाराष्ट्रामध्ये देशातील सर्व प्रांताचे लोक येऊन राहतात. ते आपली उपजीविका करतात. वेगवेगळया प्रकारचे व्यवसाय करतात, आपले पोट भरतात. परंतु महाराष्ट्रातील जनतेने कोणावरही अशा प्रकारचा अन्याय, अत्याचार केलेला नाही.

5...



श्री.पांडुरंग फुंडकर...

परंतु आमचा मराठी माणूस जो कर्नाटकाच्या सीमेलगत राहतो, त्याच्यावर अशा प्रकारचा अन्याय, अत्याचार होत असेल तर ती बाब निषेधार्ह आहे. त्या गोष्टीचा निषेध व्यक्त केलाच पाहिजे. या

ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना सांगू इच्छितो की, केंद्रात आणि महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षाचे सरकार आहे. यापूर्वी कर्नाटक राज्यात कॉंग्रेस पक्षाचे सरकार होते. मला वाटते की, या दोन्ही सरकारांनी एकत्र बसून हा तिढा सोडविला असता तर हा सीमा प्रश्न वारंवार उपस्थित करण्याची आपल्याला गरज पडली नसती. परंतु जाणीवपूर्वक हा प्रश्न लोंबकळत ठेवला गेला. सरकारे येतील सरकारे जातील. आज कर्नाटकात भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे. उद्या तेथे तुमचे सरकार येईल. उद्या तुमचे सरकार असताना जर अशा प्रकारचा अन्याय, अत्याचार झाला तेथील सरकार बरखास्त करण्याची हिंमत तुम्ही दाखविणार आहात काय ?

महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे, त्याचे मी समर्थन करतो आहे. मी त्या प्रस्तावाच्या सूचनेला विरोध केलेला नाही. लोकशाही प्रक्रियेमध्ये अशा प्रकारचे अन्याय,अत्याचार होत असतील तर त्याची केंद्र सरकारने गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी येऊन महाराष्ट्र सरकारची भूमिका स्पष्ट करावी. बेळगांव-कारवार भागातील मराठी माणसाला दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र सरकारची काय भूमिका आहे हे प्रथम या सभागृहात स्पष्ट करावे.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/ पूर्वी श्री.गिते... 11:20

श्री.पांडुरंग फुंडकर.......

त्याकरिता आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन या विषयावर चर्चा घडवून आणावी आणि त्या चर्चेनंतर सरकारने आपली भूमिका मांडावी अशी मी विनंती करतो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. बेळगाव-कारवार सीमा भागातील मराठी बांधवांची जी गळचेपी सुरु आहे, त्यांच्यावर जो अन्याय केला जात आहे त्याचा निषेध करण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे. कारण माझे आजोळ कारवारमध्ये आहे. आपल्या सत्तेचा दुरुपयोग करुन तेथील राज्य सरकारने चुकीचे पाऊल उचलले आहे. लोकशाही मार्गाने महापौर आणि उप महापौरपदी निवडून आलेल्या व्यक्ती केवळ मराठी भाषिक आहेत म्हणून बेळगाव येथील महापालिका बरखास्त करण्यात आली, यापेक्षा दुसरे मोठे दु:ख नाही.

(सभागृहामध्ये अनेक माननीय सदस्य आपले विचार मांडण्यासाठी अनुमती मागतात)

**उप सभापती** : या विषयावर शासनाच्या वतीने उत्तर देण्यासाठी मंत्री महोदय उभे आहेत. नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवर आपले म्हणणे मांडण्यासाठी माननीय सभापती सूचना देणाऱ्या माननीय सदस्यांना निश्चित अनुमती देतात. परंतु मी फ्लेक्झिबल भूमिका घेऊन अनेक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली. याचा अर्थ या विषयावर सभागृहात चर्चा सुरु झाली आहे असा समज करुन घेतला असेल तर ते चुकीचे आहे.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व डॉ.दीपक सावंत यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्या अनुषंगाने हा विषय सभागृहापुढे उपस्थित झाला आहे.

सभापती महोदय, एक अत्यंत दुर्दैवी घटना काल कर्नाटक राज्यात घडली आहे. खरे म्हणजे कर्नाटक राज्य सरकारने बेळगाव महापालिका बरखास्त करणे हा लोकशाहीचा खून आहे असे म्हटले पाहिजे. या घटनेबद्दल सरकारच्या वतीने आणि सभागृहाच्या वतीने आपण सर्वांनी मिळून निषेध करावा अशा प्रकारची मी भूमिका मांडतो. एक गोष्ट खरी आहे की, सीमा भागातील मराठी भाषिकांचा लढा गेली अनेक वर्षे त्या परिसरात सातत्याने सुरु आहे. असे असताना महापौर आणि उप महापौर पदावर आरुढ झालेल्या व्यक्ती केवळ मराठी भाषिक आहेत म्हणून त्यांच्यावर गंडांतर येत असेल तर या सभागृहाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र हा बेळगावातील मराठी भाषिक बांधवांच्या मागे उभा आहे अशा प्रकारची भूमिका घेणे आवश्यक आहे. सर्वप्रथम निषेधाचा ठराव सर्वांनी एकमताने संमत करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या राज्यातील मराठी भाषिकांच्या माध्यमातून महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागात राहणाऱ्या मराठी भाषिकांना पाठिंबा देण्याचा निर्णय होणे आवश्यक आहे. हा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. या पूर्वीच्या काळात दोन्ही सभागृहांनी एकमताने अनेकदा ठराव संमत केलेले आहेत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वादाचा विषय हा शेवटचा मुद्दा असतो. मी गेली आठ वर्षे राज्याचा संसदीय कार्यमंत्री या नात्याने माननीय राज्यपालांचे अभिभाषण तयार करण्यामध्ये सहभागी झालेलो आहे. अभिभाषणामध्ये ज्यावेळी हा मुद्दा समाविष्ट होतो त्यावेळी अभिभाषण पूर्ण झाले असे समजले जायचे. हा प्रश्न जरी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असला तरी पुन्हा एकदा राज्याचे प्रमुख आणि माननीय विरोधी पक्षनेते, गटनेते या सर्वांनी मिळून या सभागृहाची आणि राज्याची या प्रश्नाबाबत भूमिका मांडण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सरकारचा दृष्टीकोन सकारात्मक आहे. या माध्यमातून निषेधाचा ठराव संमत करावा. शासनाच्या वतीने पूर्णपणे सहमती आहे.

सभापती महोदय, आपण आपल्या दालनामध्ये एक बैठक आयोजित करावी. त्या बैठकीला माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते व सर्व गटनेते यांना पाचारण

..4..

श्री.हर्षवर्धन पाटील.........
करावे आणि त्या बैठकीमध्ये ठरावाचा ड्राफ्ट तयार करण्यात यावा आणि त्यानुसार ठराव संमत करुन त्या ठरावाची प्रत कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्र्यांना व देशाच्या पंतप्रधानांना पाठविण्यात यावी. अशा प्रकारचे कृत्य सीमा भागात घडत असेल तर मराठी भाषिक असा अन्याय खपवून घेणार नाहीत अशी स्पष्ट भूमिका या माध्यमातून घेण्याची आवश्यकता आहे. आज बेळगाव शहराची महापालिका बरखास्त केली. उद्या त्या भागातील सगळ्या मराठी बांधवांना तुम्ही आपल्या राज्यात निघून जा अशी भूमिका त्या राज्याने घेतली तर ते योग्य होणार नाही. मध्यंतरी राज्य शासनाने कॅबिनेटमध्ये निर्णय घेऊन त्या भागात अनुदानित मराठी शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला. सीमा भागातील मराठी भाषिकांवर अन्याय होता कामा नये म्हणून सभागृहाने एक विचाराने या प्रश्नावर एकमत दाखवून घडलेल्या घटनेचा निषेध करणे आवश्यक आहे. याकरिता आपण आपल्या दालनामध्ये बैठक घ्यावी. त्या बैठकीला माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते व सर्व गटनेते यांना बोलवावे आणि त्या बैठकीमध्ये ठरावाचा ड्राफ्ट तयार करुन तो ठराव सभागृहाने एकमताने मंजूर करावा. त्या ठरावाची प्रत कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्र्यांना व देशाच्या पंतप्रधानांना पाठविणे आवश्यक आहे. या संदर्भात राज्य शासनाची भूमिका सुस्पष्ट आहे. या प्रश्नामध्ये राजकारण आणण्याचे काही कारण नाही. राज्याचे मुख्यमंत्री कोणत्या पक्षाचे आहेत, सरकार कोणत्या पक्षाचे आहे हा प्रश्न महत्वाचा नाही. सीमा भागातील मराठी भाषिकांवर अन्याय होता कामा नये. त्यांच्या पाठीमागे आपण खंबीरपणे उभे राहणे ही राज्याची जबाबदारी आहे. या संदर्भातील ठराव सभागृहाने संमत करावा आणि सगळ्यांनी टाळ्यांच्या गजरात ठरावाला पाठिंबा द्यावा.

**उप सभापती** : माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी सुचविल्याप्रमाणे दुपारी 1.00 वाजता बैठक आयोजित केली जाईल. या बैठकीला माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते व सर्व गटनेते यांना पाचारण करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या घटनेचा निषेध म्हणून सभागृहाची बैठक काही काळासाठी तहकूब करावी.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी निषेधाचा ठराव मांडण्याचे आश्वासन दिले, त्या संदर्भात दुपारी 1.00 वाजता बैठक आयोजित केली जाईल. या बैठकीला माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते व सर्व गटनेते यांना पाचारण करण्यात येईल. मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे. सभागृहाची बैठक सकाळी 11.40 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.27 ते 11.40 पर्यंत स्थगित झाली.)

-----

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, बेळगांव महापालिका बरखास्तीसंबंधी सभागृहात नुकताच ठराव केला आणि सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी तहकूब केले तसेच शासनाच्या वतीने ज्या भावना व्यक्त झालेल्या आहेत त्याचा विचार करता सभागृहात आता तातडीने माननीय मुख्यमंत्री किंवा उप मुख्यमंत्री यांना बोलावून शासनाच्या वतीने ठराव मांडावा व त्यावर चर्चा करावी अशी आमची विनंती आहे. मराठी माणसाची गळचेपी होण्यापेक्षा समागृहाचे कामकाज महत्वाचे आहे असे मला वाटत नाही. आपण मराठी माणसाबद्दल तीव्र भावना व्यक्त करण्यासाठी असमर्थ ठरतो असाच त्याचा अर्थ होईल. म्हणून सभागृहासमोर आता कोणतेही कामकाज न घेता यासंबंधीचा ठराव मांडून त्यावर चर्चा करावी, अन्यथा केवळ ढोंगीपणाने मराठी माणसाबद्दल बोलू नये. मी पुन्हा विनंती करतो की, माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांना तातडीने सभागृहात बोलावून ठराव मांडण्यास सांगावे व त्या ठरावावर सभागृहात एकमुखी चर्चा व्हावी यासाठी सभागृहाचे पुढील कामकाज घेऊ नये.

श्री. नारायण राणे : महोदय, सन्माननीय गट नेते श्री. दिवाकर रावते यांनी जो प्रस्ताव येथे मांडला आहे तो योग्य आहे असे मला वाटते. कारण बेळगांव महापालिकेच्या बरखास्तीची जी घटना घडलेली आहे ती एक प्रकारे मराठी माणसाच्या अस्मितेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर येण्याची घटना आहे. या भागात मराठी माणसाचा जो छळ चालू आहे किंवा कर्नाटक सरकार या मराठी भागाबद्दल ज्या भावना व्यक्त करीत आहे त्याचा निषेध आपण सर्वांनीच केला पाहिजे. त्यासाठी शासनाच्या वतीने तसा प्रस्ताव मांडला जावा. माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री जेव्हा सभागृहात येतील आणि प्रस्ताव मांडतील तेव्हा त्यावर चर्चा होईल. चर्चेनंतर तो ठराव पास होईल. पण माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात येईपर्यंत सभागृह तहकूब न करता प्रश्नोत्तराचा तास सुरु करावा, अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : मघाशीच आपण बैठकीची वेळ ठरविलेली आहे........

डॉ. दीपक सावंत : सभागृहाचे कामकाज चालू ठेवून त्या निषेधाचे गांभीर्य निघून जाईल म्हणून आताच यासंबंधीचा ठराव मांडून त्यावर चर्चा करणे श्रेयस्कर ठरेल.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना मला विचारावयाचे आहे की, आपल्याला ठराव महत्वाचा वाटतो की सभागृहाची बैठक स्थगित करणे महत्वाचे वाटते ?

श्री. दिवाकर रावते : महोदय, या सभागृहात या घटनेसंबंधी ज्या तीव्र भावना आहेत त्या तातडीने व्यक्त होणे महत्वाचे आहे. त्या भावनांपेक्षा कामकाज महत्वाचे नाही असे मला वाटते.

श्री. नारायण राणे : महोदय, सभागृहासमोर असलेले कामकाज सुध्दा महत्वाचे आहे. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री आता सभागृहात उपस्थित नाहीत, तसेच हा ठराव तयार होण्यास वेळ लागणारच आहे. ठराव तयार होऊन तो सभागृहात मांडला जाईल तेव्हा त्यावर चर्चा होईल. माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात ज्या क्षणाला येतील त्याच क्षणाला हा प्रस्ताव मांडून त्यावर चर्चा करावी, त्याला आमची हरकत नाही. पण आता सभागृहाची बैठक स्थगित न करता पुढील कामकाज सुरु करावे अशी आमची विनंती आहे.

डॉ. दीपक सावंत : महोदय, माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री सभागृहात येतील तोपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित करावी, अन्यथा या विषयाचे गांभीर्य राहणार नाही.

**उप सभापती** : हा विषय अत्यंत सार्वजनिक स्वरुपाचा आहे, ज्याप्रमाणे यासंबंधी आपल्या भावना तीव्र आहेत तशाच भावना संपूर्ण राज्याच्या दृष्टीने सुध्दा तीव्र स्वरुपाच्याच व्यक्त झालेल्या आहेत. पण याचा अर्थ असा नाही की, जो मधला वेळ आपल्याकडे उपलब्ध आहे तोपर्यंत सभागृह स्थगित करावे. दरम्यानच्या काळात कामकाज केले तर ते जास्त उपयुक्त होईल. म्हणून माझी पुन्हा एकदा विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांना आपणच ठरविल्यानुसार 1.00 वाजता बोलावून प्रस्ताव मांडण्याची विनंती करण्यात येईल, तोपर्यंत आपण पुढील कामकाज विचारात घेऊ, सन्माननीय सदस्यांनी कृपया मला सहकार्य करावे.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात )

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या 5 व्या आयोगाच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर होणेबाबत**

**(1) *21949 श्री.विक्रम काळे श्री.वसंतराव खोटरे, प्रा.दिलीपराव सोनवणे, श्री.सतीश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.रामनाथ मोते, श्री. एस. क्यू. ज़मा, श्री.चरणसिंग सप्रा, तारांकित प्रश्न क्रमांक 17932 ला दिनांक 4 ऑगस्ट, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना दिनांक 1 मार्च, 2000 ऐवजी दिनांक 1 जानेवारी, 1996 पासून सुधारित वेतनश्रेणी 5 व्या वेतनाचा आयोगानुसार लागू करण्यासंबंधी सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली आहे त्यामध्ये दिलेल्या आश्वासनानुसार उपरोक्त प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर मान्यतेसाठी ठेवण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रस्तावास वित्त विभागाने संमती दिली आहे काय,

(3) असल्यास, त्याबाबतच्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(4) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान श्री.राजेंद्र दर्डा यांचेकरिता** : (1), (2), (3) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विक्रम काळे : महोदय, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या 5 व्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील तफावत दूर करण्याबाबतचा प्रश्न सभागृहात किमान 29 वेळा उपस्थित करण्यात आलेला आहे. शासनाच्या वतीने नेहमी "ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे व याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल" अशा प्रकारचे उत्तर वारंवार दिले जाते. गेल्या अधिवेशनात सुध्दा शासनातील एक ज्येष्ठ मंत्री महोदय श्री. नारायण राणे साहेब यांनी सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन या प्रश्नाच्या बाबतीत हस्तक्षेप केला होता. त्यावेळेस त्यांनी सांगितले होते की, "कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांवर जो अन्याय झालेला आहे त्यासंबंधीचा निर्णय लवकरात लवकर घेण्यासाठी शासन तरतूद करील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो," असे उत्तर दिले होते. त्यानंतर माननीय सभापतींनी स्वत: यामध्ये हस्तक्षेप करुन शासनाला निदेश दिले होते की, या विषयाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांनी पुढाकार घ्यावा व शालेय

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 21949...... श्री. विक्रम काळे ......

शिक्षण मंत्री, राज्यमंत्री, वित्त मंत्री या सर्वांनी एकत्रितपणे चर्चा करण्यासाठी बसवावे. ही बाब माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा गांभीर्याने घ्यावी. या राज्यातील 45 हजार कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. तसेच शासनाची आर्थिक बाजू विचारात घेता राज्यातील सर्व मोठ्या संघटनांनी दोन पावले मागे घेतली व सहकार्य करण्याची भूमिका घेतली. त्यांनी असेही लेखी लिहून दिले व तशी चर्चा मंत्र्यांबरोबर झालेल्या बैठकीत सुध्दा केली की, शासनाच्या आर्थिक बाजूचा विचार करता आम्हाला मागील थकबाकी काहीही देऊ नका पण केवळ काल्पनिक वेतनवाढ द्यावी अशी स्पष्ट भूमिका आहे. अशा प्रकारे सकारात्मक भूमिका शिक्षक घेत असतील तर शासनाने सुध्दा सकारात्मक भूमिका घेतली पाहिजे. म्हणून माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतचा निर्णय घेऊन शासन निर्णय निर्गमित करण्याची भूमिका शासन घेणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत वेगवेगळ्या स्तरावर अनेक बैठका झालेल्या आहेत. त्यातून अनेक उपाययोजना सुध्दा समोर आल्या. यामध्ये ज्याप्रमाणे शासनाची आर्थिक बाजू आहे तशाच लायब्लिटीसारख्या अन्य बाजू सुध्दा याला आहेत. त्या सर्व बाबींचा अभ्यास करुन वित्त विभागाला प्रस्ताव पाठविलेला आहे. यासंदर्भात मुख्य सचिवांमार्फत मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही केली जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :21949...

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, सभागृहात हा प्रश्न जवळ जवळ 29 वेळा उपस्थित करण्यात आलेला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांबरोबर दोन वेळा चर्चा देखील झालेली आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांच्या दालनात दिनांक 30 ऑगस्ट, 2011 रोजी बैठक झाली होती व त्या बैठकीमध्ये संघटनेचे पदाधिकारी तसेच प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत मंत्री महोदयांनी सांगितले होते की, या प्रस्तावाच्या संदर्भात माननीय मुख्य सचिवांशी चर्चा करुन हा प्रस्ताव तातडीने मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येईल व त्यावर लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल. हा प्रश्न जेव्हा जेव्हा या सभागृहात उपस्थित करण्यात आला, त्या प्रत्येक वेळी एकच छापील उत्तर देण्यात आले व आजच्या प्रश्नालाही तेच उत्तर देण्यात आले आहे. या विषयाच्या संदर्भात संघटनेच्या पदाधिका-यांनी तसेच प्रतिनिधींनी असे सांगितले आहे की, आम्हाला मागची बाकी दिली नाही तरी चालेल. परंतु, दिनांक 1.1.1996 पासून जी वेतनश्रेणी निश्चित होईल, त्याचा लाभ देण्यात यावा. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, आम्हाला आपल्याकडून ठोस आश्वासन हवे आहे. आता या विषयावर अधिक चर्चा न करता मी असा प्रश्न विचारतो की, 8 दिवसात निर्णय घेऊन या प्रश्नाला शासन न्याय देणार आहे काय, तसेच यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात प्रतिनिधींबरोबरच्या बैठकीत 2006 ते 2009 पर्यंतच्या बाबीचा विचार करण्यात आला. या विषयामध्ये आर्थिक बाबीचा प्रश्न नसून केवळ वेतन निश्चितीचाच प्रश्न आहे, असा मुद्दा मांडण्यात आला असला तरी आर्थिक बाबीचा मुद्दा निश्चितपणे आहे. त्यामुळे आर्थिक बाबीचा अभ्यास करुन त्याचा राज्याच्या विकासावर काय परिणाम होणार आहे, हे बघणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु असून हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत उपस्थित करावा लागणार आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, प्रश्न आर्थिक भाराचा नसून घटनेने सर्व कर्मचा-यांना समान न्याय देण्यात यावा, अशी भूमिका व्यक्त केली आहे व त्याला आपण बाध्य आहोत. एकाच कामासाठी दोन कर्मचारी असतील तर एकाला एक वेतनश्रेणी व दुस-याला दुसरी वेतन श्रेणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :21949...

श्री. कपिल पाटील....

तुम्हाला देता येणार नाही. यासंदर्भात मागील काळात आपण जी चूक केलेली आहे, ती आपल्याला दुरुस्त करावी लागणार आहे व पूर्ण थकबाकी द्यावी लागणार आहे. संघटनेने थकबाकी मागितलेली नाही, हा त्यांचा प्रश्न आहे. परंतु नियमानुसार थकबाकी द्यावी लागणार आहे. एकाच कॅडरच्या लोकांना विषम वागणूक देता येत नाही. सहाव्या वेतन आयोगात अशी दुरुस्ती करण्यात आली आहे. आता पाचव्या वेतन आयोगात दुरुस्ती करावयाची आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी काल्पनिक वेतनवाढ देण्यात यावी, अशी सूचना केली आहे. सन्माननीय सदस्यांच्या सूचनेनुसार कार्यवाही केली तर मागील आर्थिक भार शासनावर पडणार नाही. परंतु 1.1.1996 पासूनची थकबाकी शासनाला द्यावी लागेल, असे माझे मत आहे. खरे म्हणजे, दिनांक 1.1.1996 पासूनची थकबाकी द्यावयास पाहिजे. शासनाला कोणत्याही कर्मचाऱ्यांमध्ये भेदभाव करता येत नाही. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माननीय वित्त मंत्र्यांबरोबर याच अधिवेशन काळात बैठक घेण्यात यावी व या प्रश्नातून मार्ग काढावा, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी समान न्यायाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. या विषयाच्या संदर्भात मला सांगावयाचे आहे की, जेव्हा आपण सन 2000 मध्ये त्रिस्तरीय वेतनश्रेणी निश्चित केली होती, त्यावेळी आपण केंद्र शासनाच्या तुलनेपेक्षा जास्त वेतनश्रेणी दिली होती. त्यामुळे शासनाने सन 2000 मध्येच त्यांना झ ुकते माप दिलेले आहे. मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही सुरु असून हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर नेण्यात येणार आहे, एवढेच मी या घडीला सांगू इच्छिते.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी शालेय शिक्षण विभागाचा कार्यभार स्वीकारल्यापासून खूप चांगले काम केलेले आहे. हा प्रश्न 29 वेळा सभागृहात उपस्थित होऊन सुध्दा छापील उत्तरात काहीही बदल करण्यात आलेला नाही. हा विषय अर्थ खात्याकडे प्रलंबित आहे, असे सांगितले जाते. राज्य शासनावर किती आर्थिक बोजा पडणार आहे, याची माहिती सभागृहाला एकदा समजू द्या. तसेच या प्रश्नाच्या संदर्भात किती दिवसात निर्णय घेतला जाणार आहे किंवा निर्णय घेतला जाणार नाही, याची माहिती देखील सभागृहाला एकदा समजू द्या.

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :21949...

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात अनेक पर्याय समोर आलेले आहेत. या निर्णयामुळे एकंदर 24 कोटी रुपयांचा आर्थिक भार शासनावर पडणार आहे. या विषयावर मुख्य सचिवांनी अभ्यास केल्यानंतर ही बाब वित्त विभागाकडे जाईल व त्यानंतर हा प्रश्न मंत्रिमंडळाच्या बैठकी समोर जाऊन त्यावर निर्णय होईल.

---------

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बऱ्याच जमिनी ताब्यात घेऊन शासनाने त्यावर शासकीय/निमशासकीय कार्यालय बांधल्याबाबत**

(४) * २३१४० श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.धनंजय मुंडे , श्री.चंद्रकांत पाटील : सन्माननीय अल्पसंख्यांक विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बऱ्याच जमिनी ताब्यात घेऊन शासनाने त्यावर शासकीय/निमशासकीय कार्यालय बांधले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशी किती प्रकरणे आहेत ज्यावर शासकीय/निमशासकीय कार्यालय उभारण्यात आली आहेत, त्यापैकी वक्फ मंडळाने किती जमिनी ताब्यात घेतल्या आहेत,

(३) असल्यास, अशा प्रकरणांमध्ये वक्फ मंडळाचे किती आर्थिक नुकसान झाले आहेत,

(४) असल्यास, सदर वक्फ मंडळाच्या जमिनी शासनाने ताब्यात घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, वक्फ मंडळाचे झालेले आर्थिक नुकसान भरुन काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.मोहम्मद आरीफ (नसीम) खान** : (१), (२), (३), (४), (५) व (६) मराठवाड्यातील एकूण ८२ ठिकाणी वक्फ मिळकतीवर शासकीय/निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्यालय असल्याचे निदर्शनास आले आहे.उर्वरित भागातील माहिती महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून संकलित करण्यात येत आहे.

त्यापैकी वक्फ मंडळाकडून अद्याप एकही जमीन ताब्यात घेण्यात आलेली नाही. मात्र या जमिनी बाबत वक्फ अधिनियम-१९९५ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळामार्फत कार्यवाही विचाराधीन आहे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, .....

...५...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : २१४८७ बाबत**

श्री. वसंतराव खोटरे: सभापती महोदय, तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील तिस-या क्रमांकावरील प्रश्न क्रमांक २१४८७ पुकारण्यात आलेला नाही.

**उप सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक २१४८७ दोनदा पुकारला होता. परंतु तरी सुध्दा आपल्या आग्रहाखातर सदर प्रश्नानंतर तारांकित प्रश्न क्रमांक २१४८७ पुन्हा चर्चेला घेण्यात येईल. परंतु, यापुढे सन्माननीय सदस्यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सभागृहात उपस्थित राहणे गरजेचे आहे, याबाबत दक्षता घ्यावी.

श्री. वसंतराव खोटरे : धन्यवाद.

---

...६..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :२३१४० चर्चा पुढे सुरु.....**

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या जमिनीच्या संदर्भात शासनाने असे उत्तर दिले आहे की, "वक्फ बोर्डाची जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे." सदर कार्यवाही केव्हा पूर्ण केली जाणार आहे, मागील तीन वर्षापासून वक्फ बोर्डाच्या अध्यक्षांची नियुक्ती झालेली नाही, हे खरे आहे काय ? तसेच, वक्फ बोर्डाचे काही अधिकारी योग्य नाहीत, हे खरे आहे काय ? माननीय उच्च न्यायालयाने ऑक्टोबर महिन्यात योग्य वक्फ बोर्ड गठीत करण्यात आलेले नाही, असे आरोप केलेले आहेत, हे खरे आहे काय ?

श्री.मोहम्मद आरीफ (नसीम) खान : सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या जागेवर शासकीय कार्यालये किती आहेत व त्यावर आतापर्यंत काय कारवाई करण्यात आलेली आहे, अशा प्रकारचा हा प्रश्न आहे. मूळ तारांकित प्रश्नाला विस्ताराने छापील उत्तर दिलेले आहे.

वेगवेगळया ९ विभागांच्या ८२ जागेवर शासकीय व निमशासकीय कार्यालय सुरु आहे. या विषयासंदर्भात दिनांक ९.१०.२०१० रोजी मी एक बैठक घेतली होती. वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ९७ अंतर्गत राज्य शासनाकडून महाराष्ट्र वक्फ मंडळाच्या जागेवर शासकीय कार्यालये सुरु करण्यात आलेली आहेत. त्यामुळे त्यासंदर्भात कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले असून यावर वक्फ बोर्ड लवकरात लवकर निर्णय घेणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी उच्च न्यायालयाच्या संदर्भात प्रश्न विचारला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, मागील काळात मुंबई उच्च न्यायालयामध्ये वक्फ बोर्डाच्या संदर्भात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेच्या संदर्भात न्यायालयाने निर्णय दिला होता. परंतु वक्फ बोर्ड आणि राज्य शासनाने सुप्रीम कोर्टात अपील दाखल केले असून त्यामध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती मिळाली आहे. पुढील सुनावणी जानेवारी महिन्यात होणार आहे.

श्री.एस.क्यू.जमा : माननीय मंत्री महोदय ने जो जवाब यहां पर दिया है उस संबंध में मेरे दो स्पेसिफिक प्रश्न हैं. मेरा पहला प्रश्न यह है कि आपने उतर में वक्फ अधिनियम 1995 की बात यहां पर कही है. लेकिन मैं कहना चाहता हूं कि उस नियम के अनुसार आपके पास ज्यादा अधिकार नहीं हैं, जिसके माध्यम से गलत तरीके से हड़प की गयी जमीन को आप वापस ले सकें. हड़पी गयी जमीन को वापस लेने का प्रोसीजर बहुत लंबा है.

...7...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एस.क्यू.जमा...

मैं यहां पर बताना चाहूंगा कि जिस समय श्री विलासराव देशमुख जी मुख्यमंत्री थे, उस समय उन्होंने विधानमंडल में कमिट किया था कि राज्य के अंदर वक्फ बोर्ड की एन्क्रोचमेंट हुई जमीन को वापस लेने के लिए एक स्पेशल एक्ट बनाया जाएगा. इसलिए मेरा प्रश्न है कि क्या इस तरह का एक्ट सरकार जल्द से जल्द बनाएगी, ताकि गलत तरीके से हड़पी हुई जमीन को वापस लिया जा सके. क्योंकि महाराष्ट्र में बड़े पैमाने पर वक्फ बोर्ड की जमीन हड़पी गयी है और उसकी वेल्यु बहुत ज्यादा है.

मेरा दूसरा प्रश्न यह है कि सरकार ने यह भी निर्णय किया था कि वक्फ बोर्ड का जो मुख्यालय औरंगाबाद में है वह वहीं रहने दिया जाए. परन्तु सरकार ने ऐसा भी कहा था कि उसका एक-एक आफिस नागपुर और अमरावती में भी खुलना चाहिए. मुझे पूछना है कि उस बारे में सरकार ने क्या निर्णय लिया है ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23140...

मोहम्मद आरिफ (नसिम) खान : सभापती महोदय, कुठल्याही प्रकारचा नवीन कायदा बनविण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. वक्फ बोर्डाच्या संबंधातील केंद्रीय कायदा या राज्याला 1995 मध्ये लागू झाला आहे. 1995 च्या अधिनियमातील कलम 54 व 55 नुसार वक्फ बोर्डाच्या जागेवर कोणीही अनधिकृतपणे अतिक्रमण केले असेल तर सदर कलमानुसार कारवाई करून ती जागा ताब्यात घेण्याची कारवाई वक्फ बोर्डाने केली पाहिजे. त्याप्रमाणे गेल्या दीड वर्षामध्ये राज्यात वक्फ बोर्डातर्फे कारवाई करण्यात आलेली आहे. त्यानुसार 450 एकर जागा वक्फ बोर्डाने ताब्यात घेतली आहे. अशाच प्रकारची कारवाई अनेक प्रकरणांमध्ये सुरू देखील झालेली आहे. तसेच विभाग वाईज कार्यालये उघडण्यासंबंधी देखील येथे मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसंबंधी देखील मंडळाला निदेश देण्यात आला आहे. त्यासाठी निधीची देखील तरतूद करण्यात आली आहे. 108 कर्मचाऱ्यांच्या भरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच लवकरात लवकर विभाग वाईज कार्यालय सुरू करण्याचा विचार करू.

**उप सभापती** : आता प्रश्नोत्तराचा तास खऱ्या अर्थाने संपलेला आहे. सुरूवातीच्या चर्चेमध्ये आपला प्रश्नोत्तराच्या तासातील अर्ध्या तासाचा वेळ गेला आहे. त्यामुळे प्रश्नोत्तरासाठी आणखी अर्धा तास वेळ मी वाढवून देत आहे.

श्री.सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून वक्फ बोर्डाच्या जमिनी ॲग्रीमेंट करून खाजगी जमीन मालकांनी घेतल्या आहेत, त्या शासन परत घेणार आहे काय ?

मोहम्मद आरिफ (नसिम) खान : सभापती महोदय, स्पेसिफिक तक्रार केल्यानंतर त्याची चौकशी करून कारवाई करण्यात येईल.

श्री.सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, परभणी जिल्ह्यातील काही जमिनी वक्फ बोर्डाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून खाजगी जमीन मालकांनी घेतल्या आहेत. त्या आपण परत घेणार आहात काय ?

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोहम्मद आरिफ (नसिम) खान : सभापती महोदय, वक्फ बोर्ड ॲक्ट नुसार कारवाई करण्यासंबंधीचे अधिकार वक्फ बोर्डाला आहेत. सन्माननीय सदस्यांनी परभणी जिल्ह्यातील तक्रार सांगत आहेत. त्यांनी जर मला लेखी तक्रार दिली तर वक्फ मंडळाला त्यानुसार कारवाई करण्यासंबंधी सूचना देण्यात येईल.

श्री.सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, ज्या खाजगी मालकांनी वक्फ बोर्डाच्या जमिनी घेतल्या आहेत, त्या परत घेण्यासंबंधी शासन आदेश देणार आहे काय ?

मोहम्मद आरिफ (नसिम) खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यासंबंधी वक्फ बोर्डाच्या सीईओ मार्फत चौकशी करण्यात येईल. त्यात गैर आढळून आले तर नियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

श्री.एम.एम.शेख : सभापती महोदय, महाराष्ट्र वक्फ बोर्ड अंतर्गत येत असलेल्या इनामी जमिनी वर शासकीय कार्यालय उभारण्यात आलेले आहे. त्याचे भाडे आता पर्यंत वसूल करण्यात आले आहे काय किंवा जमिनीचे भाडे देण्यासंबंधी त्या शासकीय कार्यालयांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत काय, नोटीसा दिल्या असल्यास आज पर्यंत किती भाडे वसूल झाले आहे ? इनामी जमिनीसंबंधी, देवस्थानाच्या जमिनी संबंधी शासनाने सन 2010 मध्ये आदेश काढला होता. त्यात असे नमूद केले होते, जेवढ्या म्हणून देवस्थानच्या, कब्रिस्तानच्या इनामी जमिनी असतील त्याचा सर्व्हे करण्यात येईल. त्याप्रमाणे सर्व्हे झाला आहे काय, त्यासंबंधीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय, झाला असेल तर महाराष्ट्राच्या वक्फ बोर्डाच्या मालकीची किती एकर जमीन आहे. तसेच ज्या खाजगी मालकांनी वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनी घेतल्या आहेत त्या परत घेण्यासंबंधी शासन प्रयत्न करणार आहे काय, असल्यास, आज पर्यंत किती जमिनी परत घेण्यात आल्या आहेत व उर्वरित जमिनी परत घेण्यासंबंधी शासन आदेश काढून वक्फ बोर्डाच्या ताब्यात देणार आहे काय ?

..3


BGO/ D/ KTG/ D/ MMP/ शरद 12:00

मोहम्मद आरिफ (नसिम) खान : सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या जागेवर शासकीय, निमशासकीय कार्यालय बांधले असेल तर त्याची चौकशी करावी असा निदेश शासनाने मंडळाला सन 2010 मध्ये दिला आहे. तसेच वक्फ ॲक्टच्या कलम 97 नुसार कारवाई करण्यासंबंधी देखील सूचना दिल्या आहेत. तसेच नियम 1 मध्ये जी तरतूद आहे त्याप्रमाणे मंडळाने उचित निर्णय घ्यावा असे देखील कळविण्यात आले आहे. ती जागा रिकामी होत नसेल तर त्या विभागाचा जो रेडीरेकनर असेल त्या प्रमाणे त्यांच्याकडून भाडे वसूल करण्याची कारवाई सुरू करावी असे देखील कळविण्यात आले आहे. जेणे करून वक्फ बोर्डाला उत्पन्न मिळेल. त्या उत्पन्नातून मुस्लिम समाजाच्या विकासाचे काम हाती घेता येईल.

ॲड.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, हायकोर्टाने वक्फ बोर्डाच्या कामकाजाबद्दल नाराजी व्यक्त केली व वक्फ बोर्ड बरखास्त केले. त्यानंतर सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले. विधान मंडळातून वक्फ बोर्डावर सदस्यांची निवड होते. त्याप्रमाणे निवडणूक झाली. तथापि, निवडून आलेल्या सदस्याला वक्फ बोर्डाच्या कामकाजामध्ये सहभागी होण्यासाठी शासनाने अद्यापी जी.आर.काढलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांना या बोर्डाच्या भ्रष्टाचार निर्मूलनाच्या कामाला लावणार आहात की नाही, असा माझा या निमित्ताने प्रश्न आहे. तसेच, शासन कधी जी.आर.काढणार आहे, असा देखील प्रश्न आहे. वक्फ बोर्डाला कलम 53,54 अन्वये कारवाई करण्याचे अधिकार दिलेले आहेत. त्याप्रमाणे किती ठिकाणी कारवाई सुरू झालेली आहे व किती ठिकाणच्या खाजगी मालकांनी ताब्यात घेतलेल्या जमिनी परत मिळविण्यामध्ये बोर्ड यशस्वी झाले आहे या संबंधीचे स्पेसिफिक उत्तर द्यावे.

मोहम्मद आरिफ (नसिम) खान : सभापती महोदय, वक्फ बोर्डावर विधान मंडळाच्या माध्यमातून प्रतिनिधी निवडून येतात. सदर निवडीसंबंधातील निवडणूक झाली आहे. त्याच्या आदेशाची प्रत शासनाला प्राप्त झाली आहे. त्यासंबंधातील कार्यवाही प्रगतीपथावर आहे. ती लवकरात लवकर होईल. मंडळावर जी नियुक्ती करण्यात आली होती ती रद्द करण्यासंबंधीचे आदेश मध्यंतरी मुंबई हायकोर्टाने दिले होते. या विरोधात शासनाने सर्वोच्च न्यायालयात अपील

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोहम्मद आरिफ (नसिम) खान......

दाखल केले व त्यास स्थगिती मिळविली. यासंबंधातील अंतिम सुनावणी पुढच्या महिन्यात म्हणजे जानेवारीमध्ये होणार आहे. या प्रकरणी माननीय सर्वोच्च न्यायालयाचा जो काही निर्णय होईल त्या आधारे पुढची कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी किती प्रकरणात कारवाई करण्यात आली आहे असा दुसरा प्रश्न विचारला आहे. गेल्या वर्षी 450 एकर पेक्षा जास्त जागा मिळविण्यामध्ये वक्फ बोर्ड यशस्वी झालेले आहे. तसेच कमीतकमी 1200 ते 1300 वक्फ मालमत्तेवर नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या विरूद्ध कारवाई सुरू झालेली आहे. सदर प्रकरण सीईओंकडे प्रलंबित आहे.

................

..5

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात शासनाने सुरु केलेल्या पट पडताळणी मोहिमेअंतर्गत बोगस विद्यार्थी आढळल्याबाबत**

**(2) * 21520 श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , डॉ.रणजित पाटील , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.जयवंतराव जाधव , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे , ॲड. उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.जयंत पाटील , श्री.कपिल पाटील , श्री.केशवराव मानकर , श्री.संजय केळकर , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.रामनाथ मोते , श्री.मोहन जोशी , श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.विनोद तावडे , श्री.सुभाष चव्हाण , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.राजेंद्र जैन , डॉ.सुधीर तांबे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.दिवाकर रावते , श्री.परशुराम उपरकर , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली , श्री.संजय पाटील , श्री.एम.एम.शेख , प्रा.सुरेश नवले , श्री.सतीश चव्हाण , श्री.अनिल भोसले , श्री.राम पंडागळे , श्री.धनंजय मुंडे , श्री.संदिप बाजोरिया , श्री.रामदास कदम , श्रीमती अलका देसाई , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.नितीन गडकरी , श्री.अरुण गुजराथी** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात विशेषत: नांदेड, सांगली, गोंदिया,बुलढाणा जिल्ह्यातील बोगस विद्यार्थी शोधण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या पटपडताळणी मोहिमेअंतर्गत अनेक शाळेत फार मोठया संख्येने विद्यार्थी गैरहजर असल्याचे आढळून आले, तसेच हजारो शाळा आणि शेकडो शिक्षकही बोगस असल्याचे स्पष्ट झाले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, संस्थाचालकांनी पटसंख्या लपविण्यासाठी छत्तीसगढ, नैतुल, गडचिरोली, अमरावती, मेळघाट व इतर जिल्ह्यातून विद्यार्थ्यांना आणून दाखविण्याचे प्रकार सर्रास सुरू असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या मोहिमेअंतर्गत शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतर विभागाच्या अधिकाऱ्याच्या पथकाकडून व्हिडिओ चित्रीकरण करून ही तपासणी करण्यात आली हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(5) असल्यास, चौकशीनुसार किती शाळेमध्ये बोगस विद्यार्थी, शाळा, शिक्षक आढळून आले त्या शाळांच्या संचालकाविरूद्ध शासनाने फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(6) तसेच शासनाची फसवणूक करुन अनुदान घेणाऱ्या संस्था चालकांकडून अनुदानाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(7) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) व (2) राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये दिनांक 3 ते 5 ऑक्टोबर, 2011 या कालावधीत विशेष पटपडताळणी मोहिम जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली राबविण्यात आली. सदर पटपडताळणीमध्ये शाळेची प्रत्यक्ष विद्यार्थी पटसंख्या, त्यापैकी उपस्थित विद्यार्थी व अनुपस्थित विद्यार्थी यांची पडताळणी करण्यात आली. सदर मोहिमेत काही शाळांमध्ये प्रत्यक्षामध्ये आहेत त्यापेक्षा अधिक विद्यार्थी पटावर असणे किंवा अनुपस्थित असल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले आहे.

(3) होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21520 .....

(4), (5) आणि (6) राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये दिनांक 3 ते 5 ऑक्टोबर, 2011 या कालावधीत केलेल्या विशेष पटपडताळणी अहवालाचे विश्लेषण करुन आवश्यक शिफारशी करण्याकरिता मुख्य सचिव, महाराष्ट्र यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.
(7) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, शिक्षण खात्यामध्ये बोकाळत चाललेल्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासंबंधीची प्रक्रिया मंत्रिमहोदयांनी सुरू केली आहे त्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. पट पडताळणीमध्ये शिक्षण संस्थेने खोटे पट दाखवून शासनाच्या निधीचा अपव्यय केलेला आहे हे सिद्ध झालेले असताना परत त्यासंबंधी समिती गठित करण्याचे कारण काय आहे?

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 21520...

श्री. जयवंतराव जाधव....

संबंधित खात्यामधील अधिकाऱ्यांची या संदर्भात चौकशी करुन त्यांच्यावर फौजदारी खटला दाखल का करीत नाही त्याचप्रमाणे ज्या संस्थांनी बोगस पट दाखविले आहेत आणि पट पडताळणीनंतर जे पट खरे असल्याचे सिध्द झाले आहे त्या पटसंख्येमध्ये असलेल्या तफावतीनुसार अनुदानाची रक्कम शासनाने कमी केली आहे काय? त्याचप्रमाणे ज्या संस्था पूर्वीच्या पटसंख्येच्या आधारे अनुदान घेत होत्या आणि आज त्यांना जे अनुदान दिले जात आहे त्यामध्ये शासनाने फरक केला आहे काय? माझ्याकडे एका वर्तमानपत्रात छापून आलेल्या बातमीचे कात्रण असून त्यामध्ये शासन दोन महिन्याच्या आत कारवाई करणार असल्याचे म्हटले आहे. माझा या बाबतीत वैयक्तिक अनुभव असा आहे की, पट पडताळणीमध्ये बोगस पट संख्या असल्याचे सिध्द झाल्यानंतर त्यावर पुन्हा समिती गठीत न करता शासनाने तातडीने या प्रकरणी कारवाई करणे गरजेचे आहे. तेव्हा हा प्रश्न आपण कशा पध्दतीने मार्गी लावणार आहात?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत सर्व माननीय सदस्यांमध्ये उत्सुकता आहे व खूप कन्फ्यूजन आहे. शासनाने 3 ते 5 ऑक्टोबरपर्यन्त पट पडताळणीची विशेष मोहीम हाती घेतली. नियोजनबध्द रितीने, कॅमेरे लावून आणि सर्व मुलांच्या बोटाला शाई लावून ही मोहीम यशस्वी केली. यामध्ये मुख्य प्रश्न असा आहे की, ज्या दिवशी शाळेमधील विद्यार्थ्यांची जी पट संख्या होती किंवा जी उपस्थिती होती त्याची आकडेवारी आपण घेतली. त्यानुसार शाळेमध्ये विद्यार्थ्यांची अनुपस्थिती होती म्हणजे ती पटसंख्या बोगस होती हे सिध्द करता येत नसल्यामुळे त्याचे विश्लेषण झाले पाहिजे. अशाप्रकारचे अनेक अनुभव समोर आल्यानंतर सकृतदर्शनी काही प्रकार उघडकीस आले आहेत. शासनाकडील रेकॉर्डमध्ये त्या शाळेतील असलेली पटसंख्या पाहून धोरणात्मक अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या दिवशी शाळेमध्ये असलेली उपस्थिती आणि शासनाकडे असलेल्या रेकॉर्डची तुलना केल्यानंतर किती विद्यार्थी बोगस दाखविले आहेत ही माहिती आपल्यासमोर येऊ शकेल. या करिता माननीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली 5सचिवांची एक समिती नेमण्यात आली आहे व त्या समितीला अभ्यास करण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे त्यामध्ये शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास

विभाग, अपंग, अनुदानित आणि विना अनुदानित इत्यादी विभागांच्या शाळांचा समावेश असल्यामुळे त्या सर्व शाळांवर कारवाई होणार आहे. परंतु त्यामध्ये बोगस विद्यार्थ्यांची संख्या आपल्यासमोर येत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही तोपर्यन्त त्या शाळांवर कारवाई करणे क्रमप्राप्त होणार नाही. त्यामुळे शासनाकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डप्रमाणे त्या शाळांवर कडक कारवाई करण्याबाबत ठरविण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, नांदेड, सांगली, गोंदिया, बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये बोगस विद्यार्थी आढळून आले ही दुर्दैवाची बाब आहे. त्याचप्रमाणे छत्तीसगढ, नैतुल, गडचिरोली, अमरावती, मेळघाट व इतर जिल्ह्यातून विद्यार्थी आणण्याचे प्रकार आढळून आले आहेत. परंतु सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांमध्ये बोगस विद्यार्थी आणि बोगस शिक्षक आढळून आले नाहीत ही कौतुकास्पद बाब आहे. महाराष्ट्रातील इतर जिल्हे देखील या दोन जिल्ह्यांचे भविष्यात अनुकरण करतील अशाप्रकारचे अनुकरण इतर जिल्ह्यांनी देखील करावे या करिता सिंधुदुर्ग जिल्ह्याकरिता विशेष बक्षिस देण्याबाबत शिक्षण विभागाकडून धोरणात्मक निर्णय घेतला जाणार आहे काय?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रातील गैर प्रकारांना आळा बसावा आणि शिक्षण क्षेत्रामध्ये गुणात्मक विकास साधला जावा यासाठी पट पडताळणी करण्याचा शासनाने निर्णय घेतला. शासनाने हा निर्णय घेत असतांना कुठल्या तरी शाळेच्या विरुध्द कारवाई करण्यासाठी अशाप्रकारची पट पडताळणी झालेली नाही. परंतु ज्या चांगल्या शाळा आहेत त्यांना शासनातर्फे भविष्यात अधिक मदत मिळाली पाहिजे या भावनेतून ही पट पडताळणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, पट पडताळणीनंतर अनेक निष्कर्ष प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये काही गोष्टी धक्कादायक असल्याचे आढळून आले आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्याचा उल्लेख केला. त्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची उपस्थिती 97.67 टक्के व रत्नागिरी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची उपस्थिती 96.70 टक्के असल्याचे आढळले आहे त्याबद्दल या दोन्ही जिल्ह्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी पट पडताळणी झाली आता पुढे काय असा प्रश्न उपस्थित केला? पट पडताळणी झाल्यानंतर शासनासमोर अनेक निष्कर्ष आले आहेत. आपणा सर्वांचा असा समज आहे की, शासकीय आणि जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये फार मोठया प्रमाणात अनुपस्थिती असते, तेथील शिक्षणाचा दर्जा वाईट असतो. या पट पडताळणीनंतर एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की, जवळपास 94 टक्क्यापेक्षा अधिक विद्यार्थी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये उपस्थित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

ता.प्र.क्र. 21520...

श्री. राजेंद्र दर्डा....

होते. त्यामुळे ज्याप्रमाणे शासकीय आणि जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये वाईट गोष्टी घडतात त्याप्रमाणे अनेक अनुदान प्राप्त खाजगी शाळांमध्ये सुध्दा वाईट गोष्टी घडतात. याकरिता माननीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत प्राप्त झालेले निष्कर्ष अभ्यासून पट संख्येच्या आधारावर शाळानिहाय शिक्षकांची संख्या निश्चित करण्याची कारवाई करण्यात येईल.

दुसरी गोष्ट अशी की, यामध्ये जे अतिरिक्त शिक्षक ठरतील त्यांना वाऱ्यावर न सोडतात त्यांच्या समायोजनाची कारवाई कशाप्रकारे करावी या बाबतचा अभ्यास माननीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती करणार आहे.तिसरी गोष्ट अशी की, पट पडताळणी केल्यानंतर अनेक ठिकाणी भौतिक सुविधांचा अभाव असल्याचे आढळून आले आहे. ज्या शाळांमध्ये भौतिक सुविधाचा अभाव आहे त्यांना रितसर नोटिस देऊन त्यांची मान्यता काढून घेण्याची प्रक्रिया समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर व त्याची छाननी केल्यानंतर निश्चितपणे करावी लागणार आहे. चौथी गोष्ट अशी की, भविष्यात असे गैरप्रकार होऊ नयेत याकरिता शासनाला दिशा दिग्दर्शन करावे लागणार आहे. ज्या शाळांमध्ये बोगस विद्यार्थी आढळून आले आहेत त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती आणि शिक्षकांची उपस्थिती नोंदविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा लागणार आहे. याकरिता माननीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील 5 सदस्यांची समिती दोन महिन्यात अहवाल सादर करणार आहे. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रामधून भविष्यात चांगल्या प्रकारचे दर्जात्मक शिक्षण मिळेल अशाप्रकारचा विश्वास निश्चितपणे मिळेल.

श्री.राजन तेली : सभापती महोदय,सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यामध्ये पटसंख्येच्या बाबतीत चांगला रिझल्ट समोर आल्यामुळे मी शासनास धन्यवाद देतो. या दोन जिल्ह्यांकरिता खास बाब म्हणून आपण विशेष अनुदान देणार आहात काय? दुसरा प्रश्न असा की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये शिक्षण उपसंचालक नेमण्यात आले आहेत त्यांनी वर्षानुवर्षे या शासनाला बुडविण्याचे काम केले आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर आपण या शिक्षण उप संचालकांवर कोणती कारवाई करणार आहात, त्याबाबतची जिल्हा निहाय परिस्थिती काय आहे, कोणत्या जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त बोगस विद्यार्थी आढळले आहेत तसेच, जे जिल्हे प्रामाणिकपणे काम करीत आहेत त्यांना विशेष अनुदान देणार काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21520 . . . .

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारलेले आहेत. त्यांचा शेवटचा प्रश्न असा होता की, याठिकाणी दरवर्षी पट पडताळणी होते आणि त्या नंतरही जर चुकीचे, बोगस आकडे समोर आले असतील तर त्याबाबतीत काय कारवाई होणार आहे? याबाबतीत सांगावयाचे तर यासंबंधात मुख्य सचिवांची जी समिती नेमण्यात आलेली आहे, यातील एक कलम हेच आहे की, भविष्यामध्ये अशा प्रकारच्या गोष्टी होऊ नयेत. मात्र ज्याठिकाणी अशा गोष्टी झाल्या आहेत त्याबाबत काय कार्यवाही करावी हे मुख्य सचिवांची समिती सुचविणार आहे. तसेच त्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला आहे की, ज्याठिकाणी उपस्थिती सर्वात जास्त होती असे कोणते जिल्हे आहेत? याबाबत सांगावयाचे तर विद्यार्थ्यांची उपस्थिती जास्त असलेले पाच जिल्हे होते. त्यामध्ये सिंधुदुर्ग मध्ये 97.57 टक्के, रत्नागिरीमध्ये 96.70 टक्के, सातारा 95.54 टक्के, अहमदनगर 95.32 टक्के आणि कोल्हापूर 94.44 अशा प्रकारे या पाच जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थितीचे प्रमाण जास्त होते.त्याबरोबर विद्यार्थ्यांच्या हजेरीचे प्रमाण कमी असलेले जे जिल्हे आहेत, त्यामध्ये नांदेड 17.71, सोलापूर 16.92, धुळे 15.46,यवतमाळ 14.20 आणि परभणी 13.67 या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. मी याठिकाणी एकच गोष्ट सांगू इच्छितो की, या ठिकाणी विद्यार्थी गैरहजर होते, म्हणजे तेथील विद्यार्थी 100 टक्के बोगस होते असा कृपया समज करुन घेण्यात अर्थ नाही. याबाबतीत आपल्याला निश्चितपणे पाहाणी करावी लागेल. त्याठिकाणी विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीचे जे प्रमाण होते, त्यामध्ये खरेच किती विद्यार्थी गैरहजर असू शकतात हे पहाण्यासाठी एक सूत्र ठरवावे लागणार आहे आणि मुख्य सचिव समिती हे सूत्र निश्चितपणे ठरवेल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, ज्या संस्था चालकांनी अशा प्रकारे विद्यार्थ्यांची बोगस उपस्थिती दाखवून शासनाचे अनुदान लाटलेले आहे म्हणजे जर एखाद्या सामान्य माणसाने फसविले तर त्याच्यावर कडक कारवाई केली जाते. मात्र याठिकाणी संबंधितांनी शासनाला फसविलेले आहे अशा संस्था चालकांवर कोणती कारवाई केली जाणार आहे? तसेच याबाबत तातडीने कारवाई करण्यात यावी.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, शिक्षण विभाग शिक्षक भरतीला राजरोसपणे परवानगी देत आहे आणि माननीय मंत्री महोदय असे सांगत आहेत की, शिक्षक अतिरिक्त होत आहेत. मात्र दुसरीकडे आपण परवानगी देत आहात.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी शाळांचे अनुदान लाटण्याबाबतचा प्रश्न उपस्थित केलेला आहे.अनुदानापेक्षाही सर्वात महत्वाचे म्हणजे काही शाळांमध्ये बोगस विद्यार्थी आढळलेले आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्याकडे जो जास्तीत जास्त पैसा जमा झाला, तो शिक्षकांच्या पगारासाठी किंवा मध्यान्ह भोजन या दोन गोष्टींवर खर्च झालेला आहे. सदरहू रक्कम जवळपास 95 टक्के इतकी होईल ज्यांनी चुकीचे काम केलेले आहे, त्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण देण्याचे कारण नाही. या सर्वांवर कशा पध्दतीने कारवाई करावी याबाबतीत मुख्य सचिव समिती निश्चितपणे सुचवेल. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी मध्येच प्रश्न विचारला की, आपण शिक्षक भरतीला परवानगी देणार आहात काय ? यामध्ये एक गोष्ट आहे की, राज्यामध्ये पट पडताळणी झाली आणि त्यामध्ये अनेक शिक्षक हे निश्चितपणे अतिरिक्त ठरणार आहेत. त्यामुळे मुख्य सचिवांचा अहवाल दोन महिन्यामध्ये येणार असून, जोपर्यंत हा अहवाल येत नाही तोपर्यंत शिक्षकांची कोणतीही भरती होणार नाही.

-----

. . . .एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**अनुदानित/विनाअनुदानित संस्थेतील शाळांची व कायम विनाअनुदानित**

## तुकड्यांची बिंदु नामावली स्वतंत्र ठेवण्याबाबत

**(3)*21487 श्री.वसंतराव खोटरे, प्रा.दिलीपराव सोनवणे,श्री.विक्रम काळे,डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(1) अनुदानित/विनाअनुदानित संस्थेच्या शाळेची व त्याच संस्थेतील कायम विना अनुदानित तुकड्यांची बिंदु नामावली स्वतंत्र ठेवण्याबाबत संदर्भीय पत्र क्रं.2379/09/16-ब दि.09/09/2009 च्या पत्रान्वये संस्थाना कळविले आहे.याबाबत हे पत्रक दोषपूर्ण असल्यामुळे एकाच संस्थेत एकाच संवर्गात दोन-दोन पदे निर्माण होत असल्यामुळे इतर संवर्गावर अन्याय होत आहे त्यामुळे उपरोक्त पत्रक रद्द करण्यात यावे याबाबतचे एक निवेदन कार्यवाह, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, जिल्हा अमरावती यांनी मा.शिक्षणाधिकारी अमरावती यांचे मार्फत शासनाकडे पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त निवेदनांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(3) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) होय.

(2) व (3) सदर निवेदनाबाबत सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे.प्रत्येक शैक्षणिक संस्थांमध्ये 100 टक्के बिंदू नामावलीनुसार रोस्टर लावले जाते. त्याठिकाणी रोस्टर तपासणीसाठी आयुक्त असतात. मात्र महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव यांनी सहाय्यक आयुक्त (मावक) विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नाशिक विभाग यांना पत्र पाठविलेले आहे. या पत्राचा क्रमांक मावक/ कार्या. 18/कावि/45878/46044/2009 दिनांक 29-08-2008. असा आहे आणि या पत्रामध्ये असे म्हटलेले आहे की, "उपरोक्त विषयातील संदर्भाधीन पत्रास अनुलक्षून आपणास कळविण्यात येते की, कायम विनाअनुदानित संस्थांनी बिंदू नामावली नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ती तपासून घेणे आवश्यक आहे. तसेच कायम विना अनुदानित तुकड्यांसाठी स्वतंत्र बिंदू नामावली ठेवणे आवश्यक आहे." याठिकाणी एका संस्थेमध्ये अनुदानित तुकड्या आहेत आणि एका संस्थेमध्ये विना अनुदानित तुकड्या आहेत आणि एका संस्थेमध्ये कायम अनुदानित संस्था आहेत. पूर्वी एकच बिंदू नामावली होती. मात्र आता त्यांनी वेगवेगळी ठेवण्यास सांगितले आहे. त्यामुळे अनुदानित एक,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विना अनुदानित दुसरे आणि कायम विना अनुदानित तिसरे असे आहे आणि माझ्याकडे तशा प्रकारचे पत्र आहे.मात्र यामुळे फार गोंधळ निर्माण झालेला आहे की, एकाच संवर्गाची दोन-दोन पदे निर्माण होण्याची शक्यता असून त्यामुळे एखाद्या संवर्गावर अन्याय होईल . . . .

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य जेव्हा प्रश्न विचारतात, तेव्हा उत्तरापेक्षा प्रश्न प्रदीर्घ असतो आणि त्याचे उत्तर मात्र थोडक्यात असते. त्यामुळे माझी सर्व शिक्षक आमदारांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी नेमका प्रश्न विचारावा जेणेकरुन माननीय मंत्री महोदयांना देखील आपण नेमके कोणते उत्तर द्यावे हे कळू शकेल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, अनुदानित व विना अनुदानितचे स्वतंत्र रोस्टर ठेवल्यास आरक्षित प्रवर्गाच्या काही संवर्गात आरक्षण मोठ्या प्रमाणात वाढेल तर काही प्रवर्गातील आरक्षण कमी होईल. म्हणून संस्थेव्दारा संचालित सर्व प्रकारच्या अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळांचे एकत्रित रोस्टर ठेवण्यात यावे. त्यामुळे आरक्षणाचे धोरण सम प्रमाणात लागू होईल आणि सर्वांना न्याय मिळेल. त्यामुळे याबाबती-तील जे पत्रक आहे, ते ताबडतोब रद्द करण्याच्या बाबतीत माननीय मंत्री महोदय अधिकाऱ्यांना सूचना देणार आहात काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, बिंदू नामावली ठेवणे म्हणजे रोस्टर ठेवणे ही बाब घटनात्मकदृष्टया बंधनकारक आहे आणि सर्व शासकीय शाळा, खाजगी शाळा तसेच अनुदानित आणि विनाअनुदानित शाळा, ज्या नंतर अनुदानित होणार आहेत, त्या सर्वांना ही बाब लागू आहे. फक्त यामध्ये ज्या कायम विना अनुदानित शाळा आहेत, त्याच्या बाबतीत प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तीन प्रकारच्या शाळा असू शकतात. परंतु आता आपण "कायम" हा शब्द काढलेला आहे. त्यामुळे आता फक्त "अनुदानित" रहाणार आहे किंवा जे अनुदानावर येऊ शकतात तशा प्रकारच्या शाळा रहाणार आहेत आणि त्या सर्वांना एक रोस्टर लागू राहील. फक्त इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या बाबतीत विषय रहातो. याबाबत सांगावयाचे तर अशा ज्या शाळांना अनुदान मिळत आहे ते त्याच तत्वामध्ये बसणार आहेत आणि ज्यांना कधीच अनुदान मिळणार नाही त्याबाबत आम्ही सामान्य प्रशासन विभागाकडून अभिप्राय मागविलेला आहे आणि याबाबतीत काही प्रश्न उद्‌भवणार नाही कारण ही साधी बाब आहे. त्यामुळे आपोआपच एकच रोस्टर रहाणार आहे.



श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की, यासंदर्भातील पत्र रद्द करणार आहात काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सदरहू पत्र रद्द करण्याचा प्रश्न नाही.

-----

. . . .एच-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**मुंबई विभागातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती झाली नसल्याबाबत**

**(5) *22313 श्री.कपिल पाटील, श्री.जयंत पाटील** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई विभागातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती झाली नाही, हे खरे आहे काय,

(2) कालबद्ध पदोन्नती अंतर्गत लाभ मिळालेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ वेतन 100 टक्के अद्यापि मिळालेले नाही, याबाबतच्या विलंबाची कारणे काय आहेत,

(3) याबाबतची पूर्तता होणे कधीपर्यंत अपेक्षित आहे ?

**श्रीमती फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) व (3) कालबद्ध पदोन्नती अंतर्गत लाभ मिळालेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ग्रेडवेतन पूर्ण मिळालेले नाही. याबाबत वित्त विभागाने आर्थिक भाराबाबतची माहिती मागविली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण सहावा वेतन आयोग लागू केलेला आहे. तसेच त्या अनुषंगाने हकीम समितीच्या शिफारशी देखील लागू केलेल्या आहेत आणि आपल्या विभागाकडून चूक झालेली आहे अशी आपण उत्तरामध्ये अप्रत्यक्षपणे कबुली दिलेली आहे. माझे म्हणणे असे आहे की, हा मुंबई विभागातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संबंधातील मुद्दा आहे. यामध्ये जी चूक झाली आहे, ती दुरुस्त करण्यासाठी वित्त विभागाकडे जी माहिती पाठविणे आवश्यक होते, ती पाठविण्यात आली नाही. मात्र ती माहिती ताबडतोब पाठविण्यात यावी. हा मुंबई विभागापुरता मुद्दा आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, हा प्रश्न केवळ मुंबई विभागाच्या पुरता मर्यादित आहे आणि काही टेक्नीकल कारणामुळे ते झालेले नाही, यासाठी उशीर झालेला आहे. मात्र आता एका महिन्याच्या आत सॉल्व्ह होईल एवढेच मी येथे सांगू इच्छिते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, धन्यवाद.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-----

. . . .एच- 7



**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज 16 डिसेंबर या दिवसाचे विशेष महत्व आहे आणि ते मी या औचित्याच्या मुद्याव्दारे सर्व सभागृहाच्या निदर्शनास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणून देऊ इच्छितो. दिनांक 16 डिसेंबर 1971 रोजी लोकसभेचे अधिवेशन सुरु असताना स्व.पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी जी घोषणा केली, ती ऐकण्यासाठी मी स्वत: प्रथमच दिल्लीला गेलो होतो आणि लोकसभेच्या प्रेक्षक गॅलरीमधून लोकसभेतील कामकाज पहात होतो.

सभापती महोदय, स्व.पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी आजच्या दिवशी म्हणजे 1971 साली म्हणजे 40 वर्षापूर्वी लोकसभेमध्ये एक घोषणा केली होती की, भारत-पाकिस्तान युध्दामध्ये पाकिस्तानचा पराभव झालेला आहे आणि भारताचा विजय झालेला आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार..

आणि जगाच्या इतिहासात एकाच वेळी 90 हजार सैनिकांनी शरणागती पत्करली आहे. त्यावेळी लोकसभेमध्ये उपस्थित असलेल्या सर्व पक्षाच्या सन्माननीय नेत्यांनी आणि सन्माननीय सदस्यांनी जो जल्लोश केला होता तो आजचा दिवस आहे. त्या ठिकाणी माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या त्याच प्रमाणे इतर अनेक सन्माननीय नेत्यांनी व सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आणि भारताच्या त्या वेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना दुर्गेची उपमा देण्यात आली. माननीय श्रीमती इंदिरा गांधी यांनी आपल्या नेतृत्वाखाली या जगाचा भूगोल बदलून दाखविला, बांगला देशाची निर्मिती झाली या संबंधीची घोषणा करण्यात आली. त्या जल्लोशाचा आणि आनंदाचा आजचा दिवस आहे, या औचित्याच्या मुद्याद्वारे श्रीमती इंदिरा गांधी यांनी आजच्या दिवशी 40 वर्षापूर्वी केलेल्या घोषणेचे मी स्मरण करतो आणि त्या वेळच्या सैनिकांनी जे बलिदान केलेले होते, जी मर्दुमकी गाजविलेली होती आणि त्या वेळच्या नेतृत्वाने जे शौर्य दाखविलेले होते त्या सर्वांचे या निमित्ताने स्मरण करुन त्यांचे अभिनंदन करु या असा आजचा हा दिवस आहे हे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी महाराष्ट्रातील जनतेवर ज्यांनी राज्य केले, गीत रामायणासह अनेक चांगली गीते लिहिणाऱ्या ग. दि माडगुळकर यांचे स्मारक अद्याप पूर्ण झालेले नाही.. ग. दि. माडगुळकर यांचे स्मारक पुण्यात व्हावे या विषयी अनेक वेळेला मागणी करण्यात आलेली आहे. पुणे महानगरपालिकेने यासाठी आर्थिक तरतूद करुन तीन वर्षे पूर्ण झालेली आहेत परंतु अद्याप या बाबतची कृती झालेली नाही. पुणे-मुंबई रस्त्यावर वाकडेवाडी येथे हे स्मारक उभे करण्याकरिता स्थायी समितीने सन 2008 च्या अंदाजपत्रकामध्ये 1 कोटी 80 लाख रुपये तरतूद करण्यात आली होती. सन 2009-2010 मध्येसुध्दा 1 कोटी 50 लाख रुपयाची तरतूद करण्यात आली होती. एवढी मोठी रक्कम महानगरपालिकेने मंजूर करुन सुध्दा गेल्या तीन वर्षात हे स्मारक त्या ठिकाणी उभे राहिलेले नाही. ग.दि. माडगुळकर यांच्या सारख्या ज्येष्ठ साहित्यकार व गीतकाराचे स्मारक लवकर पूर्ण व्हावे अशी मी विनंती करतो. दोनच दिवसापूर्वी त्यांची पुण्यतिथी झालेली आहे. तेव्हा हे अधिवेशन संपण्यापूर्वी या संदर्भात शासनाने निवेदन करावे आणि हे स्मारक लवकरात लवकर एका वर्षात पूर्ण करण्याबाबत पुणे महानगरपालिकेला आदेश देण्यात यावेत अशी सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

---

**उप सभापती** : औचित्याच्या मुद्यासाठी नंतर वेळ देण्यात येईल. आता औपचारिक कामकाज घेण्यात येईल.

श्री. कपील पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे मी तो थोडक्यात मांडतो.

**उप सभापती** : आपल्याकडे भरपूर वेळ आहे. औचित्याचे मुद्दे नंतर घेण्यात येतील. आता प्रथम औपचारिक कामकाज घेण्यात येईल.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे

श्री. रणजित कांबळे ( सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधान परिषदेच्या सन 2011 च्या दुसऱ्या अधिवेशनात दिलेल्या एकूण 480 आश्वासनांची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावी )

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीचे विवरण सभागृहासमोर ठेवणे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, विधान परिषदेचे सन 1987 चे तिसरे अधिवेशन ते सन 2011 चे दुसरे अधिवेशन या कालावधीत विधान परिषदेत देण्यात आलेल्या आश्वासनापैकी एकूण 471 आश्वासनांवर शासनाने केलेल्या कारवाईबाबतचे विवरण मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : विवरण सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबतचे जोडलेले विवरण छापावे )

----

..5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ( पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचा सन 2008-2009 चा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक लेखे व लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. गुलाबराव देवकर ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2010-2011 चा अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

..6.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उप सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी " मुरुड तालुक्यातील कोर्लई ते अलिबाग तालुक्यातील रेवदंडा दरम्यान दि.3 सप्टेंबर, 2011 रोजी वादळी वाऱ्यामुळे बुडालेल्या 4 मासेमारी नौकांवरील खलाशी बेपत्ता असणे, या घटनेमुळे मच्छीव्यवसायांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते यांनी "डहाणू (जि.ठाणे) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळेत होत असलेला गैरव्यवहार व अपुऱ्या सुविधांमुळे आदिवासी विद्यार्थ्यांचे होणारे मृत्यू." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "ज्वालाग्राही रसायना व्यतिरिक्त मुंबईतील चेंबूर शुध्दीकरण प्रकल्प (नाप्थ्याची वाहतूक) तसेच क्रुड ऑईलची बंद पाईपलाईनमधून होणारी वाहतूक ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी भागातून होत असल्यामुळे तेथे दुर्घटना घडली तर कोणतीही सुरक्षाव्यवस्था नसल्यामुळे नागरिकांचे जीवन धोक्यात येणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या 12 वर्षांहून अधिक काळ सातत्याने उद्‌भवणाऱ्या तापसरीच्या तापाने या वर्षीही 24 जणांचा बळी जाणे, उपजिल्हा रुग्णालयात कर्मचारी वर्गासह सर्व साहित्यांचा पुरवठा, तज्ज्ञ डॉक्टर आदिंबाबतची कार्यवाही अद्यापी न होणे, त्यामुळे स्थानिकांमध्ये पसरलेली उदासिनता." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..7...

**उप सभापती** ..

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र. पाटील यांनी "दिनांक 14 डिसेंबर,2011 रोजी नवी मुंबईतील सी-वूड, नेरुळ येथील डीएव्ही माध्यमिक शाळेवर हल्ला करुन 10 शिक्षकांना झालेली मारहाण, महिला शिक्षकांना झालेली असभ्य धक्काबुक्की, यामुळे नवी मुंबईतील शाळांनी बंद पुकारणे, असाच प्रकार दिनांक 1 डिसेंबर, 2011 रोजी मुंबईतील वांद्रे येथील माणिक विद्यामंदिर या शाळेतही घडणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने तसेच या बाबत कालच निर्णय दिलेला आहे त्याप्रमाणे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझ्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेच्या बाबतीत माननीय उप सभापती यांनी काल निवेदन करण्यास सांगितले आहे त्याप्रमाणे आजच निवेदन होणे आवश्यक आहे.

**उप सभापती** : निवेदन आजच करण्यात येईल. आजचा दिवस अजून संपलेला नाही.

---

**लक्षवेधी सूचना क्रमांक 1 बाबत**

**उप सभापती** : आता लक्षवेधी सूचना क्रमांक 1 चर्चेला घेण्यात येईल.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये अनुक्रमांक चार मध्ये बुधवार, दिनांक 14 डिसेंबर, 2011 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना (क्रमांक -1) असे म्हटले आहे.

**उप सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये क्रमांक 1 वर दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना मी पुकारलेली आहे. कालच्या कुठल्याही लक्षवेधी सूचना आज घेण्यात आलेल्या नाहीत.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये क्रमांक चार मध्ये असे म्हटले आहे की, "बुधवार, दिनांक 14 डिसेंबर,2011 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना (क्रमांक 1 )" ही शिल्लक राहिलेली लक्षवेधी सूचना

..8..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले।.

आज घेण्याचे ठरलेले होते. त्यामुळे ती आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये छापण्याची गरज नाही. ती वेगळी आहे आणि आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये क्रमांक 1 वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना वेगळी आहे.

**उप सभापती** : आपण आता लक्षवेधी सूचना क्रमांक दोन चर्चेला घेऊ तोपर्यंत तो प्रश्न सुटेल.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, आपण द्याल तो निर्णय आम्हाला मान्य आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील वीरमाता जिजाबाई उद्यानाची (राणीचा बाग) झालेली दूरवस्था

**मु. शी.** : मुंबईतील वीरमाता जिजाबाई उद्यानाची (राणीचा बाग) झालेली दूरवस्था यासंबंधी श्रीमती अलका देसाई, सर्वश्री सुभाष चव्हाण, जयप्रकाश छाजेड, भाई जगताप, चरणसिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मुंबई येथे गेल्या 25 ते 30 वर्षापासून 48 एकरांच्या भूखंडावर असलेल्या विरमाता जिजाबाई उद्यानाचे (राणीचा बाग) वैभव लयाला गेल्याचे निदर्शनास येणे, या उद्यानातील अनेक पशु-पक्षी एक-एक करत कमी होत असल्याचे आढळून येणे, मोजकेच प्राणी शिल्लक राहणे, बहुतेक पिंजरे रिकामेच असल्याचे आढळून येणे, बहुतेक पिंजऱ्यात सर्वत्र विष्ठा, पिसे व खरकटे सांडलेले अन्न यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरणे, पिंजऱ्यात असणाऱ्या पशु-पक्षासाठी पुरेसे पाणी नसणे, तसेच प्रवेशद्वाराचे रंगकाम करण्याची नितांत गरज, उद्यानाच्या दर्शनी भागात असलेला बालशिवाजी आणि जिजामातेचा पुतळा पालिकेच्या दुर्लक्षामुळे अतिशय खराब झाला असल्याचे आढळून येणे, उद्यानात पर्यटकांसाठी शौचालयाची व्यवस्था नसणे, पूर्वीचे वैभव हरवलेल्या या उद्यानांची पूर्वीप्रमाणेच वैभव मिळविण्यासाठी पशु-पक्षांची संख्या वाढविण्याची, त्यांना वेळेवर व नियमित अन्न व पाणी देण्याची, सर्वत्र स्वच्छता राखण्याची तसेच पर्यटकांना सर्व सुविधा उपलब्ध करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मुंबई शहरातील कामगार वस्तीमध्ये आणि गरिबांना पाहण्यासारखे जिजामाता उद्यान आहे. सामान्य माणूस पॅरीसला जाऊ शकत नाही परंतु जिजामाता उद्यान बघण्यासाठी जरुर येऊ शकतो. परंतु ते उद्यान बघण्यासारखे आहे की नाही हे बघण्याची जबाबदारी मुंबई महानगरपालिकेची आहे. मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. सदर उद्यानाची जबाबदारी त्या स्वायत्त संस्थेची आहे असे मला वाटते. आपण जर त्या उद्यानामध्ये फेरफटका मारला तर असे दिसून येते की, 48 एकरच्या त्या उद्यानामध्ये आज वाळवंटासारखी अवस्था निर्माण झालेली आहे. एकाही झाडाला पालवी नाही. एकाही प्राण्याच्या चेहऱ्यावर रौनक नाही. त्यांचे राहण्याचे पिंजरे स्वच्छ झालेले दिसत नाहीत. ते स्वच्छ का असू नये ? वाघ हा वाघच असतो, तो शेळी होत नाही आणि जेव्हा शेळी होण्याचा प्रयत्न होतो तेव्हा काय होते याबद्दल मी बोलत नाही. सभापती महोदय, मी नीट लक्ष देऊन हे निवेदन वाचलेले आहे. आदरणीय मुख्यमंत्र्यांनी या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, या उद्यान-प्राणीसंग्रहालयास पुरातन वास्तू श्रेणी 2 (ब) म्हणून घोषित केलेले आहे व दिल्लीला बृहत आराखडा पाठविलेला आहे आणि अमुक एक रक्कम मिळावी म्हणून केंद्र सरकारकडे पत्रव्यवहार केला आहे. केंद्र सरकारच्या पत्रव्यवहारातून साधारणपणे 21.11.2011 रोजी त्यांना अर्धवट उत्तर आलेले आहे. संपूर्ण उत्तर आलेले नाही. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, आम्ही दुरुस्त करु, मंजुरी प्राप्त करुन देऊ. माझा प्रश्न असा आहे की, हा संपूर्ण बृहत आराखडा कधी पास होणार ? बृहत आराखडा पास झाल्यानंतर हे काम मुंबई महानगरपालिका करणार असेल तर आनंदच आहे. त्या बाबत मी काही बोलत नाही. पण सरकारने हे काम आपल्या ताब्यात घेऊन पूर्ण करावे अशी मी सभागृहाच्या वतीने मागणी करते.

या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, 48 एकराच्या जागेमध्ये फक्त चार स्वच्छतागृहे आहेत. त्या ठिकाणी देशातून पर्यटक येतात, महाराष्ट्रातून पर्यटक येतात, शहरातून पर्यटक येतात आणि त्यांच्यासाठी आपण एवढ्या मोठ्या 48 एकरच्या उद्यानामध्ये फक्त चारच स्वच्छतागृहे ठेवलेली आहेत. या बाबतीत मुंबई महानगरपालिकेला काही सुचणार आहे का आणि ते केव्हा सूचणार आहे ? या सभागृहामध्ये चर्चा झाल्यानंतर सूचणार आहे का ? विरोधी पक्षाचे सन्माननीय

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D

श्रीमती अलका देसाई .....

सदस्य सभागृहात उपस्थित नसले तरी त्यांच्या कानावर हे गेले असेल. ते येऊन टुणटुण करतील. मला त्यांचे वागणे माहीत आहे. मला शासनाला सांगावयाचे आहे की, बृहत आराखडा मंजूर होण्यास अजून एक वर्ष लागेल, सहा महिने लागतील की दोन महिने लागतील हे मला ठाऊक नाही परंतु या कामाला तातडीने चालना मिळावी. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, प्राणी संग्रहालयामधील प्राण्यांच्या पिंजऱ्याची स्वच्छता केली जाते. काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी सांगू इच्छिते की, बाकीच्या लोकांना फिरण्यासाठी फार जागा आहेत पण कामगारांच्या मुलांना फिरण्यासाठी जागा नाहीत. त्या ठिकाणी स्वच्छतागृहे बांधत असताना प्राणी संग्रहालयाची स्वच्छता, त्यांच्या खाण्याचा प्रश्न तसेच जो काही आराखडा आहे तो केव्हा पास होणार, त्या प्राण्यांना कधी चांगले दिवस येणार आणि पुन्हा त्या राणीच्या बागेला गतवैभव कधी प्राप्त होणार ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या अलकाताई देसाई यांनी अत्यंत मूलभूत अशा प्रकारचे चार प्रश्न उपस्थित केलेले आहेत. हा जो एकंदरीत बृहत आराखडा तयार केलेला होता, जो प्लॅन तयार केलेला होता त्या आराखड्याला पार्टली मंजुरी मिळालेली आहे पण उर्वरित प्लॅनला मंजुरी कधी मिळणार हा त्यांचा पहिला प्रश्न आहे. एकंदरीत या पार्कचे संपूर्णपणे रिनोव्हेशन करण्याकरिता, त्या ठिकाणी अद्ययावत अशा प्रकारचे तांत्रिकदृष्ट्या नवीन सायन्स वापरावे, एका बाजूला प्राणी संग्रहालयाच्या प्राण्यांची मोठ्या प्रमाणामध्ये भर टाकावी आणि दुसऱ्या बाजूला बॉटनीकल गार्डन सुध्दा त्या ठिकाणी करावे अशा प्रकारचा हा आराखडा होता. परंतु काही पर्यावरणवादी लोकांनी त्या वेळेला हायकोर्टामध्ये एक जनहित याचिका दाखल केली. ती याचिका दाखल केल्यानंतर हायकोर्टाने असे सांगितले की, जी सेंट्रल झू ॲथॉरिटी आहे त्यांच्या गाईडलाईन्स प्रमाणेच त्या ठिकाणचा पूर्ण प्लॅन तयार करावा. हे सर्व प्रकरण वारंवार कोर्टामध्ये गेले आणि त्या ठिकाणी जे मूळ पाथ-वे वगैरे आहेत त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल न करता त्यांनी आहे त्याच पध्दतीचा पाथ-वे वगैरे करावा आणि आहे त्याच पध्दतीने, हेरिटेज इमारत वगैरे असल्यामुळे त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये असे सांगितल्यामुळे हा बृहत आराखडा आता 150 कोटी रुपयांवर आलेला आहे. या आराखड्याला 21 नोव्हेंबर, 2011 ला मान्यता

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

मिळालेली आहे आणि त्या अनुषंगाने लवकरच कार्यवाही सुरु होणार आहे. एक गोष्ट खरी आहे की, मुंबईतील राणीचा बाग ही खऱ्या अर्थाने मुंबईची खरी ओळख आहे म्हणून मुंबई महानगरपालिकेने ज्या काळजीपूर्वक हे प्रकरण हाताळावयास पाहिजे होते तसे हाताळले नाही, ही गोष्ट खरी आहे. दुसरी बाब अशी की, या निवेदनामध्ये जरी पिंजऱ्याची साफसफाई केली जाते असे म्हटले असले तरी सुध्दा थोडेसे आम्हाला ते पटत नाही म्हणून आजच संबंधित अधिकाऱ्यांना त्या संदर्भात अत्यंत कडक शब्दामध्ये सूचना देण्यात आलेल्या आहेत आणि आता या कामाला याच वर्षी सुरुवात होईल अशा प्रकारची सद्य परिस्थिती आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, आताच माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले परंतु मला असे वाटते की, मुंबई महानगरपालिकेचे बजेट 21 हजार कोटी रुपयांवरुन आता 26 हजार कोटी रुपयांवर आलेले आहे आणि मुंबई महानगरपालिकेचा कारभार पाहिला तर ती महानगरपालिका राणीच्या बागेकडे जास्त लक्ष देईल असे मला बिलकुल वाटत नाही. आपण जर त्यांच्यावर विसंबून राहिलो तर राणीच्या बागेमध्ये कधीच सुधारणा होणार नाही. माननीय मंत्री महोदयांनी 150 कोटीचा आराखडा मंजूर झाल्याचे सांगितले. मुंबई महानगरपालिकेचे बजेट आपण पाहिले तर प्रत्येक बाबतीत कोट्यवधी रुपयांचे आकडे आहेत. पण गार्डन असो, प्ले ग्राऊंड असो किंवा राणीचा बाग असो, कोणत्याही बाबतीत त्या ठिकाणी जेवढे आकडे दाखविले जातात तेवढी रक्कम खर्च होत नाही. आज सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न या सभागृहामध्ये उपस्थित केलेला आहे. त्या ठिकाणी शासनाने स्वत: लक्ष घालणे फार महत्वाचे आहे. कारण महानगरपालिकेचा एकंदर कारभार बघता त्या ठिकाणी जिजामातेचा पुतळा आणि इतर पुतळ्यांची जी दुर्दशा झालेली आहे तोही एक महत्वाचा विषय आहे. म्हणून मला माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, हे काम महापालिकेवर सोडण्यात काही अर्थ नाही. आपल्या देशामध्ये गरीब माणसाची, भिक्षेकऱ्यांची सुध्दा रस्त्यावर जेवढी दुर्दशा आहे तीच दुर्दशा आज राणीच्या बागेतील प्राण्यांची आहे. त्यामुळे ते शौक आपल्याला परवडणारे नाहीत. आपण मूक

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ....

प्राण्यांचे हाल करण्यात अर्थ नाही. हे 150 कोटी रुपये सुध्दा भ्रष्टाचारात जातील. तेव्हा त्यावर काही तरी चांगली उपाययोजना स्वत: शासन करणार असेल तरच त्याच्यात काही तरी अर्थ आहे, अन्यथा हे 150 कोटी रुपये भ्रष्टाचारामध्येच जाणार आहेत. माझा असा प्रश्न आहे की, शासन स्वत: यामध्ये काही तरी करणार आहे का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई याचा असा आग्रह दिसतो की, हा विकास मुंबई महानगरपालिकेने करण्याऐवजी शासनाने करावा. परंतु मुंबई महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हक्कांवर आणि अधिकारांवर शासन स्वत: कोणत्याही प्रकारची गदा आणू इच्छित नाही. पण एक गोष्ट मात्र करता येईल. गेले कित्येक वर्ष याकडे दुर्लक्ष झालेले आहे. 150 कोटी रुपयांपैकी या वर्षी 70 कोटी रुपयांची तरतूद बजेटमध्ये झालेली आहे परंतु या वर्षी 70 कोटी रुपये खर्च होणार नाहीत. आता कोणत्याही क्षणी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या आचारसंहितेची घोषणा होईल. पण चुकीचे टेंडर काढून फक्त क्रेडीट मिळविण्याचा प्रयत्न जर झाला तर त्या बाबतीत कशा पध्दतीने काळजी घेता येईल, हे पाहिले जाईल. शासन महानगरपालिकेचे, स्थानिक स्वराज्य संस्थेचे हक्क अबाधित ठेऊन त्यावर निश्चितपणे बारकाईने नजर ठेवील. कारण हे केवळ मुंबईपुरते मर्यादित नाही तर मुंबई ही संपूर्ण राज्याची राजधानी असल्यामुळे राणीची बाग आपणा सर्वांचे भूषण आहे. म्हणून त्यावर सरकार निश्चितपणे काळजीपूर्वक लक्ष ठेवील.

---

..7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाराष्ट्र पोलीस दलात महाराष्ट्र पोलीस सेवा संवर्गातून भारतीय पोलीस सेवा संवर्गात विलीन करण्याचे कमी असलेले प्रमाण

**मु. शी.** : महाराष्ट्र पोलीस दलात महाराष्ट्र पोलीस सेवा संवर्गातून भारतीय पोलीस सेवा संवर्गात विलीन करण्याचे कमी असलेले प्रमाण यासंबंधी सर्वश्री सतीश चव्हाण, दीपकराव साळुंखे, अनिल भोसले, जयवंतराव जाधव, सुभाष भोईर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सतीश चव्हाण ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र पोलीस दलात महाराष्ट्र पोलीस सेवा (म.पो.से.) संवर्गातून भारतीय पोलीस सेवा (भा.पो.से) संवर्गात विलीन करण्याचे प्रमाण कमी असणे, दर पाच वर्षांनी भापोसे संवर्गाचा आढावा घेणे अपेक्षित असतांना सन 2008 चा संवर्ग आढावा सन 2010 मध्ये करण्यात येणे, सद्य:परिस्थितीत राज्यात मपोसे मधून भापोसे संवर्गात भरावयाची 34 पदे रिक्त असतांना शासनामार्फत सदर पदे भरणेबाबत ठोस कार्यवाही करण्यात न येणे, सुमारे 20 ते 21 वर्षाचा सेवा कालावधी होवूनही मपोसे संवर्गाच्या कार्यक्षम अधिकाऱ्यांना भापोसे संवर्गात समाविष्ट करुन न घेणे, सदर अधिकारी यांना दुय्यम व सापत्न दर्जाची वागणूक दिली जाणे, परिणामी त्यांच्यात पसरलेला असंतोष, तसेच सी.ए.टी.शाखा मुंबई यांनी दि. 25 ऑगस्ट, 2011 रोजी तीन महिन्याच्या आत संबंधित अधिकाऱ्यांना भापोसे संवर्गात घ्यावे व दिनांक 1 जानेवारी, 2009 पासून लाभ देण्याचे आदेश देवून अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...8...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...9 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी आय.पी.एस. होऊ नये म्हणून जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात आहेत. ऑगस्टमध्ये कॅटने निकाल दिलेला आहे की, तीन महिन्याच्या आत त्यांना आय.पी.एस.चे प्रमोशन द्यावे. निवेदनात म्हटल्याप्रमाणे आवश्यक तो प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्याची कारवाई करण्यात येत आहे. ही कारवाई एप्रिल, 2011 पासून आजपर्यंत प्रलंबित का राहिलेली आहे ?

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण....

माझा प्रश्न असा आहे की, इतर राज्यातील पोलिसांची महाराष्ट्रात लॉबी असून राज्यातील कार्यक्षम अधिकाऱ्यांचे खच्चीकरण करण्यासाठी त्यांना जाणीवपूर्वक दुय्यम वागणूक दिली जाते असे निदर्शनास आले आहे. हा विलंब जाणीवपूर्वक होत आहे काय आणि केंद्र शासनाकडे याबाबतचा प्रस्ताव किती दिवसात पाठविण्यात येणार आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, दरवर्षी रिक्त पदांचा आढावा घेतला जातो. केंद्र शासनाने कळविल्या प्रमाणे रिक्त जागांचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येतो. 2008 मधील 3 व 2009 मधील 4 अशा एकूण 7 पदांना मंजुरी मिळालेली आहे. राहिलेल्या 27 पदांचा प्रस्ताव पुढील 2 महिन्यामध्ये पाठविणार आहोत. मधल्या काळामध्ये केंद्र सरकारने नियमामध्ये दुरुस्ती केली आहे. त्यामुळे संपूर्ण केडरचा रिव्ह्यू घेण्यात येत होता. त्यानुसार 280 पदे होती ती 302 झाल्यामुळे थोडासा विलंब झालेला आहे. याबाबत राज्यात कोणतीही लॉबी कार्यान्वित नाही. मुद्दामहून विलंब झालेला नाही. एसीआर येण्यामध्ये काही अडचणी होत्या. परंतु या सर्व बाबींची पूर्तता करुन दोन महिन्यात केंद्र शासनाकडे प्रस्ताव दिला जाईल.

श्री.हेमंत टकले : राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी उपलब्ध असलेले वरिष्ठ दर्जाचे पोलीस अधिकारी कमी आहेत. महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार वरिष्ठ पदावर नेमण्यासाठी अडचणी निर्माण होतात. त्यामुळे कधी तरी वर्तमानपत्रात चौकटीत अशी बातमी येते की, किती तरी वर्षांनी या राज्याच्या पोलीस प्रमुखपदी मराठी व्यक्तीची नियुक्ती झाली आहे. राज्याच्या पोलीस दलाची आखणी करताना जे त्या पदासाठी लायक आहेत त्यांचा प्रस्ताव योग्य वेळेला केंद्र सरकारकडे पाठविला नाही तर कदाचित त्यांची वयोमर्यादा उलटून जाईल. त्यांना मिळणाऱ्या अधिकारापासून ते वंचित होण्याची शक्यता आहे. म्हणून शासनाने परराज्यातून येणारे आयपीएस दर्जाचे अधिकारी, आपल्या राज्यातील परराज्यात गेलेले अधिकारी यांचा ताळमेळ राखण्याची गरज आहे. या कामासाठी जेवढा वेळ वाया जाईल तेवढा वेळ राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांवर अन्याय करीत आहोत अशी भावना निर्माण होईल. या दृष्टीने त्वरेने या प्रस्तावावर गांभीर्याने विचार करुन यात सुधारणा करण्यात येईल काय ?

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, केंद्र सरकारने 2010 मध्ये नियमात सुधारणा केलेली आहे. त्यानुसार ज्या वर्षात हे अधिकारी त्या पदासाठी पात्र असतील त्या वर्षातील वय गृहित धरण्यात यावे अशा सूचना केंद्र सरकारने दिलेल्या आहेत. त्यामुळे वयाची कोठेही अडचण येत नाही. रिक्त असलेल्या जागा पुढच्या वर्षी डीपीसीने मान्य केल्या तरी त्या मागील वर्षाप्रमाणे गृहित धरल्या जातात. या सगळया बाबतीत सुसूत्रता येण्यासाठी रिक्त जागाची माहिती केंद्र सरकारकडून राज्याकडे आल्यानंतर त्या त्या वर्षी ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी निश्चितपणे नवीन उपाययोजना केल्या जातील. राज्यातील मराठी पोलीस अधिकाऱ्यांवर कोणताही अन्याय होणार नाही याची दक्षता शासन घेईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : अनेक राज्यांमध्ये त्या राज्यातील पोलीस दल आणि भारतीय पोलीस दल यांचे प्रमाण 50 : 50 टक्के आहे. स्टेट केडर व नॅशनल केडर यांचे प्रमाण 50 : 50 टक्के आहे. तशा प्रकारचे प्रमाण आपल्या राज्यामध्ये राबविण्याबाबत शासनाचे कोणते धोरण आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, केडरच्या बाबतीत संपूर्ण देशात 33 टक्क्याचा नियम आहे. 50 टक्के वगैरे काही नाही.

श्री.किरण पावसकर : उत्तर प्रदेश राज्यामध्ये 50 : 50 टक्क्याचे प्रमाण आहे. त्या ठिकाणी 33 टक्क्याचे प्रमाण नाही. महाराष्ट्र पोलीस दल व भारतीय पोलीस दल यांच्या बाबतीत वेगवेगळया असंख्य वृत्तपत्रात छापून आलेले आहे की, आयपीएस अधिकाऱ्यांच्या लॉबीमुळे राज्यातील कार्यक्षम अधिकाऱ्यांचे मनोबल खच्चीकरण करण्यासाठी त्यांना जाणीवपूर्वक दुय्यम वागणूक दिली जाते असे निदर्शनास आले आहे. त्यांच्या या वागणुकीची शासन चौकशी करणार आहे काय, त्यात असे काही आढळून आले तर त्यावर तातडीने उपाययोजना केली जाईल काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, आयपीएस रिक्रुटमेण्ट रुल्स माझ्याकडे आहेत. बढतीसाठी संपूर्ण देशामध्ये 33 टक्के हेच प्रमाण लागू आहे. मी मघाशी म्हटल्या प्रमाणे राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांवर अन्याय होणार नाही. भविष्य काळासाठी कायम स्वरुपी एक सिस्टिम सुरु करण्याचा प्रयत्न गृह खात्याचा राहील. जेणे करुन एसीआर देण्याची पूर्तता करणे किंवा राज्य शासनाला केंद्र शासनाकडे ज्या ज्या गोष्टींची पूर्तता करावी लागते ती कालबध्द पध्दतीने होईल यासाठी सिस्टिम निर्माण करु.

3....



NTK/ MMP/ D/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत मला देखील माझे विचार मांडावयाचे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी 50 : 50 टक्क्यांचा मुद्दा मांडलेला आहे. मंत्री महोदय, आपण असे सांगितले की, नियमानुसार आयपीएस अधिकाऱ्यांचे रिक्रुटमेंटचे प्रमाण राज्यात 33 टक्के आहे. हा नियम असला तरी राज्यातील वस्तुस्थिती तशी नाही हे मी आपल्याला सांगू इच्छितो. पोलीस दलामध्ये 50 टक्के राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांचे व 50 टक्के आयपीएस अधिकाऱ्यांचे प्रमाण नसते असे आपण म्हणत असलात तरी राज्यात ही विषमता फार मोठ्या प्रमाणात आहे. मला असे वाटते की, राज्याच्या गृह विभागाने ही परिस्थिती तपासून बघितली पाहिजे. वस्तुस्थिती तशी असेल तर राज्यातील पोलीस दलाला न्याय देण्याची भूमिका या राज्य शासनाने घेतली पाहिजे.

या अनुषंगाने गृह विभागाला मी सूचवू इच्छितो की, 7 पदांसाठी दिनांक 11.11.2011 रोजी संघ लोकसेवा आयोगाची बैठक झालेली आहे. त्या बैठकीच्या कार्यवृत्ताला शासनाकडून मान्यता मिळाल्याचे त्वरित कळविण्यात यावे. तसेच दिनांक 30 मार्च, 2011 रोजीच्या पत्रान्वये केंद्र सरकारने 27 पदांचा प्रस्ताव मागवूनही तो अद्याप शासनाने न पाठविणे ही बाब गंभीर आहे. हा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनास पुढील कार्यवाहीसाठी त्वरित पाठवावा.

तिसरी बाब अशी की, न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार उपलब्ध झालेल्या 20 पदांचे प्रस्ताव त्वरित केंद्र शासनाकडे पाठवावेत, जेणे करुन राज्यातील अधिकाऱ्यांना काही कारण नसताना केवळ शासकीय दिरंगाईमुळे आपल्या बढतीला मुकावे लागत असेल तर तो त्यांच्यावर अन्याय होत आहे. हा अन्याय राज्याच्या गृह खात्याने त्वरित दूर करावा असे मी शासनाला निर्देश देत आहे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी मघाशी म्हटल्या प्रमाणे 50 : 50 टक्क्याची बाब तपासून घेण्यात येईल. आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेमणुकीबाबत केंद्र सरकारने निर्णय घेतलेला आहे हे मी सांगू इच्छितो. परंतु राहिलेल्या 27 पदांबाबतचा प्रस्ताव दोन महिन्यात केंद्र शासनाला सादर करण्यात येईल.

-----

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील विविध भागातील प्रयोगशाळांमध्ये परिक्षण केलेल्या खतांच्या नमुन्यापैकी साडेतरा टक्के नमुने निकृष्ट दर्जाचे आढळून येणे

**मु. शी.** : राज्यातील विविध भागातील प्रयोगशाळांमध्ये परिक्षण केलेल्या खतांच्या नमुन्यापैकी साडेतरा टक्के नमुने निकृष्ट दर्जाचे आढळून येणे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्या अनुपस्थित. )

-----

5......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. शासनाने कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी 2 हजार कोटीचे पॅकेज दिले आहे त्याबाबत मी सुरुवातीलाच शासनाला मनापासून धन्यवाद देतो. त्याच बरोबर गेल्या वर्षी अवेळी पडलेला पाऊस व नैसर्गिक आपत्तीमुळे कोकणातील जवळजवळ 14,524,21 हेक्टरवरील आंब्याची फळे खराब झाली होती. त्यामुळे हेक्टरी 20 हजार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल असे गेल्या वर्षी शासनाने जाहीर केले होते. त्याची रक्कम 26 कोटी होती. ती रक्कम अद्यापपर्यंत तेथील शेतकऱ्यांना मिळालेली नाही. ही रक्कम शेतकऱ्यांना तातडीने उपलब्ध करुन द्यावी. माननीय कृषी मंत्र्यांनी अतिशय प्रामाणिकपणे भूमिका घेतली होती. शासनाने तसा सर्व्हे केलेला होता. मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी याबाबत ठोस कार्यवाही करावी.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्यांनी कोकणातील पिकाबाबत आपली भूमिका मांडलेली आहे त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही निश्चितपणे केली जाईल.

------

नंतर श्री.गिते......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, गेल्या आठवडयामध्ये या विभागातील अनेक स्वातंत्र्य सैनिक आपल्या मागण्यांसाठी विधान भवनाच्या जवळ असलेल्या एका पुतळयाच्या परिसरात उपोषणाला बसलेले होते. त्यांनी गेल्या अधिवेशनात मागण्या मांडल्या होत्या, परंतु त्यांच्या मागण्यांकडे सरकारने लक्ष दिले नाही. सरकारने त्यांच्या मागण्यांची दखल घेतली नाही म्हणून ते नाराजीने उपोषणास बसले होते. 80-90 वय झालेले स्वातंत्र्य सैनिकांनी या उपोषणात भाग घेतला होता. त्यांच्या अनेक मागण्या अनेक वर्षापासून सरकार दरबारी प्रलंबित आहेत. या स्वातंत्र्य सैनिकांची आर्थिक परिस्थिती अतिशय हालाखीची झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या एका मागणीचा मी या ठिकाणी उल्लेख करणार आहे. मृत स्वातंत्र्य सैनिक विधवांच्या अंत्ययात्रेस रुपये 1000 ऐवजी रुपये 5000 इतका वाढीव निधी मिळावा एवढी किरकोळ मागणी त्यांनी शासनाकडे केलेली आहे. त्या मागणीकडे देखील सरकारने दुर्लक्ष केलेले आहे. त्या मागणीच्या बाबतीत सरकारने त्यांना नकारात्मक उत्तर दिलेले आहे. त्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांमध्ये तीव्र नाराजीची व तीव्र असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे. म्हणून या गोष्टीकडे औचित्याच्या मुद्याव्दारे सरकारचे लक्ष वेधतो आणि सभापती महोदय, याबाबतीत सरकारला आपण निर्देश द्यावेत, अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : याबाबतीत शासनाने गंभीर दखल घ्यावी.

आता दुपारचा 1.00 वाजलेला आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी औचित्यांचे मुद्दे दिलेले आहेत. आता मध्यंतरासाठी सभागृहाचे कामकाज दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

( दुपारी 01.01 ते 02.00 पर्यंत मध्यंतर. )

---

यानंतर श्री.भोगले..

(मध्यंतरानंतर)

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 30 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे. दुपारी 2.30 वाजता सभागृहाची बैठक पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.00 ते 2.30 वाजेपर्यंत स्थगित झाली)

-------

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 30 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे. दुपारी 3.00 वाजता सभागृहाची बैठक पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 2.31 ते 3.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)**

**बेळगाव-कारवार सीमा प्रश्नाबाबत**

श्री. रामदास कदम :बेळगाव-कारवार सीमा भागाचा प्रश्न हा महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेचा जीवन मरणाचा प्रश्न आहे. या विषयाच्या संदर्भातील ड्राफ्ट तयार करण्यासंदर्भात दुपारी बैठक झाली होती, त्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मंत्री महोदय तसेच गट नेते सुध्दा उपस्थित होते. या विषयाच्या संदर्भात एकदा निर्णय झाल्यानंतर सुध्दा दोन ओळीचा ड्राफ्ट तयार होत नसेल तर हे सरकार नेमके काय करीत आहे असा मला प्रश्न पडला आहे. या सदनाचा वेळ विनाकारण घेण्याचा तुम्हाला अधिकार नाही. अधिवेशनाच्या कामासाठी एक एका मिनिटासाठी लाखो रुपये खर्च होत असतात व एका ड्राफ्टसाठी जर सभागृहाचा दोन तासाचा वेळ वाया जात असेल तर ते योग्य नाही.

**तालिका सभापती ( श्री. रमेश शेंडगे )** : या विषयाच्या संदर्भात केंद्र शासनाला जो ड्राफ्ट पाठवावयाचा आहे त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री तसेच माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी ड्राफ्ट तयार केला असून 15 मिनिटातच तो सभागृहात मांडला जाणार आहे त्यामुळे 15 मिनिटांसाठी सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात येत आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातील ड्राफ्टमध्ये "बरखास्त" हा शब्द येणे आवश्यक आहे. ड्राफ्टमध्ये "बरखास्त" हा शब्द नसेल तर आम्ही सभागृहाचे कामकाज चालवू देणार नाही. बेळगाव-कारवार सीमा भागाच्या प्रश्नाबद्दल मराठी माणसाची अस्मिता जोडली गेली असतांना ड्राफ्ट तयार करण्यासाठी आपल्याला दोन तासाचा वेळ लागतो खरे म्हणजे ही मराठी माणसाची चेष्टा आहे.

श्री. एस.क्यू.जमा : सभापति महोदय, सामने बैठे हुए माननीय सदस्यों को आप बोलने का मौका देंगे और हमें बोलने का मौका नहीं देंगे तो यह हम पर अन्याय होगा. मेरा कहना है कि इस बारे में जितनी चिंता उनको है, उतनी ही चिंता हमको भी है. इसलिए हमारा भी यही कहना है कि यह ड्राफ्ट जल्द से जल्द तैयार किया जाना चाहिए.

मेरा दूसरा पाइंट आफ आर्डर यह है कि यह ड्राफ्ट कितनी देर में पूरी तरह से तैयार हो पाएगा, इसका एक सही अंदाज लिया जाए और उसी हिसाब से हाऊस स्थगित किया जाए ताकि

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा...

हम उतने समय में दूसरे काम कर सकें. बार-बार, आधे-आधे घंटे के लिए सभागृह स्थगित करने की वजह से न तो हम हाऊस में काम कर पा रहे हैं और न ही हाऊस के बाहर हम कोई दूसरा काम पूरा कर पा रहे हैं.

**तालिका सभापति** : यह ड्राफ्ट 15 मिनट में तैयार हो जाएगा तथा जो बात आप चाहते हैं, वह बात तथा अन्य माननीय सदस्य जो बात चाहते हैं, वे सभी बातें इस ड्राफ्ट में आ जाएंगी.

सभागृहाची बैठक आता स्थगित करण्यात येत असून सभागृहाची बैठक 3 वाजून 20 मिनिटांनी पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 3.03 ते 3.20 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

---

यानंतर श्री. भारवि...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.**: कर्नाटक सरकारने बेळगाव महानगरपालिका अकारण व भाषिक द्वेषातून बरखास्त करणे.

**मु.शी**: कर्नाटक सरकारने बेळगाव महानगरपालिका अकारण व भाषिक द्वेषातून बरखास्त करणे विषयावर माननीय उप मुख्यमंत्री यांचा ठराव.

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील ठराव मांडतो.

"कर्नाटकातील मराठी भाषिक सीमा भागातील मराठीपण जपणाऱ्या महाराष्ट्र एकीकरण समितीचे बहुमत असणारी बेळगाव महानगरपालिका कर्नाटक सरकारने अकारण व भाषिक द्वेषातून गुरूवार, दिनांक 15 डिसेंबर 2011 रोजी बरखास्त केल्याची घोषणा त्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

या भाषिक अल्पसंख्यांक असणाऱ्या मराठी जनतेवर कर्नाटक सरकारच्या या अन्यायकारक व अवमानजनक कृतीबाबत संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली असून राज्यात तीव्र असंतोष पसरलेला आहे.

कर्नाटक सरकारच्या या बेकायदेशीर व घटनाबाह्य कृतीबाबत हे सभागृह तीव्र निषेध व्यक्त करते. कर्नाटक शासनाचे हे कृत्य संपूर्णपणे घटनाबाह्य असल्याचे या विधान परिषदेचे ठाम मत असून घटनात्मक तरतुदीप्रमाणे कर्नाटक शासनावर कठोर कारवाई करावी अशी विनंती ही विधान परिषद एकमताने केंद्र शासनाला करते.

तसेच बेळगाव महानगरपालिकेची बरखास्ती रद्द करून ही महानगरपालिका पुनर्स्थापित करावी अशा प्रकारचे निदेश केंद्र शासनाने कर्नाटक शासनाला द्यावेत अशीही शिफारस ही विधान परिषद केंद्र शासनाला करीत आहे.

महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नाबाबत सर्वोच्च न्यायालयात असलेल्या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत हा प्रदेश केंद्र शासित करावा अशीही शिफारस ही विधान परिषद केंद्र शासनाला करते."

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

सभापती महोदय, मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या वतीने व राज्य शासनाच्या वतीने हा ठराव मांडलेला आहे. बेळगाव कारवार, निपाणीसह सगळा प्रदेश महाराष्ट्रामध्ये सामील झाला पाहिजे अशा प्रकारची मागणी सीमा भागातील मराठी भाषिक अनेक वर्षापासून करीत असल्याचे आपण पाहतो आहोत. यासाठी बेळगाव मधील काही पिढ्या पाठपुरावा करीत आहेत. याबाबत महाराष्ट्राच्या जनतेच्या भावना किती तीव्र आहेत हे देशातील सर्व जनतेला वेळोवेळी समजले आहे. मागच्या काळामध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीचे मराठी भाषिक उमेदवार निवडून येत होते. परंतु, त्यांचाही आवाज कर्नाटक सरकारने सातत्याने दाबण्याचा प्रयत्न केला आहे. तरी देखील त्यांनी आपल्या भूमिकेसंबंधी केंद्रामध्ये पाठपुरावा केला आहे. तसेच याबाबत महाराष्ट्रातील सरकारने देखील त्यांना मदत करण्याची भूमिका घेतली आहे, हे आपण नेहमीच बघितले आहे. मी येथे ठराव मांडला असला तरी एक गोष्ट मला सांगितली पाहिजे.

कर्नाटक सरकार लोकांमधून निवडून आलेले आहे. आपण लोकशाही मानणारे आहोत. लोकशाहीमध्ये निवडून आलेल्यांनी इतरांवर अन्याय करायचा नसतो. बेळगाव महानगरपालिका ही तेथील लोकांनी बहुमताने निवडून दिली होती. महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. त्यामुळे महानगरपालिकेत कामकाज करीत असताना महापौर, उप महापौर यांना स्वत:चे निर्णय घेण्यासाठी व सभागृहाचे कामकाज करण्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्य आहे, मत स्वातंत्र्य आहे. त्यानुसार त्यांनी स्वत:ची अशी काही भूमिका घेतली. ती भूमिका कर्नाटक सरकारला आवडली नाही म्हणून कर्नाटक सरकारने त्यांच्या हातामध्ये असलेल्या अधिकाराचा वापर करून गैरफायदा उठविला व बेळगाव महानगरपालिका बरखास्त करण्याचा निर्णय अतिशय द्वेषातून घेतला आहे. खरे तर अशा प्रकारची टोकाची भूमिका घेऊन ते वागत असतील तर कर्नाटक सरकार बरखास्त करण्याची भूमिका केंद्र सरकारने घेतली पाहिजे. कारण ते जसे निवडून आलेले आहेत तसेच हे देखील निवडून आलेले आहेत. त्यामुळे असा भेदभाव करून चालत नाही. बेळगाव परिसरामध्ये असणाऱ्या मराठी शाळांवर अन्याय करण्याचे काम कर्नाटकने वेळोवेळी केलेले आहे.

आपण आपल्या भागामध्ये असणाऱ्या कर्नाटक शाळांमध्ये कधीही दुजेपणाची वागणूक दिलेली नाही. आपल्या देशाच्या घटने नुसार अल्पसंख्याकांना संरक्षण देण्याची

...3



BGO/ शरद 15:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जबाबदारी त्या त्या राज्याची असते. परंतु, तशा प्रकारची भूमिका कर्नाटक सरकार कधीही पाळत नाही हे ही आपण सगळ्यांनी अनेक उदाहरणावरून पाहिलेले आहे. किती तरी आंदोलने झाली. अनेक राजकीय पक्षाच्या मोठ्या नेत्यांनी बेळगावमध्ये जाऊन आंदोलने केल्याचे देखील आपण पाहिलेले आहे. परंतु, नेहमी आंदोलने चिरडून टाकण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकारने केलेला आहे. कुठेच न्याय मिळत नाही म्हणून शेवटी आपण सर्वोच्च न्यायालयात गेलो आहोत. सर्वोच्च न्यायालयात केस सुरू आहे.

वेळोवेळी राज्याचे माननीय मुख्यमंत्री, मी स्वत: व आमच्यातील बाकीचे सहकारी असतील किंवा केंद्र शासनामध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणारे वेगवेगळे राष्ट्रीय नेते असतील किंवा प्रमुख मान्यवर असतील त्यांनी देखील या प्रश्नामध्ये लक्ष घातले आहे. सन्माननीय श्री.शरद पवार साहेब, सन्माननीय श्री.विलासराव देशमुख व सन्माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे साहेब असतील ह्या तिघांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद भूषविले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील मराठी भाषिकांच्या सीमा प्रश्नासंबंधी भावना किती तीव्र आहेत, हे त्यांना देखील माहिती आहे. आता सर्वोच्च न्यायालयामध्ये मॅटर आहे. त्यासाठी आपण चांगल्यात चांगले वकील देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने लवकरात लवकर निकाल लावावा अशी आपणा सर्वांची मागणी आहे. परंतु, तेथेही थोडासा विलंब होत आहे, ही वस्तुस्थिती आपण नाकारत नाही. भाजप-शिवसेना, काँग्रेस-राष्ट्रवादी किंवा एकट्या काँग्रेसचे सरकार ज्या ज्या वेळी सत्तेवर होते त्या त्या वेळी त्या सरकारने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सीमा प्रश्नाला न्याय देण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची भूमिका बजावण्याचा प्रयत्न केला आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा शेवट देखील महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील मराठी जनतेला दिलासा देण्यासाठी करण्यात येतो. तेथील मराठी जनतेला आपण एकटे आहोत असे वाटता कामा नये, आपल्या मागे संपूर्ण महाराष्ट्र उभा आहे. महाराष्ट्रातील सव्वा अठरा कोटी जनता आपल्या मागे उभी आहे, हे आपण वेळोवेळी सांगण्याचा प्रयत्न करत असतो. आझाद मैदानावर वेगवेगळ्या प्रकारची आंदोलने झाली आहेत. ती आपण सर्वांनी बघितली आहेत.

आज कर्नाटकमध्ये कुणाचे सरकार आहे, कुणाचे नाही याला महत्त्व नाही. जे कोणी तेथे राज्यकर्ते आहेत, त्या राज्यकर्त्यांनी समंजस भूमिका घ्यायला हवी होती. इतकी टोकाची भूमिका घेणे योग्य नाही. लोकांनी निवडून ..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिलेल्या महानरपालिकेतील महापौर, उप महापौर, नगरसेवकांचा आवाज दाबण्याचे काम झालेले आहे ते बरोबर नाही. येथे लोकशाहीचा गळा घोटण्याचे जे काम झालेले आहे, त्याचा देखील मी तीव्र शब्दामध्ये निषेध करतो. आज मी जो ठराव मांडलेला आहे त्यास दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी पाठिंबा द्यावा

यानंतर श्री.सरफरे....

अप्रसिद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

देशातील जनतेला या ठरावाच्या निमित्ताने एक संदेश दिला पाहिजे की, कर्नाटकच्या सीमा भागातील मराठी भाषिक जनता ही एकटी नाही तर उभा महाराष्ट्र त्या सर्वांच्या पाठीशी आहे. त्यांच्यावर वेगवेगळया प्रकारे सातत्याने अन्याय करण्याची भूमिका कर्नाटक सरकार घेत आहे ती कोणत्याही परिस्थितीत तातडीने थांबविली पाहिजे.कर्नाटक सरकारची आजपर्यन्तची भूमिका बघितल्यानंतर ते हे प्रकार थांबवतील अशी कुणीही खात्री देऊ शकत नाही. म्हणून राज्य सरकारच्या वतीने केंद्र सरकारला विनंती करीत आहोत. जर तेथील राज्यकर्त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या सत्तेचा वापर योग्यरितीने केला नाही तर ते राज्य सरकार बरखास्त करण्याची भूमिका केंद्र सरकार घेऊ शकते. त्या बाबतीत आपल्याला पाठीमागील अनेक दाखले देता येतील त्यामध्ये वेगवेगळया पध्दतीने केंद्र सरकारने तेथील राज्य सरकार बरखास्त केल्यामुळे ते राज्य पुन्हा निवडणुकीला सामोरे गेले आहे. सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, 1980 साली केंद्र सरकारने त्यावेळचे महाराष्ट्र सरकार काही मुद्यांसाठी बरखास्त केले होते. त्यावेळचे मुद्दे बघितले तर ते थोडे कमी महत्वाचे होते. परंतु या ठिकाणी आजचा मुद्या हा अतिशय महत्वाचा असल्यामुळे केंद्र सरकारने या ठरावावर ताबडतोबीने कारवाई केली पाहिजे अशाप्रकारची अपेक्षा या ठरावाच्या निमित्ताने आणि चर्चेच्या निमित्ताने सभागृहापुढे व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

ठराव प्रस्तुत झाला.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या ठरावाला उप सूचना द्यावयाची आहे.

सभापती महोदय, माझी उप सूचना अशी आहे की, या विधानपरिषदेच्या माध्यमातून, शासनाच्या माध्यमातून हे घटनाबाह्य कृत्य असल्याचे आपण केंद्र सरकारला सांगणार आहोत. ज्या पध्दतीने एखादे सरकार बेळगाव महानगरपालिका बरखास्त करुन तेथील मराठी भाषिक जनतेच्या मुळावर येऊन घटनाबाह्य कृती करीत असेल तर ते सरकार बरखास्त केले पाहिजे. हे त्या सरकारचे पहिलेच कृत्य नसून अशाप्रकारे 1905 साली देखील त्या सरकारने मराठी भाषिकांची बेळगाव महानगरपालिका बरखास्त केली होती. याकरिता माझी उप सूचना अशी आहे की, ज्यावेळी आपण घटनाबाह्य कृती म्हणत आहोत तर मग अशाप्रकारचे घटनाबाह्य कृती करणारे कर्नाटक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. रामदास कदम....

सरकार केंद्र सरकारने तत्काळ बरखास्त केले पाहिजे अशाप्रकारची शिफारस ही विधानपरिषद करीत आहे. अशाप्रकारची वाक्य रचना त्या ठरावामध्ये अंतर्भूत केली पाहिजे असे माझे ठाम मत आहे.

सभापती महोदय, बेळगाव महानगरपालिका बरखास्त केल्यामुळे महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेच्या मनामध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. त्याचा उद्रेक होण्याअगोदर विधानपरिषदेमध्ये ही भूमिका स्पष्ट झाली पाहिजे. या बाबतीत कोणताही आडपडदा ठेवण्याचे कारण नाही. केंद्र सरकारला सांगून बेळगाव महानगरपालिकेवरील बरखास्ती उठवून ती पुनर्जीवित करावी. परंतु जर हे कर्नाटक शासन मराठी भाषिक जनतेच्या मुळावर येत असेल तर हे कर्नाटक सरकार तत्काळ केंद्र सरकारने बरखास्त केले पाहिजे अशाप्रकारचे वाक्य त्या ठरावामध्ये समाविष्ट करण्यात यावेत अशी माझी मागणी आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार साहेबांनी सभागृहामध्ये ठराव मांडतांना कर्नाटक सरकारने ही संपूर्ण कृती घटनाविरोधी केली असल्याचे सांगितले आहे. जर त्या सरकारने घटनाविरोधी कृत्य केले असेल तर ते कर्नाटक सरकार बरखास्तच केले पाहिजे आणि तशाप्रकारची व्यवस्था या ठिकाणी असली पाहिजे आणि तशा प्रकारचा ठराव या सभागृहामध्ये आला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जो ठराव सभागृहामध्ये वाचून दाखविला आहे त्याच्या तिसऱ्या परिच्छेदामध्ये म्हटले आहे की, "कर्नाटक सरकारच्या या बेकायदेशीर आणि घटनाबाह्य कृतीबाबत हे सभागृह तीव्र शब्दामध्ये निषेध व्यक्त करीत आहे, कर्नाटक शासनाचे हे कृत्य संपूर्णपणे घटनाबाह्य असल्याचे या परिषदेचे ठाम मत आहे" म्हणजेच हे कृत्य घटनाबाह्य असल्याचे आपण ठाम मत व्यक्त करीत आहोत. पुढे असे म्हटले आहे की, "ठाम मत असून घटनात्मक तरतुदीप्रमाणे कर्नाटक शासनावर कठोर कारवाई केली पाहिजे अशी विनंती ही विधानपरिषद एकमताने केंद्र सरकारला करीत आहे" यामध्ये "कठोर अशी बरखास्तीची कारवाई" असे शब्द त्या ठरावामध्ये अंतर्भूत करावेत. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत माननीय सभागृहाचे नते श्री.अजित पवार साहेबांना विनंती करतो की, त्यांनी माझ्या उपसूचनेला मान्यता दिल्यानंतर ठरावावरील चर्चा सुरु करावी अशी विनंती करतो.

DGS/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री. अजित पवार साहेबांनी या ठिकाणी कर्नाटक सरकारचा निषेध करणारा ठराव मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभागृहामध्ये हा ठराव मांडल्यानंतर तो एकमताने मंजूर झाला पाहिजे आणि त्यामध्ये व्यक्त केलेला निषेध सर्वत्र गेला पाहिजे असे वाटत असेल तर मांडण्यात आलेला ठराव योग्य आहे. सभापती महोदय, या ठरावामध्ये शब्दच्छल करुन घटनेतील तरतुदीनुसार केंद्र शासनाने कारवाई करावी असे म्हटले आहे. घटनात्मक तरतुदीप्रमाणे जर ते शासन दोषी असेल तर त्या सरकारवर कारवाई होणार आहे. त्यामध्ये "बरखास्त" या एका शब्दासाठी शब्दच्छल करुन निषेध व्यक्त करावयाचा असेल तर तो जरुर करावा त्याबद्दल आमचे म्हणणे नाही. कर्नाटक सरकारने ही जी कृती केली आहे ती निषेधार्ह आहे. बेळगाव महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र एकीकरण समिती लोकशाही पध्दतीने, मतदान पध्दतीने, बहुमताने निवडून सत्तेवर आली आहे. त्या महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीचा महापौर झाल्यानंतर लोकशाही पध्दतीने महानगरपालिकेचा कारभार करीत असतांना कर्नाटक सरकारने व्देषात्मक भावनेने ती मराठी भाषिक महानगरपालिका बरखास्त करण्याची कारवाई केली असेल तर तिचा मी तीव्र शब्दामध्ये निषेध व्यक्त करतो. हा निषेध व्यक्त करीत असतांना माननीय उप मुख्यमंत्र्यांनी ठरावामध्ये असे म्हटले आहे की, केंद्र सरकारने कर्नाटक सरकारवर दबाव आणून ही महानगरपालिका पुनर्जीवित केली पाहिजे या मागणीचे देखील मी समर्थन करीत आहे. जोपर्यन्त सुप्रीम कोर्टाचा निर्णय होत नाही तोपर्यन्त त्या भागाला केंद्र शासित प्रदेशाचा दर्जा द्यावा. सुप्रीम कोर्टाचा जो काही निर्णय लागेल तो लागेल तोपर्यन्त मराठी भाषिकांवरील अन्याय आपण थांबविला पाहिजे आणि त्याला केंद्र शासित प्रदेशाचा दर्जा द्यावा अशाप्रकारे मी या ठरावाला समर्थन देत आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, याठिकाणी हा ठराव असताना तुम्ही एक भूमिका घेता आणि तुमच्या काँग्रेस पक्षाने तेथे त्या ठरावाला पाठिंबा दिलेला आहे. मात्र याठिकाणी तुमची भूमिका वेगळी आहे.त्यामुळे कर्नाटक मधील महानगरपालिका बरखास्त करण्याच्या बाबतीत तुम्ही एकमत तयार करावे. पण प्रत्यक्षात त्या ठिकाणी या ठरावाला काँग्रेसने समर्थन दिलेले आहे आणि याठिकाणी मात्र काँग्रेस या ठरावाला विरोध करीत आहे. म्हणून माझी मागणी आहे की, हा ठराव जसा आहे तशाच पध्दतीने मंजूर करावा जेणेकरुन महाराष्ट्राच्या विधान परिषदेने एकमताने हा प्रस्ताव मंजूर केला अशा प्रकारचा चांगला मॅसेज बाहेर जाईल. परंतु जर "बरखास्ती" या शब्दाबाबत शब्दच्छल करुन याठिकाणी सदरहू ठराव पास झाला नाही तर बाहेर चांगला मॅसेज जाणार नाही. म्हणून माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, कोणत्याही परिस्थितीत हा ठराव जसा मांडण्यात आलेला आहे, तसाच तो पारित करावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी सदनामध्ये माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी ठराव मांडलेला आहे. त्यामध्ये कर्नाटक सरकार बरखास्त करावे असे जे वाक्य घालण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे आपण बहुमताने त्यावर चर्चा करु.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, यासंबंधातील प्रस्तावामध्ये बरखास्ती हा शब्द असलाच पाहिजे अशी आमची ठाम भूमिका आहे.

श्री.अजित पवार (खाली बसून) : अगोदर सन्माननीय सदस्यांनी भाषणे करावीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता कोणत्या ठरावावर भाषणे करावयाची ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, याठिकाणी आपण कोणत्या ठरावावर भाषण करणार आहोत ?

.श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी ठरावामध्ये जी उप सूचना मांडलेली आहे, त्या उप सूचनेच्या संदर्भात आपण सांगितले पाहिजे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आम्हाला कोणत्या ठरावावर भाषण करावयाचे आहे ते नेमके कळले पाहिजे. जर याठिकाणी सरकार घटनाबाह्य काम करीत असेल तर अशा प्रकारचे काम करणारे सरकार बरखास्त झाले पाहिजे.त्याठिकाणी सत्तेवर कोणत्या पक्षाचे सरकार आहे, याच्याशी आम्हाला काही देणेघेणे नाही.परंतु तेथील मराठी माणसावर अन्याय होत आहे ही आमची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . .

भूमिका आहे म्हणजे महाराष्ट्रातील मराठी माणसाची भूमिका आहे आणि ती या सदनाची भूमिका असावयास पाहिजे. तेथील सरकारच्या बाबतीत आमची भूमिका आहे, सगळया मराठी माणसाची भूमिका आहे आणि जर एखादे सरकार घटनाबाह्य काम करीत असेल तर ते बरखास्त झाले पाहिजे ही आमची सगळ्यांची भूमिका आहे आणि जर हा ठराव एकमताने पास होणार नसेल तर बहुमताने पास करावा. आम्हाला त्याबाबतीत काही अडचण नाही. परंतु हा प्रश्न मराठी माणसाच्या अस्मितेचा आहे आणि आम्ही याबाबतीत तडजोड होऊ देणार नाही.

**उप सभापती** : याठिकाणी सभागृहाचे नेते आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी जो ठराव मांडलेला आहे, तो आता . . . .

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ठरावामध्ये उप सूचनेचा समावेश केलेला आहे.

**उप सभापती** : माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी या ठिकाणी ठराव मांडलेला आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, त्यांनी त्याला जी उपसूचना मांडलेली आहे त्याबाबत मतदान घ्यावे. परंतु मला ही सूचना तेवढी संयुक्तिक वाटत नाही. याचे कारण हा प्रश्न जसा तुमच्या जिव्हाळ्याचा आहे तसा या ठिकाणी ......

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा प्रश्न कोणत्याही पक्षाचा नाही.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, असे होणार नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा विषय कोणत्याही पक्षाचा नाही.

**उप सभापती** : हा विषय कोणत्याही पक्षाचा नाही तेच मी सांगत होतो. मात्र आपण माझे बोलणे ऐकून घेतले तरच ते आपल्याला कळू शकेल. परंतु तुम्ही माझे बोलणे ऐकून न घेण्याची भूमिका घेतली तर तुम्हाला माझे बोलणे कसे समजेल ? मी एवढेच म्हटले आहे की, सभागृहाच्या माननीय नेत्यांनी जो ठराव मांडला त्या ठरावामध्ये आपण उप सूचना सुचविली आणि आपण त्यावर असेही म्हटले की, .....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय श्री.माणिकराव ठाकरे यांनी त्याला पाठिंबा दिलेला आहे. ......





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, आता मी काय म्हणतो ते आपण एकदा ऐकून घ्यावे. पण जर तुम्हाला ऐकून घ्यावयाचे नसेल तर मी गप्प बसतो. आपण मांडलेली जी उप सूचना आहे, त्याबाबत पाहिजे असेल तर मतदान घ्यावे. परंतु हा प्रश्न मतदानाने सोडविण्याचा नसून, तो संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या जिव्हाळ्याचा, तुमच्या आणि आमच्या भावनेचा प्रश्न आहे आणि याठिकाणी सदनामध्ये माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी जो ठराव मांडलेला आहे, त्यामध्ये आपल्या सगळयांच्या भावना प्रतिबिंबित झालेल्या आहेत.त्यामुळे आपण बारीक-सारीक गोष्टींवर मतदान . . . .

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा विषय बारीक-सारीक नाही.हा महत्वाचा विषय आहे.

(सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : मी बारीक-सारीक असे जे म्हणालो, त्याचा अर्थ प्रथम नीट समजून घ्या.

(सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : मी आपल्याला एक गोष्ट सांगू इच्छितो की, मी आता बोलताना बारीक-सारीक असे म्हटले आहे, ते याठिकाणी कायम ठेवतो. मात्र मी जे शब्द बोललो, त्याचा तुम्ही तिसराच अर्थ काढत आहात. माझ्या म्हणण्याचा साधा उद्देश असा होता की, सन्माननीय सदस्य उप सूचनेबाबत सांगत आहेत, मात्र ती उप सूचना मताला मांडण्याजोगी आता या सभागृहाची परिस्थिती नाही. त्याचे कारण असे की, या ठरावाबाबत सर्वांचे एकमत आहे.या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी देखील सूचना मांडली आणि आपणही सूचना मांडली आणि त्याबाबत सभागृह सर्वानुमते त्याबाबत विचार करीत आहे. असे असताना सन्माननीय सदस्य ज्याचा आग्रह धरीत आहेत ते जर सर्वानुमते मान्य झाले तर तसे करु. पण याचा अर्थ त्याबाबत मतदान घ्यावे असे म्हटल्यानंतर . . . .

(सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम खाली बसून बोलतात.)

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेबांना सांगू इच्छितो की, आपण सभागृहातील जुने-जाणते सदस्य आहात. तुमच्यापेक्षा मी थोडासा ज्युनिअर आहे. आपण आमच्याही भावना समजून घ्याव्यात.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा मराठी माणसांच्या भावनांचा प्रश्न आहे. .....

**उप सभापती** : तुम्हीही मराठी आहात आणि मी देखील मराठी आहे.



श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा कोणत्याही पक्षाचा विषय होऊ देऊ नका.

**उप सभापती** : याठिकाणी कोणीही पक्षपात करु इच्छित नाही आणि तसे कोणीही करीत नाही. आपण मराठी आहात, मी देखील मराठी आहे आणि या सभागृहामध्ये बसणारे सर्वजण महाराष्ट्राचे पाईक आहेत. त्यामुळे आपण यावर वाद घालू नये.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी उप सूचना मांडण्यात आल्यावर माननीय श्री.माणिकराव ठाकरे यांनी जो पाठिंबा दिला, तो ते मागे घेत आहेत काय ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी या राज्याचा गृहमंत्री म्हणून आणि माझ्या मतदार संघाला लागूनच सीमा भाग असल्यामुळे आज त्या भागामध्ये जी तणावाची परिस्थिती निर्माण झालेली आहे, त्यामुळे मी यासंदर्भात माझ्याही भावना व्यक्त करणार आहे आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सदनामध्ये जो प्रस्ताव मांडलेला आहे, तो सदनाने एकमताने पारीत करावा अशी विनंती देखील करणार आहे.

सभापती महोदय, देशातील प्रत्येक भाषिकाला आपल्या पसंतीप्रमाणे राज्य देण्याचे धोरण केंद्र शासनाने स्वीकारले. पण दुर्दैवाने महाराष्ट्राला मात्र 105 लोकांचे हौतात्म्य देऊन संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी एक व्यापक लढा द्यावा लागला. सगळया भाषिकांना जो न्याय मिळाला, तो न्याय महाराष्ट्राला मात्र मिळाला नव्हता. त्या भागातील 30 लाख मराठी भाषिक जनतेने 50 वर्षे सातत्य ठेऊन संघर्ष करताना ज्या हालअपेष्टा सहन केलेल्या आहेत, त्या जर पाहिल्या तर आज सीमावासीय बांधवांची पहिल्यांदा कोणाबद्दल नाराजी असेल तर ती आपल्याबद्दल आहे. मराठी अस्मिता जोपासण्यासाठी आणि मराठी भाषेसाठी त्यांनी अनेक वेळा लाठ्या-काठ्या खाल्ल्या आहेत, तुरुंगवास भोगलेला आहे,गोळया झेललेल्या आहेत. त्यामुळे त्यांना मदत करण्या मध्ये सातत्य ठेऊन आपण विधानसभेमध्ये ठराव पारित करतो आणि अशा घटनांचा निषेध करतो. तसेच एखाद्या बाबीवर ठराव करण्याच्या बाबतीत जर कोणता विक्रम झाला असेल तर सीमावासीय बांधवांच्या बाबतीत आपण सर्वांनी मिळून एकमताने आजपर्यंत ठराव केलेले आहेत. पण आजपर्यंत आपण केलेल्या ठरावांची कोणी दखल घेतली ? तसेच आता सुध्दा याबाबतीत ठराव करुन त्यातून नेमके काय निष्पन्न होणार आहे आणि त्यातून तेथील जनतेला काय दिलासा मिळणार आहे हा देखील प्रश्नच आहे आणि आपण मात्र येथे ठराव करीत आहोत.येथे कोणत्याही पक्षाला कोणी रॉंग बॉक्स मध्ये टाकण्याची आवश्यकता नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, आज त्याठिकाणी भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे.पूर्वी तेथे काँग्रेसचे तसेच जनता दलाचे देखील सरकार होते आणि तेथे सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी बेळगावच्या प्रश्नाकडे पहाण्याची त्यांची भूमिका सातत्याने सारखीच राहिलेली आहे.त्यामुळे या भूमिका कोणत्याही एका पक्षाच्या विरोधात आहे असे समजण्याचे काही कारण नाही.एकंदरीतच तेथे महापौराच्या तोंडाच्या काळे फासले जाते, कधी महापालिका बरखास्त करण्याची कृती केली जाते आणि या घटना लोकशाहीला काळीमा फासणाऱ्या घटना आहेत. देशभरातील अल्पभाषिकांना आणि अल्पसंख्यांकांना सगळीकडे जो न्याय मिळतो, तो न्याय मराठी भाषिकांना मात्र तेथे मिळत नाही. आम्ही आज ठराव करणार किंवा शिष्टमंडळासमावेत भेट सुध्दा घेऊ. पण केंद्र सरकारने सुध्दा, तेथेही कोणाचेही सरकार असले तरी या प्रश्नाकडे लक्ष ्द्यावयाचे नाही अशा प्रकारची भूमिका नेहमीच घेतलेली आहे आणि कर्नाटक सरकारने दामटून पुढे जावयाचे  अशा प्रकारची भूमिका घेतलेली आहे. या सगळ्याचा परिणाम म्हणून आज सर्व सीमा भागामध्ये अशांततेचे वातावरण निर्माण झालेले आहे. अन्याय सहन करण्यासाठी सुध्दा काही सीमा असते पण आता त्यांनी या सगळया सीमा ओलांडलेल्या आहेत. याठिकाणी आपण ठराव पारित करु पण हा ठराव पारित करीत असताना मला जे सांगावयाचे आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

ते माझे वैयक्तिक मत आहे. पण केंद्र सरकारला माझी विनंती आहे की, त्या भागातील जनतेवर होणारा अन्याय थांबविण्यासाठी सुरुवातीला तो भाग, सुप्रीम कोर्टाचा निर्णय लागेल त्यावेळी तो लागू देत पण तोपर्यंत तो भाग केंद्र शासित केला पाहिजे आणि कर्नाटकाच्या जोखडातून सीमावासी बांधव मुक्त केले पाहिजेत. एका बाजूने तेथील तरुणांना केवळ मराठी भाषेतून शिकलेले आहेत म्हणून नोकऱ्यांमधून वगळले जाते, त्यांची कामे टाळली जातात आणि दुसऱ्या बाजूने आम्ही सीमावाशीय बांधवांबद्दल बोलतो. पण तेथील मराठी तरुणांसाठी महाराष्ट्राने तरी कोणत्या भूमिका घेतल्या आहेत? त्यांनी आमची अनुदाने नाकारली म्हणून आम्ही तरी त्यांना कधी पैसे दिले आहेत काय? एका बाजूने आमची कोरडी सहानुभूती आणि दुसऱ्या बाजूने कडव्या विरोधाला त्यांना तोंड द्यावे लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे. पक्षीय अभिनिवेशातून बाजूला जाऊन महाराष्ट्राला सुध्दा अन्याय सहन करावयाला सीमा आहे, याची दखल आता केंद्र शासनाने घेतली पाहिजे आणि बघ्याची भूमिका घेण्याचे सोडून देऊन आता प्रत्यक्ष हस्तक्षेप केला पाहिजे. जर महाराष्ट्र चूकत असेल तर जरुर महाराष्ट्राला मार्गदर्शन करण्याचा आणि सूचना करण्याचा केंद्र सरकारला अधिकार आहे. पण दिवसाढवळया महापौरांच्या तोंडाला काळे फासणे, लोकांना मारणे, लाठीचार्ज देशभरातील पोलीस करीत आहेत. अनेकवेळा कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तो करावाही लागतो. पण इतक्या अमानुष पध्दतीचा लाठीचार्ज कर्नाटक पोलिसांकडून महाराष्ट्रीय लोकांवर केला जातो .. .

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय,.... .

श्री. दिवाकर रावते : पहिल्यांदा उप सूचनांच्या संदर्भातील निर्णय घेण्यात यावा.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी दोन मिनिटात माझे म्हणणे संपवितो. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, तो प्रदेश केंद्र शासित करावा आणि कर्नाटक विधानसभेने जी अलोकशाहीवादी कृती केलेली आहे, त्या बद्दल कर्नाटकची विधानसभा बरखास्त करण्यात यावी. लोकशाहीवर घाला घातला तर देशामध्ये विचारणारे कोणी तरी आहे हे केंद्र शासनाने दाखवून द्यावे. या पूर्वीसुध्दा बेळगाव महानगरपालिका बरखास्त केली होती. आता सुध्दा

..2..

श्री. आर.आर.पाटील....

बरखास्त करण्यात आलेली आहे. रोज उठून बरखास्तीचे सत्र जर बेळगाव महागरपालिकेवर लादले जाणार असेल तर कुठे तरी हा निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. म्हणून केंद्र शासनाने बघ्याची भूमिका न घेता कडक भूमिका घ्यावी आणि लोकांनी निवडून दिलेल्या बेळगाव महापालिकेचे अस्तित्व पुनर्स्थापित करण्यात यावे. सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी जो प्रस्ताव मांडला आहे, त्याला मी पूर्णपणे पाठिंबा देतो आणि माझे चार शब्द संपवितो.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयावर या सदनामध्ये चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. या सदनाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी जो ठराव मांडलेला आहे, त्यावर या सदनाचा एक सन्माननीय सदस्य म्हणून माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी या ठिकाणी ठराव मांडल्यानंतर त्यांनी त्यांच्या भाषणात कर्नाटक सरकार बरखास्त करण्यात यावे, अशा प्रकारचा उल्लेख केलेला आहे. त्यानंतर माननीय मंत्री महोदय, श्री. आर. आर. पाटील यांनी सुध्दा त्याच संदर्भात उल्लेख केलेला आहे. या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता फक्त भारतीय जनता पार्टीच्या सन्माननीय सदस्यांची भूमिका मला माहीत नाही. तसेच अन्य काही सन्माननीय सदस्यांची भूमिका देखील वेगळी असू शकते. परंतु कर्नाटक शासन बरखास्त करावे असे प्रस्तावामध्ये असावे, याला दुमत असण्याचे काही कारण आहे असे मला वाटत नाही. शेवटी सदनाचे जर बहुमत असेल तर या ठरावामध्ये याचा उल्लेख केला गेला पाहिजे. तो उल्लेख असावा, अशा प्रकारची सुरुवातीलाच मी माझी भूमिका या ठिकाणी स्पष्ट करतो.

सभापती महोदय, मागील 60 ते 62 वर्षापासून बेळगावचा हा सीमा प्रश्न महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींनी आणि महाराष्ट्रातील जनतेने अत्यंत गांभीर्याने हातामध्ये घेतलेला आहे. परंतु कर्नाटक राज्याने मराठी बांधवांवर ज्या पध्दतीने अन्याय करावयाला सुरुवात केलेली आहे. .

श्री. रामदास कदम : आधी मी दिलेल्या उप सूचनेच्या संदर्भातील निर्णय घेण्यात यावा.

श्री. माणिकराव ठाकरे : या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आपण एकमताने ठराव तयार करु. या सदनामध्ये कुठलाही विषय चर्चेला आल्यानंतर त्या संदर्भात अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार सदनाला आहे,आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत. या सदर्भात

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे....

सर्व सन्माननीय सदस्य तसा ठराव करतील. या सदनातील सर्व पक्षाचे एकमत असले तरी भारतीय जनता पार्टीचे सन्माननीय सदस्य त्या ठरावाच्या विरोधात मतदान करतील. (अडथळा) जो ठराव चर्चेला आलेला आहे त्यामध्ये बेळगाव महानगरपालिका बरखास्त करण्यात आलेली आहे त्या अनुषंगाने काय करावे, अशा प्रकारचा ठराव या सदनासमोर ठेवण्यात आलेला आहे. त्या ठरावावर सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडावयाची आहेत आणि त्या मताचा समावेश या ठरावामध्ये करण्यात येत आहे. त्यासंबंधीची नोंद घेण्यात येत आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाच्या बाबतीत आपली भूमिका स्पष्टपणे माडावी.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी थोडयावेळा पासून बघत आहे की, हा प्रश्न केवळ सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचा आहे आणि महाराष्ट्रातील इतर कोणालाही सीमा प्रश्नाबाबत काहीही वाटत नाही असा काही त्यांचा समज झालेला आहे काय? या प्रश्नाच्या बाबतीत त्यांच्या इतक्याच आमच्या भावनाही तीव्र आहेत. त्यामुळे हा प्रश्न कुठे तरी आपल्या एकटयाचा  प्रश्न आहे आणि आपण एकटेच या प्रश्नाच्या बाबतीत तीव्र आहोत असे दाखवू नका.

श्री. रामदास कदम : या ठिकाणी ठराव वाचून दाखविण्यात आलेला आहे आणि त्या ठरावाला आम्ही दुरुस्ती सुचविलेली आहे, त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी आणि आम्हाला अशा प्रकारची दुरुस्ती करण्यास काही अडचण नाही असे सांगावे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, 'बरखास्ती' या संदर्भात काही सन्माननीय सदस्य व्यक्तिगत उल्लेख करतील तो भाग वगळून सर्वांचे बरखास्तीच्या संदर्भात एक मत आहे अशा पध्दतीचा ठराव या सदनामध्ये व्हावयास पाहिजे, अशा प्रकारची अपेक्षा मी या ठिकाणी व्यक्त करतो. सभापती महोदय, यापूर्वी बेळगावमध्ये घडलेल्या अनेक घटना लक्षात घेतल्या तर मराठी जनतेवर अनेक प्रकारे अन्याय करण्याचे प्रकार मागच्या 60 ते 62 वर्षामध्ये बेळगाव परिसरामध्ये  झ ाालेले अहेत.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे भाषण करणार असतील तर भाषण करण्याचा अधिकार आमचा आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : या ठिकाणी मांडण्यात आलेल्या ठरावाना जी दुरुस्ती सुचविण्यात आलेली आहे तिचा या ठरावामध्ये समावेश करण्यात यावा असे आपण सर्व मिळून ठरवित आहोत.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे..

भाषणे न करता ठराव करण्यात यावा आणि 'बरखास्तीचा' निर्णय सामुहिकपणे घेण्यात यावा. भाषणे करावयाची नाहीत असे ठरले आहे का? असेल तर आपण सर्वांनी एकमताने ठराव करु आणि बरखास्ती विषयी या सदनाचे अमुक अमुक असे मत आहे असे सांगू. विषय संपला.

श्री. रामदास कदम : ठरावाला जी दुरुस्ती सुचविण्यात आली आहे त्या प्रमाणे दुरुस्ती करुन दुरुस्तीसह ठराव या ठिकाणी वाचण्यात यावा. या संबंधात जी प्रोसिजर आहे ती प्रथम पार पाडली पाहिजे त्यानंतर भाषणे केली पाहिजेत असे माझे मत आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सदनाच्या भावना लक्षात घेतल्या पाहिजेत. या संदर्भातील या पूर्वी घडलेल्या काही घटनांच्या संदर्भातील उल्लेख मी या निमित्ताने करीत होतो परंतु यासंदर्भात अंतिम निर्णय असाच असला पाहिजे की, कर्नाटक सरकार बरखास्त करावे व तशा प्रकारे केंद्र शासनाला कळविण्यात यावे. अशा प्रकारचा ठराव या ठिकाणी करण्यात यावा आणि शासनाच्या ठरावामध्ये देखील त्याचा उल्लेख असावा अशा प्रकारची स्पष्ट भूमिका मी या ठिकाणी मांडतो.

**उप सभापती** : या ठरावावरील चर्चेत ज्या सन्माननीय सदस्यांना भाग घ्यावयाचा आहे त्यांनी कृपया आपल्या पक्ष प्रतोदांकडून माझ्याकडे आपली नावे पाठवावीत. मी या ठिकाणी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, शक्यतो प्रत्येक पक्षाकडून जास्तीत जास्त दोन सन्माननीय सदस्यांची नावे देण्यात यावीत. त्यापेक्षा अधिक नावे देण्यात येऊ नयेत. तसेच माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावरच या ठिकाणी बोलण्यात यावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या ठरावाला या ठिकाणी दुरुस्ती सुचविण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही जी उपसूचना मांडली त्याचे काय झाले ?

( सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम व डॉ. दीपक सावंत वेलमध्ये बसतात )

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ प्रोसीजर आहे. असा एखादा ठराव मांडला गेल्यानंतर आणि त्यावर जर उपसूचना आली तर ठरावावर आणि उपसूचनेवर एकत्रित चर्चा होऊन मग उपसूचना मताला टाकली जाते त्यावर मत घेतले जाते आणि नंतर ठराव घेतला जातो की आधी उपसूचनेवर मतदान घेतले जाते आणि नंतर बाकीची चर्चा घेतली जाते याबाबत नेमकी प्रोसीजर काय आहे हे सभागृहाला कळावे.

**उप सभापती** : पहिल्यांदा जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर आणि जी उपसूचना मांडलेली आहे त्यावर एकत्रित चर्चा होते आणि ती चर्चा झाल्यानंतर उपसूचनेवर मतदान घेतले जाते. माझी अशी विनंती आहे की, या ठरावावर बोलण्यासाठी प्रत्येक पक्षाकडून दोन-दोन सदस्यांची नावे पाठवावीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला आम्ही उपसूचना दिलेली आहे...

श्री. अजित पवार : आपल्याला त्या उपसूचनेवर बोलता येईल. आपण त्यावर बालावे. सगळ्यांचे मत ऐकून घेऊन आपण ज्या सूचना कराल, इतर सन्माननीय सदस्य सूचना करतील, जसे सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे साहेबांनी सूचना केली त्याप्रमाणे सगळ्यांच्या सूचना घेऊन सभापती सभागृहासमोर मांडतील आणि त्याबाबत सभागृह ठरवील. त्या सूचना माननीय सभापती महोदय मताला टाकतील.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आपण सांगितले की, सभागृहासमोर जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलावे. त्या प्रस्तावावर आम्हाला काही बोलावयाचे नाही....

श्री. अजित पवार : आपल्याला ज्या पध्दतीने बोलावयाचे असेल ते बोलावे. आपण बरखास्तीच्या बाबतीत बोलावे. आमच्या एका पक्षाचे प्रदेशाध्यक्ष बरखास्तीच्या बाजूचे आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : आपण सभागृहाचे नेते आहात. एकदा आपल्याला सभागृहाचा कौल मिळालेला असल्यामुळे त्याप्रमाणे आपण दुरुस्ती करु शकता.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, उपसूचना मताला टाकतील.

श्री. रामदास कदम : सगळ्या सभागृहाचे जे मत आहे ते आपल्याला कळलेले आहे.

( सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम व डॉ. दीपक सावंत आपापल्या जागेवर जाऊन बसतात )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या प्रस्तावासह या ठिकाणी ज्या सूचना आलेल्या आहेत त्यावर चर्चा होईल, निर्णय मात्र नंतर होईल असे आपण जाहीर करावे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण फार लवकर गैरसमज करुन घेता. मी असे सांगितले की, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेला प्रस्ताव आणि त्यावर आपण दिलेली उपसूचना यावर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर उपसूचना स्वीकारावयाची की नाही यावर मतदान होईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपल्याला नम्र विनंती आहे. सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी मांडलेला ठराव, त्यावर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिलेली उपसूचना, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी दिलेले अनुमोदन यासह चर्चा होईल असे आपण रेकॉर्डवर नमूद करावे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन या सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री यांनी जो प्रस्ताव मांडला, त्या प्रस्तावाला दोन्ही बाजूकडून ज्या उपसूचना आल्या त्या उपसूचनांसह सदनामध्ये चर्चा होईल असे आपण म्हणावे.

**उप सभापती** : मी मघापासून तेच सांगत आहे. मी वेगळे काही सांगितलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना सांगू इच्छितो की, या प्रस्तावावर प्रत्येक पक्षाकडून फक्त दोन सदस्यांनी बोलावे असे मी सांगितले. आपल्याकडून 10 सदस्यांची नावे आलेली आहेत.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पॉइन्ट ऑफ प्रोसीजरच्या बाबतीत मी स्पष्टीकरण करु इच्छितो. सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी मांडलेल्या ठरावाला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते किंवा सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी उपसूचना दिलेली आहे. त्याला सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी अनुमोदन दिलेले आहे किंवा उपसूचना दिलेली आहे. तसेच या ठिकाणी बोलत असताना माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी आणखी एक नवीन उपसूचना मांडलेली आहे. यांनी सरकार बरखास्तीबाबत सांगितले पण माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील हे विधानसभा बरखास्तीबाबत म्हणाले. त्याचीही चर्चा असेल तर तोही मुद्दा आपण यामध्ये समाविष्ट करणार आहात का ?

**उप सभापती** : कोणत्या मुद्यांवर चर्चा होणार आहे हे मी स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे अशा अवांतर प्रश्नाची मी दखल घेणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विधानसभेने कोणतीही चर्चा न करता बरखास्तीच्या उपसूचनेसह ठराव मान्य केलेला आहे. आमचीही इच्छा आहे की आपण ठराव मंजूर करावा.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मी ठरावावर बोलत नाही तर माझी उपसूचना आहे आणि ती उपसूचनाही आपण चर्चेला घ्यावी अशी माझी विनंती आहे. माननीय मंत्री महोदय, श्री. आर. आर. पाटील यांनी जी सूचना केलेली होती की, कर्नाटक सरकार बरखास्त करावे या ऐवजी कर्नाटक विधानसभा बरखास्त करावी अशी उपसूचना मी या ठरावाच्या संदर्भात मांडत आहे.

**उप सभापती** : आता या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात होईल. सुरुवातीला या प्रस्तावावर माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर बोलतील.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

प्रस्ताव अतिशय मुद्देसूद आहे आणि सर्व बाबींना स्पर्श करणारा आहे. बेळगावची महानगरपालिका लोकशाही पध्दतीने निवडून आली आणि त्या ठिकाणी मराठी माणूस महापौर झ ाला म्हणून ती महानगरपालिका बरखास्त करण्याचा जो निर्णय कर्नाटक सरकारने घेतला त्या कर्नाटक सरकारचा मी या ठिकाणी तीव्र निषेध करतो. बेळगाव, कारवार, निपाणी आणि सीमा वादाचा प्रश्न हा आजचा नाही. गेली 50 वर्षे महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर हा प्रश्न सातत्याने धगधगत आहे. अनेक सरकारे आली आणि गेली परंतु त्या ठिकाणच्या मराठी माणसावरील अन्याय थांबला नाही. त्या ठिकाणी आज भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे. यापूर्वी त्या ठिकाणी जनता दलाचे सरकार होते. त्यापूर्वी त्या ठिकाणी काँग्रेस पक्षाचे सरकार होते. ही काही पहिली घटना नाही. अशा अनेक घटना, अन्याय, अत्याचाराची एक मालिका या सीमा भागामध्ये झालेली आहे. आज लोकशाही पध्दतीने निवडून आलेली महानगरपालिका बरखास्त करण्याची जी घटना घडलेली आहे ती गंभीर आहे. आपण लोकशाही मानणारे आहोत. लोकशाही मानणाऱ्यांनी लोकशाहीची बूज राखली पाहिजे असे मानणाऱ्यांपैकी मी एक आहे. माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी सांगितले ते बरोबर आहे की, यापूर्वी अनेक ठराव झाले आणि ते केंद्र सरकारकडे पाठविले. त्याबाबत केंद्र सरकारने काय कारवाई केली ? आजही तशा पध्दतीचा ठराव होईल. आपली औपचारिकता पूर्ण होईल. महाष्ट्राच्या विधानसभेने आणि विधान परिषदेने एकमताने ठराव केला असा एक मेसेज जाईल. असा मेसेज आपण पहिल्यांदा देत नाही.

दादांनी सांगितले की, ज्यावेळी आझाद मैदानावर सर्व मराठी माणसे एकत्र आली त्यावेळी सर्व पक्षीय लोकांनी त्या ठिकाणी जाऊन त्यांना पाठिंबा दिला. त्यानंतर महाराष्ट्रातील सर्व पक्षीय शिष्टमंडळ केंद्र सरकारकडे गेले आणि ही बाब केंद्र सरकारच्या कानावर घातली. सुप्रीम कोर्टात हा प्रश्न असल्यामुळे सध्या यावर निर्णय घेता येणार नाही असे केंद्र सरकारने सांगितले. पण आज आपण प्रस्तावामध्ये जी मागणी केली की, सुप्रीम कोर्टाचा निर्णय ज्यावेळी यावयाचा त्यावेळी येईल,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

तोपर्यंत तो भाग केंद्र शासित प्रदेश म्हणून जाहीर केला पाहिजे आणि कर्नाटकमध्ये राहणाऱ्या मराठी माणसाचे संरक्षण केले पाहिजे. आम्ही या मताशी शंभर टक्के सहमत आहोत. त्या ठिकाणी लोकशाहीची हत्या झाली असेल, जाणीवपूर्वक दुष्ट बुध्दीने हा निर्णय केला गेला असेल तर ताबडतोब ती महानगरपालिका पुनरुज्जीवित झाली पाहिजे याही मागणीचे आम्ही समर्थन करतो. आम्ही तीव्र शब्दात निषेध तर करतोच परंतु दादांनी या ठिकाणी ज्या दोन तीन बाबी मांडल्या त्याचेही आम्ही समर्थन करतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, मराठी भाषिक माणसांवर अन्याय व अत्याचार होऊ नये यासाठी संपूर्ण सभागृहाचे एकमत झालेले असताना एका शब्दाचा शब्दच्छल सुरु आहे. त्यामुळे या ठरावाबाबत सदनाच्या बाहेर अयोग्य संदेश जात आहे ते सभागृहाच्या दृष्टीने योग्य नाही. या ठरावामध्ये असे म्हटलेले आहे की, घटनात्मक दृष्टीने कर्नाटक सरकारने गुन्हा केला असेल तर केंद्र सरकारने घटनेच्या अधीन राहून तेथील सरकारवर कारवाई करावी. या शब्दाला आमचा पाठिंबा आहे. परंतु या ठिकाणी ते शासन बरखास्त करावे असा सातत्याने उल्लेख केला जात आहे. बरखास्ती व घटनात्मक तरतूद यामध्ये काय फरक आहे ? घटनात्मक तरतुदीप्रमाणे त्या सरकारवर कारवाई केली पाहिजे याबाबत आम्ही 100 टक्के समर्थन देतो. घटनात्मक तरतुदीमध्ये 'बरखास्ती' असा शब्द असेल तर बरखास्त करण्यात यावे असे म्हणावे. पण 'बरखास्ती' हया शब्दांबाबत सभागृहात शब्दच्छल सुरु आहे. तो योग्य नाही. सन्माननीय उप मुख्यमंत्री व सभागृहाचे नेते श्री.अजित दादा पवार यांनी मांडलेला ठराव सुटसुटीत असून त्यामुळे सभागृहाबाहेर चांगला संदेश जाणार आहे. त्यामुळे हा ठराव एकमताने मंजूर झाला पाहिजे. महाराष्ट्रातील माणसांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारवर दबाव आणावा व त्यासाठी आवश्यक असलेली कारवाई ताबडतोब करावी. अशा पध्दतीने केंद्र सरकारवर दबाव आणण्यासाठी हा ठराव एकमताने पारित करावा. 'बरखास्ती' या शब्दाबाबत सभागृहात वाद चालला आहे त्याबाबत मी सभागृहाला हात जोडून विनंती करतो की, घटनात्मक तरतुदीनुसार केलेली कारवाई व बरखास्ती यामध्ये काय फरक आहे ते मला अजूनही समजलेले नाही. हा वाद टाळून माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेला ठराव एकमताने मंजूर करावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2......

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री व या सभागृहाचे नेते श्री.अजित दादा पवार यांनी जो प्रस्ताव या सभागृहात मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

खरे तर बेळगाव सीमा भागावरील लक्षावधी मराठी बांधवांचे जवळजवळ 60 वर्षे आपल्या हक्कांसाठी, भाषेसाठी, संस्कृतीसाठी व महाराष्ट्रामध्ये तो भाग समाविष्ट करावा म्हणून लोकशाहीच्या माध्यमातून, निवडणुकीच्या माध्यमातून जन आंदोलन, संघर्ष गेली अनेक वर्षे सुरु आहे. हे सर्व चालू असताना बेळगावसारख्या अत्यंत सुसंस्कृत व सांस्कृतिक नगरीमध्ये या महानगरपालिकेमध्ये मराठी भाषिकांचे बहुमत वर्षानुवर्षे अनेक वेळा सिध्द झालेले आहे. त्यांची अशी मागणी आहे की, मराठी भाषेतून त्या ठिकाणचा कारभार चालावा, पत्रव्यवहार चालावा, आम्ही कर्नाटक सरकारबरोबर जो जो पत्रव्यवहार करु त्या मराठी पत्रांची त्यांनी दखल घेतली पाहिजे आणि त्या महानगरपालिकेचा संपूर्ण कारभार मराठी भाषेतून चालला पाहिजे. त्यांनी केवळ ही मागणी केली आहे. खरे तर घटनेमध्ये अशी तरतूद आहे की, भाषिक अल्पसंख्याकांच्या मागण्या व त्यांचे संरक्षण हे त्या राज्यातील सरकारने केले पाहिजे. परंतु या घटनात्मक तरतुदीला सुध्दा कर्नाटक शासनाने सातत्याने हरताळ फासलेला आहे, काळीमा फासलेला आहे आणि तसेच कृत्य त्यांनी यावेळी सुध्दा केलेले आहे.

आताच उल्लेख करण्यात आला आहे की, माननीय श्री.मोरे मराठी भाषिक व दलित समाजाचे नेते हे त्यावेळी बेळगाव महानगरपालिकेचे महापौर होते. त्यांना कर्नाटक सरकारने बेंगलोर येथे अपमानास्पद वागणूक दिलीच एवढेच नाही तर त्यांच्या तोंडाला काळे फासले, त्यांना धक्काबुक्की केली, मारहाण केली. एक दलित व मराठी भाषिक महापौरांना अशा प्रकारचा अन्याय सहन करावा लागला. आज बेळगाव महानगरपालिकेच्या महापौरपदी व उपमहापौरपदी महिला आहेत. त्यांनी बहुमताने एक ठराव पारित केला. सातत्याने कन्नड व संस्कृतीची सक्ती त्यांना भोगावी लागते म्हणून त्यांनी तो ठराव पारित केला. मी अत्यंत नम्रपणे कर्नाटक व केंद्र सरकारच्या नजरेला आणू इच्छितो. खरे म्हणजे ही साधी गोष्ट आहे. महाराष्ट्रात गेली अनेक वर्षे मराठी भाषिक राज्य झाल्यानंतर या राज्यातील भाषिक अल्पसंख्याकांना सर्व प्रकारचे हक्क व न्याय परिपूर्णपणे मिळालेले आहेत. मला त्याचा अभिमान व





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

आनंद वाटतो. त्याची दखल घेऊन कर्नाटक सरकारने अनुकरण करण्याची आवश्यकता आहे. या महाराष्ट्रामध्ये मराठी ही आमची राजभाषा असली तरी अनेक भाषेचे लोक गुण्या गोविंदाने नांदत आहेत. येथे कन्नड भाषेची शाळा असेल, तेलगू भाषेची शाळा असेल, गुजराथी भाषेची शाळा असेल या सर्व भाषांमधील शाळांना बालभारतीची पाठ्यपुस्तके पुरविण्याचे काम महाराष्ट्र सरकार गेली अनेक वर्षे करीत आहे. यापैकी कोणत्याही भाषिकांवर,त्यांच्या माध्यमावर, त्यांच्या शाळेवर किंवा त्यांच्या संस्कृतीवर या राज्य सरकारने कधीही अन्याय केलेला नाही.

कर्नाटक राज्यात 30 लाख मराठी भाषिक लोक बेळगाव, कारवार, भालकी, बिदर, औराद, विजापूर परिसरामध्ये आहेत. एवढेच नाही तर ज्या भागाचा आपण उल्लेख करीत नाही त्या जमखंडीमध्येही मराठी भाषिक जनता आहे. त्यावेळी त्या ठिकाणी मराठी भाषिक लोक, मराठी भाषेच्या शाळा होत्या. त्यावेळच्या मुंबई राज्यामध्ये कारवारमध्ये तर मराठी भाषेच्या 150 पेक्षा जास्त शाळा होत्या. पु.ल.देशपांडे सारखे शिक्षक तेथे होते. बेळगावमध्ये होते. इंदिरा संत त्या ठिकाणी होत्या. अनेक नामवंतांचा उल्लेख केला पाहिजे. मराठी आणि कन्नड या दोन्ही भाषेच्या साहित्याला विपुल ज्ञान देणारे गंगाधरपंत देशपांडे, बेंद्रे असतील या सर्वांनी दोन्ही भाषांची सेवा केलेली आहे. बाल गंधर्वांच्या मराठी नाटकाला बेळगाव, हुबळी, धारवाड या सर्व ठिकाणी हजारो, लक्षावधी प्रेक्षक सातत्याने येत होते. हे सर्व असताना ही संस्कृती, ही भाषा, मराठीपण सातत्याने गाडण्याचे काम या कर्नाटक सराकारने केलेले आहे.

सभापती महोदय, आताच्या कृत्यासाठी तर काहीही कारण नव्हते. बेळगाव महानगरपालिकेच्या महिला महापौर व उपमहापौरांनी केवळ ठराव पारित केल्याचे थातूरमातूर कारण देऊन, द्वेष भावनेतून, सूडाच्या भावनेने निर्णय घेऊन त्या सरकारने बेळगाव महानगरपालिका बरखास्त केलेली आहे. हे घटनाबाह्य कृत्य आहे. त्यांचा काहीही दोष नसताना, काहीही कारण नसताना, मराठी भाषेच्या द्वेषातून कर्नाटक सरकारने हा निर्णय घेतला आहे तो रद्द करुन केंद्र सरकारने बेळगाव महानगरपालिका पुनर्स्थापित करावी ही पहिली आमची मागणी आहे. सुप्रीम कोर्टामध्ये हा प्रश्न प्रलंबित आहे. लोकशाहीच्या मार्गाने त्या ठिकाणच्या माणसांनी सर्व

4....

श्री.उल्हास पवार....

प्रकारचे संघर्ष केले. पण सर्व संघर्ष केल्यानंतर महाराष्ट्र सरकार सुप्रीम कोर्टामध्ये गेले. तेथे हा प्रश्न प्रलंबित आहे. त्याचा अजून निर्णय लागलेला नाही. तोपर्यंत हा सर्व भाग केंद्रशासित करावा. मराठी भाषिक जनतेवर होणारा अन्याय दूर करावा ही भावना महाराष्ट्राच्या या सदनाच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे व भारतामध्ये पोहोचली पाहिजे. माझे असे म्हणणे आहे की, या ठरावाला धक्का लावू नये. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात मागणी करावी. हे कृत्य घटनाबाह्य असेल आणि बरखास्त करण्यास ते सरकार पात्र असेल तर बरखास्तही केले पाहिजे. ही मागणी मी माझे मनोगत व्यक्त करीत असताना करीत आहे.

मी सर्वांना विनम्र विनंती करतो की, राज्य शासनाने मांडलेला एकमुखी ठराव मंजूर करण्यात यावा. खरे तर केंद्र सरकार व संपूर्ण जनतेमध्ये अशी भावना पोहोचली पाहिजे की, या प्रश्नासंबंधी आम्ही एक आहोत, याबाबत आमचे कोणतेही मतभेद नाहीत. कोणतेही मतमतांतर नाही. हया ठरावाचे समर्थन करीत असताना केंद्र सरकारला कर्नाटक सरकार बरखास्त करण्याची मागणी आपल्या भाषणातून करु शकतो. ते रेकॉर्डवर येऊ शकते, जनतेला कळू शकते. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले मत मघाशी मांडलेले आहे. याबाबत सर्वांचे एकमत आहे सर्वदूर पर्यंत व केंद्र सरकारपर्यंत पोहोचले तर अधिक प्रबळ होईल, सबळ होईल अशी माझी भावना आहे. म्हणून या ठरावाचे समर्थन करीत असताना बेळगाव महानगरपालिका पुनर्स्थापित करावी, सुप्रीम कोर्टाचा निकाल लागेपर्यंत तो भाग केंद्रशासित करावा आणि तेथे जे काही घटनाबाह्य व अमानुष कृत्य कर्नाटक सरकारने केलेले आहे त्याबाबत केंद्र सरकारने कठोर कारवाई करावी अशी मागणी मी यानिमित्ताने करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

------

नंतर श्री.गिते......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आम्ही आज सकाळी सभागृहाचे कामकाज तहकूब करावे यासंबंधीची सूचना दिली होती. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील बांधवांवर होत असलेल्या अन्यायाबाबत सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. मी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी आमच्या सूचनेची तसेच आमच्या भावनांची नोंद घेतली म्हणून त्यांना मनापासून धन्यवाद देतो. या विषयाच्या बाबतीत आपल्या दालनामध्ये बैठक झाली. त्या बैठकीत अत्यंत गंभीर स्वरुपाचा, अतिशय तीव्र शब्दात भावना व्यक्त करणारा प्रस्ताव सभागृहात आणण्याचा निर्णय घेतला, त्याबद्दल मी पुन्हा त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, या ठिकाणी जो प्रस्ताव मांडला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी मांडलेल्या प्रस्तावामध्ये मी आणि सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी " अशी बरखास्ती करण्यात यावी " अशा प्रकारची उपसूचना दिलेली आहे, त्या उपसूचनेसह मी चर्चा करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी या उपसूचनेस पाठिंबा दिला, त्याबद्दल त्यांना देखील मी धन्यवाद देतो. माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या जिल्हयास लागूनच असलेल्या प्रदेशात अशा प्रकारची घटना घडली म्हणून त्यांच्या भावना तर अतिशय तीव्र होत्या. त्यांनी केवळ " सरकारची बरखास्ती " नव्हे तर " विधानसभा बरखास्त करावी " अशी उपसूचना केली व त्यास सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी अनुमोदन दिले. आमचे सन्माननीय विरोधी पक्ष नेते असे म्हणाले की, घटनात्मक कारवाई करणे आणि बरखास्त करणे या दोघांचा अर्थ एकच आहे.आपणाला दोघांचा अर्थ सारखाच वाटत असेल तर "बरखास्ती" हा शब्द नसावा असे कशासाठी म्हणता आहात ? शेवटी आपल्या मनात कुठे तरी शंका आहे. आज सकाळी माननीय मुख्यमंत्र्यांकडे काही भावना व्यक्त केल्या होत्या. सायंकाळचे "सामना" हे वृत्तपत्र मला नुकतेच प्राप्त झाले आहे. "सामना" या वृत्तपत्रात माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी तशाच भावना व्यक्त केलेल्या आहेत. ती भावना अशी आहे की, " आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण हे ऐतिहासिक नावाचा मळवट लावलेले आहेत. ते सीमा बांधवांच्या पाठिशी किती मजबूत उभे राहतात, हेच आता पहावयाचे आहे. माननीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी जाहीर

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

केलेले आहे की, शिवसेना या बरखास्तीचा गंभीरपणे विचार करीत आहे.

महोदय, हा काही कोणा एकटयाचा प्रश्न नाही, हा महाराष्ट्रातील सर्व जनेतचा तसेच विधिमंडळातील सर्व सदस्यांचा प्रश्न आहे ही गोष्ट मला मान्य आहे. परंतु याबाबत सर्वात जास्त अधिकार कोणाला असेल तर तो शिवसेनेला नक्की आहे. 1969 च्या आंदोलनामध्ये मी स्वत: होतो. पहिली अटक मला झाली होती. तेथील जेलमधून सुटून आल्यानंतर चार दिवसांनी मुंबईसह महाराष्ट्रात सीमा प्रश्नासाठी रणकंदन झाले. महाराष्ट्राच्या या भूमीत मराठी भाषिक असलेला सीमा भाग यावा म्हणून 69 हुतात्मे फक्त शिवसेनेने दिलेले आहेत. संयुक्त महाराष्ट्रासाठी 105 हुतात्मे झ ााले. परंतु सीमा भागासाठी 69 शिवसैनिकांचा बलिदान देणारी ही एकमेव संघटना असल्यामुळे नैतिकतेचा थोडासा जास्त अधिकार आम्हाला पोहोचतो, असे माझे मत आहे. आपण सगळे एकमताचे आहोत. परंतु या प्रश्नी शिवसैनिकांनी त्याग केलेला आहे, त्यासाठी रक्त सांडले आहे. माननीय शिवसेना प्रमुखांच्या आदेशाप्रमाणे त्यावेळेचे शिवसेनेचे नेते, सध्या ते आपल्याकडे जरी असले तरी त्यावेळेला बेळगांवात घुसले होते. त्यांचे समवेत मी देखील बेळगांवात घुसलो होतो. आम्ही तेथे तुरुंगवास भोगला. तेथे काठया झेलल्या होत्या. बेळगांवमधील मराठी माणसांवर होत असलेले अत्याचार, ते झेलत असलेल्या लाठया-काठया महाराष्ट्रातील शिवसैनिकांनी त्यांच्यामध्ये जाऊन स्वीकारल्या या गोष्टीची मी या निमित्ताने आठवण करुन देतो. सन्माननीय सदस्य श्री. रामदासभाई कदम यांनी देखील नंतरच्या कालावधीत तेथे जाऊन निदर्शने केली, त्याबाबतीत माहिती ते आपल्या भाषणात सांगतील. शिवसेना प्रमुखांनी त्यांच्या आदेशाने शिवसैनिकांना लढण्यासाठी तयार ठेवले आहे असे मी नम्रपणे या ठिकाणी सांगतो. मी सगळयाच्या लढयांचा आणि सगळयांच गोष्टीचा येथे परामर्श घेणार नाही.

महोदय, बेळगांव-कारवार सीमा भागाच्या संदर्भात ज्या ज्या वेळी सभागृहात प्रस्ताव मांडले गेले, त्या प्रस्तावांच्या अनुषंगाने आपण सर्वांनी सभागृहात भाष्य केलेले आहे. राज्य सरकारची मानसिकता, केंद्र शासनाची मानसिकता जोपर्यंत बदलत नाही आणि सीमा भागातील मराठी माणसांना न्याय देण्यासाठी ठाम अशी राजकीय इच्छाशक्ती व्यक्त केली जात नाही. तोपर्यंत असेच प्रकार चालू राहणार. तेथील मराठी भाषिकांवर अशाच प्रकारचे अत्याचार होत राहणार. या

3...



ABG/ प्रथम श्री.खंदारे 16:20

श्री.दिवाकर रावते...

ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मघाशी सांगितले की, बेळगाव महापालिकेच्या महापौर महिला आहेत. महापौर महोदयांचे एक निवेदन आलेले. कानडी सरकारने आमच्यावर खुन्नस काढली असा शब्दप्रयोग त्यांनी आपल्या निवेदनात केलेला आहे. त्यांच्या निवेदनात त्यांनी असेही नमूद केलेले आहे की, बेळगाव हे महाराष्ट्राचे आहे आणि त्याचा महाराष्ट्रात समावेश करा, असा टाहो बेळगाव-कारवार सीमा भागातील जनतेने फोडून 1 नोव्हेंबर,1956 रोजी केंद्र सरकारने बेळगावचा कर्नाटकात समावेश केला. त्याचा निषेध म्हणून दरवर्षी 1 नोव्हेंबर हा मराठी भाषिक "काळा दिन " म्हणून पाळतात. सन्माननीय महापौर महोदयांनी असेही नमूद केले आहे की, मी या "काळा दिन" आंदोलनात सहभागी झाले. त्या गोष्टीचा बदला कर्नाटक सरकारने घेतला. "काळा दिन" आंदोलनात तुम्ही का सहभागी झालात अशी नोटीस त्यांना कर्नाटक सरकारने बजावली. त्यास नोटीसला संयमी उत्तर देण्यात आले आहे. तरी देखील कानडी सरकारने आमच्यावर खुन्नस काढली. अशा प्रकारचे अधिकृत निवेदन महापौर महोदयांनी दिले बेळगाव सरकारच्या प्रवृत्तीची, त्यांच्या कृतीची आणि महाराष्ट्र व्देशाची चुणूक त्यांच्या निवेदनातून स्पष्ट शब्दात जाणवली.

सभापती महोदय, मला एक प्रश्न पडलेला आहे, आपण या प्रकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात गेलो आहोत. कोठलाही प्रकार झाला की, आपण न्यायालयात जातो. तेव्हा न्यायालयाकडे प्रथम न्याय मागतो की, तुम्हाला याचिका चालवावयाची असेल तर चालवा, जेव्हा न्याय द्यावयाचा असेल तेव्हा न्याय द्यावा असे आपण म्हणत असतो. आमचा हक्क आहे असे आम्ही म्हणतो. पण समोरची पार्टी अमुक म्हणते, अशा वेळी आहे तशीच परिस्थिती कायम ठेवावी, अशा प्रकारचा एखादा अर्ज आज राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केला आहे काय, या प्रश्नाचा मला शासनाकडून खुलासा हवा आहे. आज जो ठराव सभागृहात मांडला गेला आहे, त्या ठरावाचे मला राज्य शासनाकडून उत्तर हवे आहे. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे व सदर प्रकरण चालविण्यासाठी जे वकील नेमले आहेत, त्यात मराठी वकील किती आहेत याची माहिती सभागृहासमोर सांगितली जावी अशी माझी मागणी आहे. तसेच अशा प्रकरणाचा अभ्यास असलेले, सर्वोच्च न्यायालयात भांडू शकणारे, ज्याची या क्षेत्रात ख्याती आहे, असे बेळगांवमधील तज्ज्ञ वकील या प्रकरणाच्या पॅनलवर नेमले होते, त्यांना या प्रकरणाच्या पॅनलमधून का काढून टाकले याचा

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.दिवाकर रावते...

खुलासा राज्य सरकारने करावा. तसेच हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात चालविण्यासाठी अतिशय अभ्यासू, ख्याती असलेला वकील का नेमला जात नाही याची देखील माहिती या सभागृहास देण्यात यावी, अशीही माझी मागणी आहे.

सभापती महोदय, कर्नाटकातील मुख्यमंत्री पदी श्री.येडीयुरप्पा हे होते. ते मुख्यमंत्री पदावरुन गेले म्हणून बरे झाले. ती व्यक्ती अत्यंत खुनशीपणे वागणारी आहे. अत्यंत खुनशीपणे वागणारे मुख्यमंत्री होते. कर्नाटकात त्यांनी दुसरे कोणतेही काम केले नाही. बेळगावचे कसे कन्नडीकरण करावयाचे एवढे एकमेव काम ते करीत होते. बेळगांव शहरात खुन्नसमध्ये येऊन विधिमंडळाच्या इमारतीचे भूमिपूजन केले. बेळगांव शहरात मराठी भाषिकांच्या दुकानावरील बोर्ड कानडी भाषेत लावण्याची सक्ती केली. त्या विभागात मराठी शाळा चालू देणार नाही, विद्यार्थ्यांनी कानडी भाषेतच शिक्षण घेतले पाहिजे अशी सक्ती केली. अशा प्रकारचे अत्याचार मराठी भाषिकांवर केले. तेथील मराठी भाषिकांवर अत्याचार आणि अन्याय केले. मराठी माणसांचे तळतळाट त्यांना भोवले, त्यामुळे ते घरी बसले. ते आता तुरुंगात आहेत की बाहेर आहेत याची मला माहिती नाही. एका राज्याचा मुख्यमंत्री हट्ट करु शकतो तर महाराष्ट्र सरकार का हट्ट करु शकत नाही असा माझा शासनास सवाल आहे. याबाबतीत देखील शासनाकडून खुलासा झाला पाहिजे.

सभापती महोदय, श्री.शिवराज पाटील-चाकूरकर या व्यक्तीला महाराष्ट्राने आयुष्यभर खासदारकी दिली. सात ते आठ वेळा त्यांना महाराष्ट्रातील जनतेने खासदार होण्याची संधी दिली. श्री.शिवराज पाटील-चाकूरकर हे कायम स्वरुपी खासदार आहेत. ते लोकसभा निवडणुकीत एक वेळा पडले, त्यानंतर त्यांना महाराष्ट्राच्या कॉंग्रेस पक्षाने राज्यसभेवर पाठविले. महाराष्ट्राच्या जीवावर खासदारकी उपभोगत आहेत. ते केंद्र सरकारमध्ये गृहमंत्री असताना या प्रकरणाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्राच्या विरोधात प्रतिज्ञापत्र सादर झाले आणि त्या गोष्टीचे आम्हाला काहीच वाईट वाटत नाही. केंद्र सरकारमध्ये महाराष्ट्रातील व्यक्ती गृहमंत्री म्हणून कार्यरत असताना त्यांच्या कालावधीत महाराष्ट्राच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले म्हणून त्यांना महाराष्ट्रातून खासदारकीची संधी देऊ नका असे त्यावेळच्या महाराष्ट्रातील मंत्रिमंडळातील एकाही मंत्र्यांनी सांगितले नाही. त्यांनी महाराष्ट्रासमवेत गद्दारी केली, प्रतिज्ञापत्र

5...



श्री.दिवाकर रावते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सादर करताना त्यांनी लक्ष दिले नाही म्हणून त्यांना पुन्हा खासदारकी देऊ नका असे सत्ताधारी पक्षाच्या कोणत्याही नेत्यांनी सांगितले नाही. त्यावेळी आम्ही बराच टाहो फोडला. त्यावेळी आम्ही फार मोठे आंदोलन केले. सीमा प्रश्नाच्या बाबतीत प्रत्येक वेळी महाराष्ट्राची मानसिकता कमजोर होत राहिली आणि त्यातून या सर्व गोष्टी निर्माण झाल्या आहेत.

महोदय, सीमा प्रश्नाच्या संदर्भात माननीय पंतप्रधान हे राज्यातील सर्व मुख्यमंत्र्यांच्या बैठका घेत असतात. त्या बैठकीत राज्यात प्रश्नासंदर्भात आढावा घेत असतात. मी या ठिकाणी विश्वासाने बोलतो आहे. माझ्या विश्वासाला तडा गेला मला खूप आनंद होईल. बेळगांव-कारवार-निपाणी हा सीमा भाग आहे, त्यासंबंधी जे काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत, ते सोडवावेत अशी मागणी आतापर्यंत होऊन गेलेल्या महाराष्ट्रातील एकाही मुख्यमंत्र्यांनी माननीय पंतप्रधानांकडे त्या बैठकींमध्ये केलेली नाही असा माझा आक्षेप आहे. दिल्लीपुढे गुडघे टेकवायची सवय झालेली असल्यामुळे, दिल्लीतील लोकांना काय वाटेल या भीतीपोटी आतापर्यंत महाराष्ट्रात होऊन गेलेल्या कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी माननीय पंतप्रधानाच्या समवेत होणाऱ्या आढावा बैठकीत हा प्रश्न लावून धरलेला नाही. म्हणून केंद्र सरकारने आपले पाणी जोखले आहे. राज्यकर्ते आपण बोलू तसे चालतील. महाराष्ट्राच्या एखाद्या विषयाला प्राधान्य दिले नाही तर ते राज्यकर्ते आपल्या बोकांडी बसणार नाहीत याची त्यांना पूर्णपणे खात्री झालेली आहे. माननीय पंतप्रधानाच्या आढावा बैठकीत हा विषय माननीय मुख्यमंत्र्यांकडून का मांडला जात नाही याचा देखील खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, "ज्ञानपीठ पुरस्कार" च्या अनुषंगाने एक कन्नड लेख आला आहे. ज्ञानपीठ पुरस्कार मिळविणारा म्हणजे मोठा साहित्यिक झाला. "ज्ञानपीठ पुरस्कार" हा संपूर्ण देशातील मोठा पुरस्कार आहे. परंतु ज्या लेखकास हा पुरस्कार मिळाला, ती व्यक्ती अतिशय कडवट होती, अतिशय भाषाभिमानी, अतिशय प्रांताभिमानी होती. आम्ही मराठी, मराठी, मराठी असे म्हटले तर आम्हाला प्रांतीयवादी म्हणून हिणवणारे सगळे समोर बसलेले आहेत. "ज्ञानपीठ पुरस्कार " प्राप्त झालेले लेखक आहेत, ते पारितोषिक त्यांच्या डोक्यामध्ये गेले.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्यांनी बेळगावमध्ये जाऊन मराठी भाषिकांना सांगितले की, या ठिकाणी तुम्हाला रहायचे असेल तर रहा, नाही तर महाराष्ट्रात चालते व्हा. कानडी भाषा बोलायची नसेल, कानडी संस्कृती जोपासायची नसेल तर महाराष्ट्रात चालते व्हा असे तेथील एक साहित्यिक म्हणतो आणि महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून एकही निषेधाचा शब्द काढला जात नाही. आमची मानसिकता काय? या सगळ्या कन्नडीगांना आम्ही महाराष्ट्रातून हाकलून लावू असे म्हटले की आम्ही कायदा हातात घेतो, दंगे करतो म्हणून ओरड केली जाते. देशामध्ये कोणालाही कुठेही जायचा अधिकार घटनेने दिला आहे असे सांगितले जाते. परंतु एवढ्या आक्रमतेने कृती करीत आहेत त्यांना हे कळत नाही?

सभापती महोदय, ही न्यायालयीन लढाई आहे. न्यायालयाचा निकाल लागेल तेव्हा लागेल. तोपर्यंत ते आक्रमक राहणार आहेत आणि आम्ही मात्र आहे तसेच आहोत. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी घोषणा केली आणि आम्ही त्यांच्याबरोबर बेळगावात घुसण्याची तयारी केली. ते घुसले तर नाहीच. त्यांच्याबरोबर कधी जाता येईल याची आम्ही मात्र वाट पहात होतो. मंत्री पुढे असले की आम्हाला बळ येईल ही आमची भावना होती. ते बेळगावात घुसलेच नाहीत. कधी घुसणार हे आम्हाला कळलेच नाही. कन्नड भाषिक त्या भागात असे आक्रमक होत आहेत. गेल्या महिन्यात माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या भावना ओथंबून आल्याचे आम्ही पाहिले. सांगली जिल्हयामध्ये एक कार्यक्रम पार पडला. माननीय वन मंत्री डॉ.पतंगराव कदम त्या कार्यक्रमाला गेले होते का हे मला माहिती नाही. माननीय ग्रामविकास मंत्री श्री.जयंत पाटील त्या कार्यक्रमाला उपस्थित होते का हे मला माहिती नाही. परंतु सांगलीमध्ये कर्नाटक व्यापारी महासंघाची स्थापना वाजत गाजत झाली. मी तेथील शिवसैनिकांना सांगून तोडफोड करण्याच्या विचारात होतो. परंतु मला हे उशिरा कळले. आमच्या छाताडावर नाचून ते आमच्या राज्यात कर्नाटक व्यापारी संघ स्थापन करतात आणि तिकडे बेळगावामध्ये मराठीचे नाव घेतले म्हणून निवडून आलेल्या महापालिकेची बरखास्ती करण्याचा निर्णय घेतात. आम्ही कर्नाटक व्यापारी महासंघाच्या कार्यालयात घुसलो आणि तोडफोड केली तर कायदा हातात घेतला म्हणून ओरड केली जाईल. उलट त्या संघाला संरक्षण पुरविले जाईल. मंत्रीमंडळातील एका मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे सांगली जिल्हयातील गुंडांची यादी तयार आहे की नाही याची मला माहिती नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

परंतु त्या गुंडांना या महासंघाच्या संरक्षणासाठी बोलावले जाईल. ही मानसिकता अत्यंत उद्वेग आणणारी आहे. कन्नड रक्षक वेदिकेचे कार्यकर्ते कधीही उठतात आणि आक्रमक होतात. आम्ही कोल्हापूरमध्ये जाहीरपणे फटकावले आहे. एकालाही सोडले नाही. पुन्हा हात लावाल तर याद राखा असा सज्जड दम दिला आहे. त्या बेळगावमध्ये मात्र काही होत नाही. काही करायचे असेल तर तेथील मंत्रालयाच्या परिसरात जातात आणि तेथे धुमाकूळ घालतात.

सभापती महोदय, या संदर्भात अत्यंत कणखरपणे आणि कडवटपणे सरकारला पावले उचलावी लागतील. अन्यथा ठराव संमत करायचा आणि तो केंद्राकडे पाठवायचा एवढीच कृती करुन चालणार नाही. त्या ठरावाला विचारतो कोण? फक्त ठराव संमत होईल आणि तो केंद्र सरकारकडे पाठविला जाईल असे होता कामा नये. माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, सर्वपक्षीय नेत्यांना सोबत घेऊन माननीय पंतप्रधानांच्या भेटीसाठी दिल्लीला जाऊ. त्यासाठी लाखो रुपये खर्च होतील. माननीय पंतप्रधानांना भेटल्याचे समाधान मिळेल. परंतु त्यांच्याशी बोलल्यानंतर त्यांच्या मनात काय आहे हे त्यांच्या चेहऱ्यावरुन कळत नाही. किती वेळा असे करणार आहात? न्यायालयात जाऊन स्थगिती मिळविण्यात यावी. अन्यथा आदरणीय शिवसेना प्रमुखांनी जाहीर केले आहे. मला त्यावर जास्त भाष्य करायची गरज नाही. आम्ही सर्व काही सोसले आहे, भोगले आहे. त्याचे आम्हाला कोडकौतुक आहे असा भाग नाही. परंतु या घटनेमध्ये अनेक शिवसैनिकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. त्याबद्दल आम्ही कोणतीही मागणी केलेली नाही. त्यांची विवंचना आम्ही मांडलेली नाही. पण न्याय कधी मिळणार आहे? महाराष्ट्र आक्रमक कधी होणार? माननीय उप मुख्यमंत्री हे आक्रमक आहेत. ते काय करतात याकडे आमचे लक्ष लागलेले आहे. त्यांनी बेळगावमध्ये घुसण्याचे जाहीर करावे. आम्ही त्यांच्या खांद्याला खांदा लावून पुढे येण्यास तयार आहोत. उलट त्यांना मागे ठेवू आणि आम्ही पुढे राहू. महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या अंगावर लाठी पडू देणार नाही. प्रथम आम्ही लाठी झेलू. परंतु बेळगावातील कानडी माणसाला संपविण्यासाठी आक्रमकता दाखविणार आहात की नाही? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)**

सभापती महोदय, आम्ही पंतप्रधानांच्या भेटीला गेलो होतो तेव्हा सीमा भागातील मराठी भाषिकांना अल्पसंख्याकाचा दर्जा देण्याची मागणी केली होती. तिकडे मराठी माणूस भाषिक

अल्पसंख्याक आहे. अल्पसंख्याकांना महाराष्ट्रात जो दर्जा दिलेला आहे तसा दर्जा सीमा भागातील मराठी भाषिकांना का मिळत नाही? केंद्र सरकारबद्दल अक्षरश: कोणता शब्द वापरावयाचा हेच कळत नाही. कारण शब्द वापरला तर तो असंसदीय होतो म्हणून वापरता येत नाही. तुम्हाला अपेक्षित असलेला शब्द या सभागृहात वापरता येत नाही. आपल्या सभागृहाची प्रतिष्ठा आहे. केंद्र सरकारला गदागदा हलविणार आहात की नाही? विधिमंडळाच्या सर्व सदस्यांसह आम्ही तुमच्यासोबत माननीय पंतप्रधानांकडे जाऊन राजीनामा देऊ. आम्हाला हे सरकार चालवायचे नाही असे सांगू. सीमा भाग महाराष्ट्रात येत नाही तोपर्यंत केंद्र सरकारला हलविणार आहात की नाही? गेली 55 वर्षे सीमा भागातील 10 लाख मराठी बांधव महाराष्ट्राच्या लोकशाही राज्यात येऊ शकत नसतील तर अत्यंत टोकाची भूमिका घ्यावी लागेल. ती भूमिका घेणार आहात की नाही? पृथ्वीराजांच्या नावे मळवट भरल्यानंतर त्याप्रमाणे वागणार की नाही? आदरणीय शिवसेना प्रमुखांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याचे उत्तर या चर्चेच्या निमित्ताने मिळाले पाहिजे.

आम्ही ठराव संमत केला, तो केंद्र सरकारकडे पाठविला तरी त्या ठरावाला कोण किंमत देतो? तो ठराव कचऱ्याच्या टोपलीत टाकला जाईल. या संदर्भात सरकारकडून कोणते पाऊल उचलणार हे समजले पाहिजे. कृपा करुन न्यायालयीन लढाई लढत असताना मराठी भाषिक वकील नेमण्यात यावा. मराठी भाषिक वकिलांचा दुष्काळ पडला आहे का? या प्रकरणी परप्रांतीय वकील सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्राची बाजू मांडण्याचे काम करीत आहेत. त्यात काही कानडी वकील आहेत. ते महाराष्ट्राची बाजू काय मांडणार? महाजन अहवालाचे जे झाले तेच तिकडे होईल. मी वकिलांबाबत शंका घेत नाही. ते जरुर प्रामाणिक असतील. परंतु दमदारपणे महाराष्ट्राची बाजू मांडली गेली पाहिजे. आतापर्यंत जैसे थे परिस्थिती असली पाहिजे अशा प्रकारचा निर्णय व्हावा या दृष्टीने आम्ही या घटनेकडे पाहतो. सर्वोच्च न्यायालयाकडून चांगला निर्णय मिळाला पाहिजे. तरच या ठरावाला अर्थ आहे. अन्यथा आपण ठराव करुनही त्याला काही किंमत दिली जात नाही अशी परिस्थिती येऊ नये. म्हणून ठरावामध्ये बरखास्ती शब्द असला पाहिजे. मी आणि माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मांडलेली उपसूचना सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. घटनात्मक काय किंवा बरखास्ती काय, दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. आपल्याला बरखास्ती शब्द ठेवण्याबद्दल हरकत नाही असे माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले. वयम्

..4..



श्री.दिवाकर रावते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पंचाधिकम शतम्. आम्ही संघर्षात्मक आहोत. पडेल तो संघर्ष करायची आमची तयारी आहे. शिवसेना प्रमुखांच्या आदेशाने कृती करणारे आहोत. आपण आमच्याबरोबर एकत्रित रहावे एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

-----

...5..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सदनामध्ये कर्नाटक सरकारने बेळगाव महानगरपालिका बरखास्त केल्याच्या संदर्भातील भावना व्यक्त करणारा ठराव मांडण्यात आला आहे त्या ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, अत्यंत गंभीर असा हा विषय आहे. त्या अनुषंगाने माननीय सदस्यांकडून सभागृहात भावना व्यक्त करण्यात आलेल्या आहेत. संपूर्ण सीमा भागाचा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे. महाराष्ट्रातील जनतेने आणि लोकप्रतिनिधींनी अनेकदा या प्रश्नाबाबत लढे दिले. मागील 65 वर्षे प्रयत्न करुनही सीमा भागातील मराठी भाषिक जनतेवर कर्नाटक सरकारच्या माध्यमातून अत्याचार सुरुच आहेत. त्याचे चित्र आज सभागृहासमोर उभे राहिले आहे. अनेकदा आपण त्या भागात मराठी भाषिकांविरुध्द ज्या घटना घडल्या त्याबद्दल निषेधाचा ठराव संमत केला. सीमा भागातील लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्रात येऊन राज्याचे मुख्यमंत्री व राज्यातील लोकप्रतिनिधींची भेट घ्यायची आणि त्यानंतर सीमा भाग महाराष्ट्रात समाविष्ट करण्याची मागणी आपण केंद्र सरकारकडे करायची.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ........

परंतु त्यानंतरही बेळगांव भागातील मराठी भाषिकांचा जो प्रश्न आहे तो अद्यापही सुटलेला नाही, याबद्दलची चिंता संपूर्ण राज्यात असणे स्वाभाविकच आहे. त्यादृष्टीने अलिकडे येथे जो प्रकार घडला तो संपूर्ण देशाच्या राज्य घटनेला बाजूला ठेवून झालेला आहे. घटनेच्या विरोधात अशा प्रकारची कृती कर्नाटक सरकारने बेळगांव महापालिका बरखास्त करुन केली. एकूणच हा प्रकार म्हणजे लोकशाही पध्दतीने महापौर निवडून येतात आणि कोणतेही कारण नसताना किंवा फक्त मराठी भाषिकांनी त्यांचे व्यवसाय कन्नडमधूनच केले पाहिजेत, त्यांचा कारभार कन्नडमधूनच केला पाहिजे अशा भावना व्यक्त करुन तसा ठराव घेतला हे योग्य नाही. असा प्रकार देशातील कोणत्याही राज्यात अद्याप झालेला नाही, किंवा एखादा भाषेचा मुद्दा विचारात घेऊन महापालिका बरखास्त केली असे ऐकीवात सुध्दा नाही. मागील वेळी बेळगांवला जी घटना घडली त्यात प्रामुख्याने पोलिसांनी सीमा भागातील लोकांवर लाठीचार्ज केला, अनेक वेळा प्रतिनिधींनी बेळगांवला जाऊन तेथील जनतेला दिलासा देण्याचेही काम केले. या भागात मराठी भाषिक जनता जवळपास 40 लाख इतकी राहते. त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने सामूहिक प्रयत्न करायला पाहिजेत. पक्ष म्हणून कोणताही विचार न करता किंवा कोणत्याही पक्षाचे सरकार असो बेळगांव वासियांना न्याय देण्याच्या दृष्टीने गांभीर्याने पावले उचलणे आवश्यक आहे. मागील काही काळात माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण सर्वपक्षीय शिष्ट मंडळ घेऊन दिल्लीला गेले व माननीय पंतप्रधान यांची भेट घेऊन चर्चा सुध्दा केली. पण सुप्रिम कोर्टात हे प्रकरण असल्यामुळे आपल्याला यामध्ये फारसे काही करता येत नाही, त्यासाठी न्यायालयाच्या निर्णयाची प्रतिक्षा करावी लागणार आहे.

महोदय, सीमा भागातील सर्व सीमावासी आज वेगवेगळ्या अडचणीत आहेत. त्यात महापालिका, नगरपालिका अशा वेगवेगळ्या व्यवस्था असतील त्यात त्यांच्यावर सक्ती केली जाते तसेच मराठी भाषेचा उल्लेख केला म्हणून त्यांच्यावर अशा प्रकारचा अन्याय केला जातो हे कुठे तरी थांबले पाहिजे. शेवटी या देशातील सर्व जनता प्रत्येक राज्यात जाऊन आपला व्यवसाय करु शकते, त्यांना लोकशाही पध्दतीने सर्वच क्षेत्रात मुभा असते परंतु कर्नाटक राज्यात मराठी बांधवांना मात्र अशा प्रकारचा लोकशाहीने दिलेला अधिकार नाकारला जातो व त्यांची कोंडी केली जाते. जेणेकरुन या बांधवांना वाटेल की आपण या देशाचे नागरिक आहोत की नाही अशी भावना त्यांच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ..........

मनात निर्माण होईल. त्यांना असे वाटेल की कर्नाटक सरकारने आपल्याला बाजूला काढले आहे अशा वेळेस या मराठी भाषिकांना संरक्षण देण्याचे काम आपले सर्वांचेच आहे. दुसरी गोष्ट अशी की राज्याची भूमिका म्हणून ज्यावेळी जनतेचे प्रतिबिंब किंवा प्रतिक्रिया उमटतात त्या दोन्ही सभागृहाच्या माध्यमातून व्यक्त होणे देखील स्वाभाविकच आहे. त्यांना कशा पध्दतीने न्याय मिळेल, त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याबाबत आपल्याला सर्वानुमते विचार करावा लागेल. मराठी भाषिकांचे प्राबल्य असलेली बेळगांव महापालिका केवळ आकसाने बरखास्त केली म्हणून दिल्लीला एखादे शिष्ट मंडळ घेऊन या घटनेकडे केवळ एखादी घटना म्हणून न पाहता लोकशाहीचा अधिकार नाकारण्यासारखा हा प्रकार आहे असा विचार करुन प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच याबाबतीत सभागृहाने सुध्दा ही बाब गांभीर्याने घेऊन केंद्रशासनाच्या तसे लक्षात आणून दिले पाहिजे व तसा जाब कर्नाटक सरकारला विचारला पाहिजे अशी भूमिका प्रामुख्याने सर्वांच्या वतीने शासनाने घ्यावी.

सभागृहात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जो ठराव मांडला त्या अनुषंगाने सर्वच पक्षीय सदस्यांनी पाठिंबा व्यक्त केला व ज्या सूचना मांडल्या त्या सूचना सुध्दा ठरावासोबत जोडून पाठविल्या तरी वावगे होणार नाही. तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जी उपसूचना मांडली ती केवळ उपसूचना म्हणून विचारात न घेता प्रस्तावाला जोडून सभागृहाच्या भावना म्हणून दिल्लीपर्यंत पोहचविण्याचे काम सदनाच्या माध्यमातून केले तर त्या सामूहिकपणे संपूर्ण सभागृहाचा ठराव आणि सदस्यांच्या भावना आहेत त्या सुध्दा पाठविण्याची व्यवस्था करावी अशी भावना व्यक्त करतो. तसेच या महत्वाच्या विषयाच्या संदर्भात सर्वपक्षीय सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या भावना व्यक्त केल्या त्या भावना सीमावासियांपर्यंत पोहचविल्या पाहिजेत. जेणेकरुन त्यांनाही वाटले पाहिजे की, कर्नाटक सरकारने जरी बाजूला टाकले तरी आमच्या मागे महाराष्ट्रातील मराठी बांधव, संपूर्ण जनता आहे, आपण एकाकी पडलेलो नाही. आपल्याला कोणीही नाकारु शकत नाही, यादृष्टीने प्रयत्न करावा अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

--------

......3

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र कर्नाटक संघर्ष गेल्या 50 वर्षांपासून सुरु असून इतका प्रदीर्घ काळ सुरु असलेला हा संघर्ष आणि त्यात कर्नाटक सरकारने घेतलेली असामंजस्याची भूमिका याचे दर्शन कालच्या घटनेवरुन दिसून आले. केवळ भौगोलिक प्रदेशावरील आपला हक्क अबाधित राखण्यासाठी तेथील लाखो मराठी बांधवांची चालविलेली मुस्कटदाबी हा चर्चेच्या पलिकडचा विषय झालेला आहे. जगातल्या अशा कोणत्याही संघर्षामध्ये मग तो युरोप अथवा इतर देशातील संघर्ष असेल त्या त्या ठिकाणी सत्तेच्या किंवा बळाच्या जोरावर अशा प्रकारे एखाद्या भाषिक किंवा सांस्कृतिक अल्पसंख्यांक असणाऱ्या घटकाला दाबण्याचा प्रयत्न केला जाते त्यावेळी असा संघर्ष कधीच संपत नसतो. उलट तो अधिक तीव्र होत जातो.

या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, मध्यंतरी महाराष्ट्र एकीकरण समितीचे काही कार्यकर्ते मुंबईत अनेक आमदारांच्या भेटी-गाठी घेत होते. त्यांचे असेच काही प्रश्न होते. बेळगांवची महानगरपालिका बरखास्तीचा निर्णय मात्र हा लोकशाही विरोधी निर्णय आहे. त्यावेळी ते बांधव सांगत होते की, आमची तिसरी, चौथी आणि पाचवी पिढी या संघर्षापर्यंत पोहचलेली आहे. तीन तीन पिढ्यांनी प्रयत्न करुनही हे प्रश्न सुटणार नसतील तर आम्ही या बेळगावच्या भूमीत रहायचे तरी कशाला ? कदाचित गेल्या 50 वर्षातील कुठल्याही पक्षाचे सरकार असले तरी सुध्दा तेथील मराठी भाषिक माणसांना त्या प्रदेशातून कसे हुसकावून लावता येईल या एकाच उद्देशाने प्रेरित होऊन जितकी गळचेपी करता येईल तितकी सर्वच मार्गांनी केली हे प्रकार आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहेत. त्यांच्यामध्ये अनेक वेळा संघर्ष झाले, आपण पुन्हा त्यांच्या पाठीशी उभे राहू म्हणून सांगितले तेही ठीक आहे. पण थोडा वेळ असे लक्षात घ्यायला पाहिजे की, केव्हा तरी या प्रश्नाचा निकाल लागलाच पाहिजे म्हणून आताच याबाबत टोकाची भूमिका घेतली नाही तर आपण ज्याप्रमाणे "मस्ती" अथवा "मस्तवाल" असा शब्दप्रयोग एखाद्या नेत्याच्या बाबतीत वापरतो तशा प्रकारे त्यांची मस्ती वाढत जाईल. इतक्या वर्षात काहीच होत नाही असे म्हटल्यानंतर आपली त्या भागातील जनतेची जी परिस्थिती आहे ती केवळ ते मराठी भाषिक आहेत म्हणून झालेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

कोणत्याही प्रदेशात, कोणतेही भाषा बोलणारे जे लोक असतात त्यांची एक संस्कृती असते, जीवन पध्दती असते. कर्नाटक व महाराष्ट्राच्या सीमा भागात आपण फिरलात तर जी गावे सांगली जिल्हयाला लागून आहेत, कर्नाटकाची जी गावे महाराष्ट्राच्या सीमेवर आहेत त्यांची जी आपापसात देवाण-घेवाण आहे, व्यवहार आहे तो बघितल्यानंतर कर्नाटक राज्यात कोणतेही सरकार सत्तेवर असो ते आपण कोणी तरी मोठे आहोत हे दाखविण्याचे काम करीत असते. गोरगरीब जनतेला यामध्ये काही देणे घेणे नसते. गोरगरीब जनतेचे आपापसात काहीही भांडण नसते. मला सांगावयाचे आहे की, या प्रश्नाच्या संदर्भातील कर्नाटक सरकारच्या व्यवस्थेशी भांडण आहे, कानडी माणसाशी नाही. कानडी, मराठी किंवा कोणताही माणूस कोणत्याही राज्यात राहत असला तरी तो शेवटी भारतीय नागरिकच आहे. या मंडळींना कर्नाटकात का रहावेसे वाटत नाही याचा आपण कधी विचार करणार आहोत की, नाही ? या लोकांना कर्नाटकात रहावेसे वाटत नाही याला बरीच कारणे आहेत. येथील जनतेला मराठी शाळा मिळत नाहीत, मराठी सांस्कृतिक कार्यक्रम बघावयास मिळत नाही, मराठी असल्यामुळे त्यांना नोकरीची संधी मिळत नाही, मराठी माणूस उद्योग करावयास गेला तर त्याला जी काही मदत मिळावयास पाहिजे ती मिळत नाही. सर्व बाजूने मराठी माणसाची कोंडी करण्याचे काम कर्नाटक सरकार करीत आहे. सीमा भागातील लोकांनी नाईलाजाने हा प्रदेश सोडून जावा अशी जर कर्नाटक सरकारची भूमिका असेल तर त्या भूमिके विरुध्द लढा देण्यासाठी आपल्या सर्वांना उभे रहावे लागणार आहे. या लढाईमध्ये केवळ राजकीय पक्षांनीच एकत्र येऊन चालणार नाही.

सभापती महोदय, साहित्य क्षेत्रातील ज्ञानपीठ पुरस्कार हा फार मोठा पुरस्कार आहे. साहित्य क्षेत्रातील ज्ञानपीठ पुरस्काराला सर्वोच्च सन्मान समजले जाते. ज्ञानपीठ पुरस्कार जसा मराठी लेखकांना मिळाला आहे तसाच तो कानडी लेखकांनाही मिळालेला आहे. मराठी संस्कृती फार वरच्या दर्जाची आहे. ज्या कन्नड भाषिक लेखकांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला आहे त्याचा महाराष्ट्राने गौरव केलेला आहे. जर कोणी कानडी ज्ञानपीठ पुरस्कार विजेता मराठीच्या बाबतीत दुसरी भूमिका घेणार असेल तर त्याला थांबविणे ही आपली सांस्कृतिक गरज आहे असे मला वाटते. एका क्षेत्रापुरता मराठी भाषिकांचा लढा मर्यादित करुन आपल्याला चालणार नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

सभापती महोदय, मराठी नाटक महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून बाहेर जाते आहे. मराठी नाटकाचे प्रयोग इंदौर, भोपाळ, गुजरात, मध्यप्रदेश येथे हात असतात. परंतु मी सांगू इच्छितो की, बेळगावच्या आसपासच्या भागातील लोकांची मराठी नाटकाची मागणी असतांना सुध्दा त्या ठिकाणी मराठी नाटके होऊ दिली जात नाही. खरे म्हणजे याला सांस्कृतिक हुकुमशाहीच म्हणावी लागेल. लोकशाहीच्या कोणत्या चौकटीत अशा प्रकारचे वर्तन बसते ? सीमा भागात मराठी साहित्य उपलब्ध होत नाही, मराठीचा कोणताही कार्यक्रम त्या ठिकाणी होऊ दिला जात नाही. मराठीची गळचेपी आपण अजून किती दिवस सहन करावयाची ? खरे म्हणजे कर्नाटक सरकारला सांगितले पाहिजे की, सीमा भागातील लोक हे या देशाचे नागरिक आहेत, त्यांना त्यांची भाषा, संस्कृती आहे, त्यांच्याकडून त्यानी कसे जगावे याबाबतचे स्वातंत्र्य तुम्ही हिरावून घेऊ शकत नाही. खरे म्हणजे हा विषय त्यांच्या स्वातंत्र्याचा लढयाचा देखील होऊ शकतो. इतक्या गंभीर परिस्थितीतून हे वातावरण जात असतांना सामाजिक, सांस्कृतिक वैभव, शिक्षणाची व्यवस्था, उद्योग धंद्याची वाढ व तेथील मराठी माणसाला सन्मानाने जगण्याची संधी हिरावून घेतली जात असेल व बेळगाव महानगरपालिकेला बरखास्त करण्याचे पाऊल कर्नाटक सरकारकडून उचलले जात असेल तर ते अत्यंत चुकीचे आहे. त्यामुळे याला विरोध करण्यासाठी आपल्या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना एकवटून कर्नाटक सरकारचा निषेध केला पाहिजे. घटनेच्या चौकटीत जे जे करता येणे शक्य आहे ते ते करण्यासाठी केंद्र शासनाकडे आपण यासंदर्भात आग्रही भूमिका मांडण्याची आवश्यकता आहे. केवळ भावनेच्या भरात संघर्षाला उतरल्या नंतर अरेला कारे किंवा कोणत्या पध्दतीची प्रतिक्रिया असावी याबाबतही आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, या सदनाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी जो ठराव सभागृहात मांडलेला आहे त्या ठरावास मी माझ्या पक्षातर्फे व्यक्तिशः समर्थन करतो व जो ठराव पास झालेला आहे तो जसाच्या तसा संमत करुन त्यांसदर्भातील कार्यवाहीची तातडीची गरज केंद्र शासनाला पटवून द्यावी अशी सूचना करतो.

सभापती महोदय, या ठरावाच्या संदर्भात मी जी उपसूचना मांडली होती ती मी मागे घेतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी जी सूचना केली होती ती त्यांनी मागे घेतली म्हणून मी त्यांचे अभिनंदन करतो असे नाही तर सीमा भागाच्या नागरिकांच्या संदर्भातील सभागृहातील सदस्यांच्या भावना एक असल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. सीमा भागाच्या नागरिकांच्या पाठीशी संपूर्ण महाराष्ट्र आहे हा मेसेज खरे म्हणजे जाण्याची गरज आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी सांगितले की, विधानसभेत वेगळया प्रकारचा ठराव पास झालेला आहे. परंतु यासंदर्भात मी जेव्हा माहिती घेतली तेव्हा आपला जो ठराव आहे तोच ठराव विधान सभेतही संमत झालेला आहे एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. सीमा भागाच्या संदर्भात विधानसभा आणि विधान परिषदेची दोन वेगवेगळी मते आहेत असे वेगळे चित्र जनते समोर जाता कामा नये. दोन्ही सभागृहांची दोन मते झाली असती तर विधानसभेच्या भाजपाचे वेगळे विचार, विधान परिषदेच्या भाजपाचे वेगळे विचार, तेथील शिवसेनेचे वेगळे विचार, या ठिकाणच्या शिवसेनेचे वेगळे विचार, तेथील काँग्रेसचे व या सभागृहातील काँग्रेसचे वेगळे विचार असे होता कामा नये. कर्नाटक काँग्रेस, महाराष्ट्र काँग्रेस, कर्नाटक भाजप, महाराष्ट्र भाजप यांचे विचार वेगळे आहेत हे मी समजू शकतो. आपण प्रामाणिकपणे मराठी भाषिकांच्या बाजूने आहोत यासंदर्भातील निःसंदिग्ध भूमिका विरोधी पक्ष नेते भाऊसाहेब फुंडकर यांनी मांडलेली आहे.

सभापती महोदय, सभागृह सुरु होतांना माझ्या मनात विचार सुरु होते. मुंबई येथील इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेबांचे स्मारक व्हावे यासंदर्भात जी घटना घडली तसेच काल बेळगाव महानगरपालिका बरखास्त करण्याचा जी घटना घडली या अशा दोन घटना काल घडल्या होत्या. त्यामुळे आज कोणत्या विषयावरील प्रस्तावावर सभागृहात चर्चा होऊ शकते याबाबत माझ्या मनात प्रश्न होता. खरे म्हणजे हे दोन्ही विषय अत्यंत महत्वाचे आहेत.

सभापती महोदय, भाजपचे केंद्रीय नेते श्री. व्यंकय्या नायडू विधी मंडळाच्या आवारात एका बैठकीसाठी आले होते. त्यावेळी आम्ही त्यांना बेळगावच्या प्रश्नाच्या संदर्भात विचारणा केली त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, कन्नड साहित्य ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्यांच्या प्रस्तावावर बेळगाव महानगरपालिकेत प्रस्ताव झाला होता व त्यावर कर्नाटक विधानसभेत काँग्रेस आमदारांनी यासंदर्भातील विषय उपस्थित केला व त्या पध्दतीची ॲक्शन झाली. या ठरावामध्ये "बरखास्ती" शब्द टाकण्याच्या संदर्भात जे जे पक्ष अनुकूल आहेत त्यामध्ये काँग्रेस, जनता दल, भाजप.....

..4..

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, आम्ही असे सांगितले आहे की, या विषयाच्या संदर्भात सर्व सदनाची भावना एक प्रकारची गेली पाहिजे. पक्षीय अभिनिवेशाच्या पलीकडे जाऊन ही चर्चा झालेली असतांना आता अशा प्रकारे कुरघोडी करण्याचा तसेच पक्षीय भूमिका घेण्याचा जो प्रयत्न केला जात आहे तो काही योग्य नाही.

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार साहेबांच्या विचाराशी मी सहमत आहे परंतु आपल्या पक्षाचे अध्यक्ष श्री. माणिकराव ठाकरे यांनी उल्लेख केला की, ठरावामध्ये "बरखास्ती" शब्द असला पाहिजे व त्याला भाजपाने पाठिंबा दिला पाहिजे.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माननीय माणिकराव ठाकरे यांनी सर्व पक्षाची एकमुखी भावना जावी असे मत व्यक्त केलेले आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : मी सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना सांगू इच्छितो की, उद्या माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी विधान परिषद बरखास्त करा अशी सूचना आणली तर काय करणार ? कारण श्री.आर.आर.पाटील हे इमोशनमध्ये आल्यानंतर कोणतीही घोषणा करतात. पण त्या तशाच राहतात हा भाग सोडून द्यावा. यातील मुद्दा असा आहे की, या महाराष्ट्रातून सर्वानुमते ठराव कसा जाईल हे पहावे. महाराष्ट्र एकीकरण समितीचे कार्यकर्ते त्यांना न्याय मिळण्यासाठी लढत आहेत. मागे ते आझाद मैदान येथे आले होते. त्यासंबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी देखील केला आहे. त्यावेळी त्यांनी जे धरणे धरले होते, उपोषण सुरू केले होते त्या ठिकाणी मी नियमित जायचो. त्यामुळे त्यांची महाराष्ट्रातून एकमुखी मागणी आली पाहिजे असे मत आहे. पण तसे न होता वेगळाच प्रकार समोर येतो.

सभापती महोदय, विधान सभेने एकमताने एकच ठराव पारित केला असेल तर विधान परिषदेने देखील एक मताने ठराव पारित केला तर महाराष्ट्र विधान मंडळाची ठाम भूमिका सर्वांसमोर जाईल. मला असे वाटते की, त्यास खूप महत्त्व आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मघाशी सांगितल्याप्रमाणे ज्या शब्दांचा उल्लेख यात केलेला आहे त्यात तो भाव येत आहे. तोच भाव येत असेल तर एखाद्या शब्दाबद्दल भारतीय जनता पक्ष म्हणून आम्हाला वेगळे मत वाटत असेल तर.....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी माझ्या नावाचा उल्लेख केला म्हणून मी बोलण्यासाठी उभा आहे. प्रत्येकाला स्वत:च्या भावना सदनामध्ये मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. एखाद्या प्रस्तावाच्या अनुषंगाने भावना वेगवेगळ्या असू शकतात. त्यांना असे वाटते की, बरखास्त होऊ नये. पण आमच्या भावना अधिक तीव्र झाल्या आहेत. त्यामुळे बरखास्त करावे असे वाटते. अशा प्रकारच्या भावना आम्ही प्रस्तावासंबंधी बोलू शकतो. परंतु, तसे बोलूच नये. आम्ही बोलू तसेच बोलावे, या ठरावासंबंधी अमुकच बोलले पाहिजे,अमुकच बोलता कामा नये अशी जी गाईड लाईन सन्माननीय सदस्य आम्हाला आखून देत आहेत, ती देण्याची आवश्यकता नाही.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला असे वाटते की, माझ्या बोलण्याचा अर्थ सन्माननीय सदस्यांनी चुकीचा काढला असावा. एकमताने प्रस्ताव केला पाहिजे एवढ्या पुरताच मी बोलत आहे. आपण बोलत असताना मी आपल्याला अडविले नाही. आपण काय बोलावे एवढे सांगण्याची माझी क्षमता देखील नाही. आपण एका सत्ताधारी पक्षाचे अध्यक्ष आहात. माझी अपेक्षा अशी आहे की, सीमा भागात राहणाऱ्या मराठी बांधवांसाठी महाराष्ट्रातून चांगला मेसेज गेला पाहिजे. महाराष्ट्र एकीकरण समितीचे सदस्य मुंबईला आले होते तेव्हा मी चार दिवस त्यांना भेटत होतो. मी तेथील मराठी तरूणां बरोबर या विषयी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून खूप चर्चा केली होती. त्या सर्वांची मते घेऊन आम्ही तत्कालीन मुख्यमंत्र्यांना मुंबईत भेटलो होतो, तर दिल्लीत कॅबिनेट मंत्र्यांना भेटलो होतो. त्यावेळी आम्ही त्यांना भेटून कडक शब्दात आमच्या भावना देखील मांडल्या होत्या.

बेळगावमध्ये विकास कसा झाला आहे यासंबंधी देखील तेथील लोकांनी मांडणी केली होती. तेथे आपल्या कोरेंचे मोठे रूग्णालय झालेले आहे. हे सर्व पाहिल्यांनंतर तेथील तरूणांची भूमिका ही वेगवेगळ्या शब्दामध्ये येताना आपण सर्वांनी पाहिलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेला ठराव एकमताने पारित करावा असा आग्रह धरला आहे. हा ठराव एकमताने पारित होऊ शकतो. तो ठराव एक मताने जाणे महत्त्वाचे आहे. या ठरावाला सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, श्री.दिवाकरजी रावते, श्री.हेमंत टकले यांनी ॲक्शन जोडली आहे. आपण नुसता ठराव करून थांबलो नाही. सन्माननीय सदस्यांचे एक मोठे शिष्टमंडळ माननीय राष्ट्रपतींना किंवा केंद्र सरकारला जाऊन भेटले तर त्याचा फायदा होऊ शकेल. ही अशी केस आहे की, ती जर आपण त्यांच्याकडे घेऊन गेलो तर सगळ्या अन्यायकारक मुद्यांचे निराकरण होऊ शकते. कर्नाटक सरकारची कृती पाहता एक प्रकारे घटनात्मकदृष्ट्या आपली बाजू मांडायला मिळालेली आहे. हा त्यातील सर्वात महत्त्वाचा भाग आहे. सीमा प्रश्नासंबंधी मा.श्री.एन.डी.पाटील यांच्या पासून श्री.रामभाऊ कापसे यांच्या पर्यंत अनेक सदस्यांची समिती होती. यात सर्व पक्षांचा आग्रह एकच आहे. त्यासंबंधी मेसेज जाणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आमचा तसा आग्रह आहे. एकीकरण समितीचे कार्यकर्त जेव्हा आम्हाला भेटतात तेव्हा ते सांगतात कधी कधी आमच्याकडे अशी चर्चा होते की, मराठीला महाराष्ट्रातच स्थान मिळत नाही, त्यामुळे आम्ही अजून

..3



BGO/ 17:00

श्री.विनोद तावडे...

किती अपेक्षा

करायची. कदाचित त्यांनी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांची भाषणे ऐकली असतील. आपण मराठी संबंधी काय करतो आहोत हा विषय वेगळा असल्यामुळे मी त्याकडे वळत नाही. आपल्या राज्यात आपण जर मराठीची पाठराखण कणखरपणाने केली तर दुसरीकडे असणाऱ्या मराठी माणसाला ताकद येईल.

मराठी विभाग हा श्री.अशोक चव्हाण मुख्यमंत्री असताना सुरू झाला. त्यामुळे सर्वांना एकत्र घेऊन सर्वानुमते जो ठराव सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेला आहे, तोच आपण सर्वांनी मिळून पारित करावा. तो पारित झाल्यानंतर दिल्लीत जाण्यासाठी सर्व पक्षीय आमदारांना सोबत घेऊन राज्य सरकारने ॲक्शन लाईन ठरविली पाहिजे. ह्या केसच्या निमित्ताने दिल्लीला शिष्टमंडळ नेऊन तेथे यासंबंधातील आपली भूमिका आग्रहाने मांडली पाहिजे एवढे बोलून आदरणीय सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी जो ठराव मांडला आहे, त्याला माझा पाठिंबा देऊन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.......

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बेळगाव, कारवार, निपाणीसह 865 मराठी भाषिक गावे ही महाराष्ट्रामध्ये यावीत म्हणून गेल्या अनेक वर्षापासून लढा सुरू आहे. काल पुन्हा एकदा मराठी भाषिकांची महापौर, उपमहापौर यांची तेथे असलेली महानगरपालिका बरखास्त करण्याचे पाप कर्नाटक सरकारने केले आहे. त्या शासना विरूद्ध घटनात्मक दृष्ट्या कारवाई व्हावी असा ठराव आणला आहे. त्यासंबंधी मी, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, श्री.माणिकराव ठाकरे, यांनी उप सूचना दिली आहे की, सदर शासन घटनात्मकदृष्ट्या अन्याय करीत असल्यामुळे ते बरखास्त करण्यात यावे. सदर उप सूचनेसह प्रस्ताव मांडण्यात आला आहे, असे गृहीत धरून मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सन 1956 मध्ये फजल अली समितीने फाजिलपणा केला. कर्नाटकने चुकीच्या पद्धतीने अन्याय केला हे मान्य केले. यासंबंधी महाराष्ट्रावर केंद्र शासनाने देखील अन्याय केलेला आहे. महाराष्ट्रा पासून हा भाग बाजूला ठेवण्याचे काम त्यावेळी फजल अली समितीच्या निर्णयानुसार झालेले आहे.

मी एक गोष्ट सन्मानननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांच्या लक्षात आणून देतो. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा पहिला ठराव 1956 साली श्री.ग.दि.माडगूळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बेळगाव साहित्य संमेलना मध्ये झाला. त्यानंतर फजल अली समितीचा अहवाल आलेला आहे. तेव्हा पासून तेथील मराठी भाषिक जनतेवर अन्याय होत आहे. मराठी संस्कृती नष्ट करण्याचा चंग कर्नाटक सरकारने बांधलेला असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

आपण थोडेसे मागे जाऊन पाहिले तर संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे प्रबोधनकार ठाकरे असू देत, आचार्य अत्रे असू देत, सेनापती बापट असू देत, एस. एम. जोशी असू देत, कॉम्रेड एस. ए. डांगे असू देत दुर्दैवाने यापैकी एकही व्यक्ती आज शिल्लक नाही. या सर्वांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी लढा दिला आहे. विशेषत: 1969 साली संयुक्त महाराष्ट्राकरिता शिवसेना प्रमुख माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये आंदोलन केले होते. त्या आंदोलनाला मराठी माणूस आज देखील विसरला नाही. त्या आंदोलनामध्ये शिवसेना प्रमुखांनी स्वत: तीन महिन्यांचा कारावास भोगला होता. त्या आंदोलनामध्ये 69 शिवसैनिक शहीद झाले होते याची आज देखील बेळगावमधील मराठी माणसाला निश्चितपणे आठवण आहे.

सभापती महोदय, गेली 52 वर्षे आपण वाट पाहिली. आपण सातत्याने लढा देत आहोत. आपण स्वातंत्र्याची फळे चाखत आहोत.आज देखील बेळगाव, धारवाड, निपाणी, भालकीसह जवळ जवळ 40 लाख मराठी भाषिक पारतंत्र्यामध्ये जगत आहेत. आपल्याकडे हात जोडून विनवणी करीत आहेत, डोळे लावून सांगत आहेत की, महाराष्ट्र हा आमचा मोठा भाऊ आहे आणि आम्ही आपली लहान भावंडे आहोत आपण आमच्यासाठी काय करीत आहात? गेली 52 वर्षे झाली आहेत, अन्याय सहन करण्याची परिसीमा ओलांडली आहे. आपण आम्हाला कधी न्याय मिळवून देणार आहात? या भावनेने महाराष्ट्राकडे ही जनता गेली 52 वर्षे पहात आहे. सभापती महोदय,घटनेच्या कलम 131अन्वये आपण दिनांक 29 मार्च 2004 रोजी सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रकरण नेले. या गोष्टीला जवळ जवळ आठ ते नऊ वर्षे झाली आहेत. या आठ-नऊ वर्षामध्ये काही तरी निर्णय लागून आम्हाला न्याय मिळेल अशी आपली अपेक्षा होती. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असतांना देखील अनेक वेळा या मराठी बांधवांवर अन्याय करण्याचे काम कर्नाटक सरकारने केले आहे. सभापती महोदय, मघाशी माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार साहेबांनी एका गोष्टीचा या ठिकाणी उल्लेख केला. त्यावेळचे एक दलित, मागासवर्गीय महापौर श्री. विजय मोरे यांच्या तोंडाला आमदार निवासामध्ये येऊन काळे फासण्याचा आणि त्यांना मारहाण करण्याचे कृत्य करण्यात आले आहे. एका मागासवर्गीय, दलित मराठी महापौरांची त्याठिकाणी अशी अवस्था होते, त्याकरिता आतापर्यन्त आम्ही काय केले आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. रामदास कदम.....

आज या विधानपरिषदेमध्ये आपण ठराव मांडलेला आहे त्या पध्दतीने विधानसभेमध्ये देखील मी विरोधी पक्षनेता असतांना अशाच प्रकारचा ठराव मांडलेला
होता. तो ठराव एकमताने संमत झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्री आम्हा सर्व पक्षांच्या नेत्यांना दिल्लीला घेऊन गेले. दिल्ली येथे माननीय केंद्रीय मंत्री श्री. चिदंबरम साहेबांना भेटलो, माननीय पंतप्रधानांना भेटलो आणि त्यांच्याकडून आम्हाला आश्वासन मिळाले. मघाशी माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब म्हणाले की, आपण अशाप्रकारचे अनेक ठराव केंद्र सरकारकडे पाठविले आहेत, परंतु त्या ठरावांचे पुढे काय झाले? कदाचित या प्रस्तावाची अवस्था देखील तशीच होईल की काय? तेथील सीमा भाग केंद्र शासित करण्यात यावा अशाप्रकारची मागणी नवीन नाही, यापूर्वी अन्‌क वेळा तशी मागणी आपण केली आहे. यापूर्वी देखील आपण हा प्रस्ताव एकमताने संमत करुन केंद्र सरकारकडे पाठविला आहे. त्या प्रस्तावावर केंद्र शासनाने नंतर काय केले, काहीही केले नाही? त्यामुळे आपल्याला ही गोष्ट नवीन नाही. सभापती महोदय, मला एक गोष्ट समजत नाही की, कर्नाटक शासनाची कृती घटनाबाह्य आहे तर मग ते शासन बरखास्त करावे अशी मागणी केली तर आमचे कुठे चुकले आहे, ताकाला जाऊन कशासाठी भांडे लपवायचे हे मला समजत नाही. मघाशी माननीय सदस्य श्री. विनोद तावडेजी म्हणाले की, विधानसभेमध्ये वेगळे आणि या सभागृहामध्ये वेगळे. तर मग आपल्याला सांगावयाचे आहे की, तुमच्या कर्नाटक सरकारची भूमिका वेगळी आणि तुमची येथील भूमिका वेगळी आहे. म्हणून कर्नाटक सरकार बरखास्त करावे असे नाईलाजास्तव आम्हाला सांगावे लागत आहे. आपण या राज्यामध्ये भाऊ भाऊ आहोत, परंतु तुमचा पक्ष कर्नाटकमध्ये ती भूमिका बजावीत नाही. कदाचित याचे आपल्याला वाईट वाटेल. माननीय नामदार श्री. नारायण राणे साहेबांना माझी विनंती आहे की, आपण हा विषय हसण्यावारी नेऊ नका, हा हसण्याचा आणि चेष्टेचा विषय नाही. आपण या राज्याचे ज्येष्ठ मंत्री आहात ही बाब आपण गांभीर्याने घ्यावी अशी माझी आपणास कळकळीची विनंती आहे. माझे काही चुकत असेल तर मला सांगा मी भाषण थांबवून खाली बसतो.

सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये झालेल्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, या सदनाचे नेते उपस्थित होते. त्यावेळी हे कर्नाटक शासन बरखास्त करावे अशी मागणी करण्याचा निर्णय घेण्यात आले, त्यानंतर कुठे माशी शिंकली? माननीय सभापतींच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. रामदास कदम.....

दालनामध्ये झालेल्या बैठकीमध्ये एकमताने निर्णय घेण्यात आला, त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले त्यानंतर वेगळी भूमिका घेऊन आपण या सभागृहामध्ये कसे येऊ शकतो? त्यावेळी अशी कोणती अडचण निर्माण झाली? सभापती महोदय, हा विषय शिवसेना-भाजप, कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेसचा नाही, कोणत्याही पक्षाचा नाही. मी स्वत: त्या भागामध्ये जाऊन आंदोलन केले आहे. आज देखील त्या ठिकाणी "रामदास कदम वॉंटेड" आहे, त्यानंतर देखील गेलो तुमच्यात हिंमत असेल तर मला अटक करुन दाखवा. त्या भागाची अवस्था पाहिल्यानंतर मी या ठिकाणी पोटतिडिकीने बोलत आहे.

सभापती महोदय, बेळगाव महानगरपालिका बरखास्त करण्याचा कर्नाटक शासनाचा हा पहिलाच निर्णय नाही. सन 2005 मध्ये देखील अशाच पध्दतीने ती महानगरपालिका बरखास्त करण्यात आली होती. त्यानंतर या सभागृहाने अनेक वेळा एकमताने ठराव पारित करुन केंद्र शासनाकडे पाठविल्यानंतर त्याचे पुढे काय झाले? काहीही झाले नाही. सभापती महोदय, एका बाजूला तेथील तरुण मुलांवर खोटया केसेस लावून त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचे काम सुरु आहे. त्या भागातील मराठी लोकांनी सभा घेऊ नये या करिता कायमची जमावबंदी लावण्यात आलेली आहे. जर सभा घेण्याचा प्रयत्न केला तर तेथील मराठी बांधवांना उचलून जेलमध्ये टाकण्याचे काम केले जात आहे. असे प्रकार होत असतांना आपण नेमके कुठे आहोत? आज तेथील महापौर आणि नगरसेवक माननीय मुख्यमंत्र्यांना भेटण्याकरिता या ठिकाणी आले होते. ज्यावेळी त्यांच्यावर अन्याय होतो त्यावेळी ते लोक आपल्या शासनाला भेटायला येतात. कर्नाटक सरकारकडून आमच्यावर अन्याय होत असतांना आम्हाला तुमच्याकडून मदतीची अपेक्षा आहे, तुम्ही आम्हाला कोणती मदत करणार आहात असे ते आपल्याला विचारीत आहेत. असे असतांना या ठरावामध्ये "बरखास्त" शब्द समाविष्ट करावयाचा की नाही यावरुनच आमच्यामध्ये भांडण सुरु आहे. जे सरकार आमच्या मराठी माणसाच्या मुळावर उठले आहे ते कोणत्याही पक्षाचे सरकार असू दे, ते राष्ट्रविरोधी शासन मुळापासून उखडून टाकण्याची भूमिका या सभागृहाने घेतली तर मी चुकलो असे मला अजिबात वाटणार नाही.

या ठिकाणी शिवसेना-भाजप किंवा अन्य कोणत्याही पक्षाचा विषय नाही. या ठरावाला कोणत्या पक्षाने पाठिंबा दिला हा विषय होऊ शकत नाही. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, तेथील 40 लाख मराठी माणसांना एकदा कळू दे की, महाराष्ट्राचे विधिमंडळ, महाराष्ट्रातील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. रामदास कदम.....

शिवसेना-भाजप, कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेस सर्व पक्षांची मंडळी ही आमच्या सोबत आहेत. हा संदेश त्यांच्यापर्यन्त एकदा जाऊ दे. सरकार कुणाचेही असेल, ते आज असेल उद्या नसेल परंतु शब्दांचा खेळ न करता एकदा त्यांच्यापर्यन्त संदेश गेला पाहिजे. कर्नाटक सरकारचे ते कृत्य घटनाबाह्य आहे, घटनेला हरताळ फासण्याचे काम त्या सरकारने केले आहे,लोकशाहीचा खून पाडण्याचे काम त्या सरकारने केले आहे, लोकशाहीला काळिमा फासण्याचे काम त्या सरकारने केले आहे असे नालायक शासन बरखास्त करा असे मी म्हटले तर माझे कुठे चुकले आहे? आम्ही ताकाला जाऊन भांडे कशासाठी लपवीत आहोत? सभापती महोदय, मी विधानसभेमध्ये 20 वर्षे होतो प्रत्येक वेळी, प्रत्येक वर्षी या प्रश्नावर त्या सभागृहात चर्चा झालेली आहे. माझी आपणामार्फत शासनाला विनंती आहे, आपणामार्फत या सभागृहाचे नेते माननीय श्री. अजितदादा पवार साहेबांना विनंती आहे की, आत एक आणि बाहेर एक असे नको. माननीय सभापतींच्या दालनामध्ये एक आणि सभागृहामध्ये वेगळी भूमिका अशी आपणाकडून मुळीच अपेक्षा नाही. आपण आपल्या भाषणामध्ये सांगत आहात की, "होय" हे कर्नाटक शासन बरखास्त झालेच पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:20

श्री.रामदास कदम . . . .

आमचे सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील सांगत आहेत की, असे सरकार बरखास्त झाले पाहिजे आणि तुम्ही जी बाब भाषणामध्ये सांगत आहात मग ती तुम्हाला प्रस्तावामध्ये समाविष्ट करण्यामध्ये काय अडचण आहे? तुमच्या भावना काय आहेत ? तुम्ही जे व्यक्त करीत आहात, जे बोलत आहात मग प्रत्यक्षात याबाबत दुटप्पीपणा कशासाठी करावयाचा. त्यामुळे ती बाब प्रस्तावामध्ये आणावी. परंतु बोलावयाचे एक आणि करावयाचे वेगळे, खाण्याचे एक आणि दाखविण्याचे वेगळे अशा भूमिका कृपा करुन ठेऊ नका. म्हणून हा बेळगाव, कारवार, धारवाड, निपाणीसह 40 लाख मराठी माणसांच्याच अस्मितेचा नव्हेतर या महाराष्ट्रातील 18 कोटी मराठी माणसाच्या अस्मितेचा प्रश्न आहे. म्हणून मराठी माणसाच्या मूळावर येणाऱ्या कर्नाटक सरकारला तात्काळ बरखास्त करावे अशी मी जी उप सूचना दिलेली आहे, ती मंजूर करावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

-----

. . . .2 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी सदनामध्ये जो ठराव मांडलेला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न असून त्याअनुषंगाने ठराव मांडलेला आहे. कर्नाटक सरकारने बेळगाव महानगरपालिका बरखास्त केली असून त्याच्या निषेधार्थ आपण हा ठराव मांडलेला आहे. बेळगाव-कारवार भागामध्ये मराठी भाषिकांचा छळ होत आहे, त्यांच्यावर अत्याचार होत आहेत आणि त्याकडे केंद्र शासनाचे लक्ष वेधावे आणि केंद्र शासनाने कर्नाटक सरकारवर घटनात्मक कारवाई करावी याकडे लक्ष वेधण्यासाठी येथे ठराव मांडण्यात आलेला आहे. या ठरावाबाबत अनेक मान्यवरांनी विधानसभेमध्ये आणि विधान परिषदेमध्ये भाषणे केली आहेत. परंतु एका विशिष्ट शब्दावरुन म्हणजे बरखास्त हा शब्द वापरावा की वापरु नये याबाबत देखील फार चर्चा झाली.

सभापती महोदय, बेळगाव-कारवारसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा अशी महाराष्ट्रातील जनतेची इच्छा आहे आणि सीमा भागातील लोकांची तर तीव्र इच्छा आहे. 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून आजपर्यंत विधान सभा आणि विधान परिषदेमध्ये अनेक वेळा तसेच अर्थसंकल्पाच्या वेळेसही सीमा भागातील बांधवांना महाराष्ट्रात विलीन करण्यात यावे यादृष्टीने अनेक ठराव झाले असून त्यावर अनेक वेळा चर्चा झालेली आहे आणि आजही चर्चा होत आहे. ज्या वेळेला कर्नाटकच्या विधानसभेमध्ये बेळगाव-कारवारच्या संबंधात प्रश्न उपस्थित होतो, मग तो एखाद्या कारवाई बाबत असो किंवा अन्य कोणत्याही कृत्याबाबत असो, त्यासंबंधात मी आतापर्यंत असे ऐकलेले आहे की, तेथील सर्व पक्ष, कर्नाटक मधील मराठी माणसे सोडून सर्व जाती-धर्माचे लोक एक होतात आणि एकदिलाने, एक विचाराने मग ती बाब विधानसभेमध्ये उपस्थित झाली असेल तर एकदिलाने, एक मताने ठराव पास झाल्याचा आपल्यासमोर इतिहास आहे. तेथे कोणाची भिन्न मते नसतात. शब्दांच्या कोड्या नसतात. तसेच कोणता शब्द वापरावा अशीही चर्चा नसते. बेळगाव महानगरपालिकेवर किंवा तेथील भाषिकांवर कारवाई करावयाची म्हणजे करावयाचीच. त्या ठिकाणी आतापर्यंत एकमताने निर्णय झालेला आहे, या उलट आपण महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेतील आणि विधान परिषदेतील चित्र पाहिले तर आज आपल्याला सर्वांना कर्नाटक राज्यामध्ये घडलेल्या कृत्यांचा, तेथील अत्याचारांच्या निषेधार्थ ठराव करावयाचा आहे. मग असे असताना सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे होऊन एकमताने हा ठराव पास झाला पाहिजे या मताचा मी आहे.

सभापती महोदय, त्याठिकाणी मराठी भाषिकांवर अत्याचार होतात याबद्दल दुमत नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तेथील लोकांवर अन्याय झालेला आहे याबद्दल दुमत नाही. तसेच बेळगाव-कारवारसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे याबाबतही दुमत नाही. मग असे असताना 15 डिसेंबरला बेळगाव महानगरपालिका बरखास्त करण्यात आल्यानंतर आज विधान परिषदेमध्ये तो मुद्दा उपस्थित करण्यात आला. माननीय अध्यक्षांच्या दालनामध्ये बैठक झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी यासंबंधात ठराव मांडावा आणि मग त्या ठरावामध्ये काय-काय असावे हे ठरल्यानंतर त्याप्रमाणे ठराव तयार करण्यात यावा. हा ठराव तयार करताना भारतीय घटना, कायदे, नियम इ.जे काही आहेत, त्यानुसार आणि प्रथा-परंपरला अनुसरुन आपण ठराव सुटसुटीत बनविण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा वेळी जर एखादा शब्द आला नाही किंवा तो शब्द जर त्या मध्ये बसत नसेल तर आपण विधान सभेमध्ये सांगू शकतो की, मला असे-असे वाटते आणि बरखास्त करा म्हणजे करा असे म्हणू शकतो. तसे प्रोसीडींगमध्ये आहे. पण त्यावरुनही चर्चा होते. यावरुन सगळयांच्या लक्षात काय आले ? तर मूळ प्रश्न बाजूला रहातो आणि वेगळी कलाटणी मिळाल्याने सभागृहामध्ये मत भिन्नता निर्माण झाल्याचे चित्र दिसते, तेव्हा आजही महाराष्ट्रामध्ये कोणत्याही विषयाबाबत एकमत होत नाही असे तेथील सीम भागातील बांधवांना वाटणार नाही काय आणि आपण याचा विचार करावयास नको काय? याबाबत असा विचार करावयास पाहिजे की, बेळगाव-कारवारचा प्रश्न आला की एकमताने निर्णय घेतला जातो. अशा वेळी वेगळे विचार आणता कामा नयेत. अशा प्रकारे अस्मितेचा प्रश्नाबाबत राजकारण व्हावे असे मला वाटत नाही आणि तसे होऊही नये. असे प्रकार कर्नाटक राज्यामध्ये का होत नाहीत ? बेळगाव-कारवारचा प्रश्न कर्नाटक राज्यामध्ये राजकीय दृष्टीकोनातून वापरला जातो. तेथील सरकार अपयशी होते, फेल्युअर होते, तेथील सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप होतात. मात्र त्याच वेळेला बेळगाव-कारवार बाबत कारवाई करावयाची आणि प्रश्न डायव्हर्ट करावयाचा असे प्रकार कर्नाटक राज्याने सातत्याने आतापर्यंत केलेले आहेत आणि जे आताही केले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना माहिती आहे की, तेथील एक माननीय मुख्यमंत्री जेलमध्ये होते. कारण असेच आहे. अशा वेळी दुसऱ्यांना दाखववायचे की, मी काहीतरी फार करीत आहे. मी कसा कर्तृत्ववान आहे आणि आपले मत टिकविण्यासाठी बेळगाव-कारवार महानगरपालिका बरखास्त करुन त्यांना बळी देण्याचे काम केले, हे राजकारण आहे आणि यासाठी आपल्या येथील बांधवांनी, सहकाऱ्यांनी, लोकप्रतिनिधींनी याचे समर्थन केल्याबाबतचा वास येणे हे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देखील पाप आहे असे मला म्हणावयाचे आहे. कारण कोणीही याचे समर्थन करताच कामा नये. बरखास्त करा किंवा काहीही करा. ठरावामध्ये जसे नियमाप्रमाणे ड्राफ्टींग पाहिजे तसे करावे, आमचा त्याला आक्षेप नाही. जे म्हणावयाचे आहे त्यातून तीव्र शब्दात विरोध झाला पाहिजे अशा प्रकारे आज सर्वांचे मत येणे गरजेचे होते. पण वाईट याच गोष्टीचे वाटते की, आम्ही हे सर्व सत्ते साठी, पदासाठी करावे आणि आमची अस्मिता गहाण ठेवावी, ती दूर करावी हे बरोबर नाही याचे मला वाईट वाटले. याठिकाणी कशासाठी उप सूचना यावयास पाहिजेत ? यापूर्वी अस्मितेच्या प्रश्ना बाबत माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या ठरावाबाबत कधीही सुधारणा आल्या नाहीत आणि त्या येता कामा नयेत या मताचा मी आहे. म्हणून आज आपणा सर्वांचे हे कर्तव्य आहे की, सर्वांनी केंद्र सरकारकडे या घटनेचा निषेध करावयास पाहिजे.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधान देशामध्ये नाहीत. ते परदेशात आहेत, नाहीतर आपण सर्वजण उद्या त्यांना भेटण्यासाठी गेलो असतो आणि त्यांना सांगितले असते की, बेळगाव महानगरपालिकेवर अशा प्रकारची कारवाई झालेली असून आपण कर्नाटक सरकारला सदरहू कारवाई रद्द करण्याबाबत सांगावे आणि तेथील महानगरपालिका पूर्ववत कार्यरत होऊ द्यावी. सदरहू महानगरपालिका बरखास्त करण्यासाठी कोणते कारण आहे, तेथे अकार्यक्षमता आहे काय? मग कर्नाटक सरकारबाबत असे म्हणता येईल की, त्याठिकाणी अकार्यक्षमता आहे, तेथे भ्रष्टाचार आहे, विकास होत नाही म्हणून केंद्र शासनाने ते सरकार बरखास्त केले तर ते घटनेमध्ये बसेल काय ? तसे नियमामध्ये आहे काय ? आम्ही त्यासाठी घटनाबाह्य असा शब्द घातलेला आहे. कर्नाटक सरकारने केलेली कारवाई घटनेनुसार, कायद्यानुसार नाही असे आम्ही ठरावामध्ये म्हटलले आहे. म्हणून हा भावनेशी संबंधित असा संवेदनशील प्रश्न असून आमच्या अस्मितेचाही प्रश्न आहे आणि त्याबाबत आमचे दुमत नाही तर काहीही झाले तरी एकमतच असावयास पाहिजे. आपण बाकी इतर विषयांबाबत भांडू, हवी ती चर्चा करु पण या प्रश्नावर चर्चा आणि मतभिन्नता असता कामा नये या मताचा मी आहे. त्यामुळे याठिकाणी जसाच्या तसा ठराव पास करावा. यामध्ये काही बदल करु नये असे माझे मत आहे. तुमचे जे मत रेकॉर्डवर आले आहे ते मिडियानेही ऐकलेले आहे आणि ते बाहेर जाईल. पण त्याचबरोबर जर भविष्यामध्ये असा प्रसंग आला, ठराव आला तर त्यावेळी विचारांच्या बाबतीत फाटे फोडले जाऊ नयेत या मताचा मी असल्यामुळे याठिकाणी कर्नाटक सरकारचा आणि त्यांच्या प्रवृत्तीचा तीव्र शब्दात निषेध करणे आवश्यक आहे



श्री.नारायण राणे . . ..

आणि आपल्या लोकांनी केंद्र शासनाकडे जाऊन याबाबत दाद मागितली पाहिजे.

सभापती महोदय, याठिकाणी काही जणांनी टीका केली की, काँग्रेस पक्ष निर्णय घेत नाही.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे. .

त्यावेळी मी पंतप्रधान माननीय वाजपेयी यांच्याकडे शिष्टमंडळ घेऊन गेलो होतो. माननीय श्री. पवार साहेबांसह उच्चाधिकार समितीचे आणि सर्व पक्षाचे नेते त्या शिष्टमंडळामध्ये होते. मी माननीय पंतप्रधानांसमोर हा विषय मांडला. त्यावेळी त्यांनीही असेच सांगितले की, दोन्ही राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी एकत्र बसून मार्ग काढावा. त्यांनीही मार्ग काढला नाही. काही अडचणी असू शकतील. मी माननीय पंतप्रधान श्री. वाजपेयी यांच्यावर टीका करु शकत नाही पण. काही लोक याचेही राजकारण करतात की, काँग्रेस पक्ष काही करीत नाही. अशा विषयाचे कोणी राजकारण करु नये. अशा विषयाच्या बाबतीत राजकारण होऊ नये असे मला वाटते. हे असावे, हे नसावे, ज्यांना जसे वाटते तसे करावे. पण कायदा आहे. भारतीय घटना आहे........

श्री. दिवाकर रावते : काँग्रेस पक्षाचे कोणीही नाव घेतलेले नाही. "आ बैल " या उक्ती प्रमाणे आपण कशासाठी स्वत:वर ओढवून घेत आहात.

श्री. नारायण राणे : जे रेकॉर्डवर आलेले आहे त्यावर मी बोललो आहे. आपलेही भाषण मी सगळे ऐकलेले आहे. म्हणून अशा प्रश्नाचे कोणतेही राजकारण होऊ नये. या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जो ठराव मांडलेला आहे तो ठराव सर्वांनी एक मताने मंजूर करावा, या मताचा मी आहे. हे माझे मत आहे. या संबंधी बेळगाव-कारवारसह मराठी भाषिकांवर भविष्यात अत्याचार होऊ नयेत तो भाग लवकरात लवकर महाराष्ट्रात यावा, या दृष्टीने पुढची कारवाई राज्य सरकारने, केंद्र सरकारने करण्याच्या दृष्टीने सर्व सन्माननीय सदस्यांनी योग्य ते सहकार्य करावे, एवढीच अपेक्षा करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, या ठरावाला उप सूचना कशा साठी मांडता, उप सूचनेची काय आवश्यकता आहे असे बोलले गेले......

श्री. नारायण राणे ( खाली बसून ) : मी या भाषेत बोललो नाही.

श्री. रामदास कदम : उप सूचना मांडण्याची आवश्यकता काय होती असे आपण आता बोलला. सभापती महोदय, उप सूचना मांडण्याची आवश्यकता एवढीच होती की, दालनामध्ये चर्चा करताना माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांनी जे आश्वासन दिले होते ते आश्वासन आम्हाला या ठरावात पहावयास मिळाले नाही. आम्हाला त्या ठिकाणी जो शब्द दिला होता तो या ठरावात नव्हता म्हणून आम्हाला ही उप सूचना मांडावी लागली.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये जो ठराव मांडलेला आहे त्या ठरावाच्या संदर्भात दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार व्यक्त केले आहेत. एक शब्द सोडला तर या ठिकाणी जो ठराव मांडण्यात आलेला आहे त्या मताशी सर्व सन्माननीय सदस्य सहमत आहेत. सन्माननीय ज्येष्ठ मंत्री श्री. नारायण राणे यांनी सुध्दा सांगितले की, आम्ही देखील आमच्या परीने आमच्या भावना व्यक्त केल्या आहेत मग सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे असतील, सन्माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील, सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, रामदास कदम तसेच अन्य अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांची स्वत:ची भावना रेकॉर्डवर आणलेली आहे. शेवटी सभागृहाने ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, सभागृह चालविण्यात येत असताना घटनेचे आणि नियमांचे पालन करुनच निर्णय घेण्यात येतात. जे ठराव करण्यात येतात त्याचे पूर्णपणे रेकॉर्ड ठेवण्यात येते. आम्ही आज सन्माननीय सदस्य असलो तरी उद्या असूच असे नाही, उद्या दुसरे कोणी तरी सन्माननीय सदस्य या सभागृहात लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येणार आहेत. परंतु रेकॉर्ड मात्र तसेच राहणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला. परंतु सर्व गट नेत्यांबरोबर चर्चा होत असताना आपण सुध्दा त्या चर्चेमध्ये सहभागी होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि मी स्वत: देखील काही बाबींवर चर्चा केली. परंतु नंतरच्या काळात ज्या वेळी ठराव करण्याचे ठरले त्यावेळी महाराष्ट्राच्या वतीने सीमा भागातील मराठी भाषिकांना एक पाठबळ देण्याच्या दृष्टिकोणातून एक ठराव करावयाचा आहे. तो ठराव केंद्र शासनाकडे गेल्यानंतर आपल्या सर्वांच्या मनात जे आहे त्या बाबतीत घटनात्मक तरतुदीप्रमाणे त्यांनी केलेले कृत्य तर घटनाबाहय आहेच परंतु घटनात्मक तरतुदीप्रमाणे कर्नाटक शासनावर कठोर कारवाई करावी, अशा प्रकारचे सर्व शब्द या ठरावामध्ये आलेले आहेत. त्यामुळे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, सर्वांच्या वतीने आपण ठराव करीत असताना आतापर्यंत एकमताने ठराव झालेले आहेत. काही थोडीशी वेगळी मते असू शकतात. परंतु ती मते मांडल्यानंतर पुन्हा प्रत्येकाने आपापली योग्य अशा प्रकारची भूमिका बजावलेली आहे. तशाच पध्दतीने आजच्या ठरावाला मंजुरी देत असताना महाराष्ट्रातील जनतेपर्यंत आणि सीमा भागातील मराठी भाषिकांपर्यंत चांगल्या प्रकारचा मेसेज जाण्याच्या

..3.



SMT/ 17:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दृष्टिकोनातून मी जो ठराव मांडलेला आहे, त्या ठरावाला सर्वांनी मान्यता द्यावी आणि ज्या उप सूचना केलेल्या आहेत त्या उप सूचनांमधील शब्दाचा अगदी जसाच्या तसा अर्थ न काढता हा ठराव वाचल्यानंतर वकिलांना किंवा ज्यांना या संदर्भातील बारकाईने जाण आहे ते देखील मान्य करतील की, हा ठराव व्यवस्थित झालेला आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, दिवाकर रावते, हेमंत टकले आणि रामदास कदम या चौघांनाही माझी विनंती आहे की, त्यांनी ज्या उप सूचना केलेल्या आहेत त्या त्यांनी मागे घ्याव्यात आणि या ठिकाणी जो ठराव मांडलेला आहे त्याला पाठिंबा द्यावा अशी पुन्हा एकदा या चारही सन्माननीय सदस्यांना मी आग्रहाची विनंती करतो.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी या ठिकाणी स्पष्टपणे भूमिका मांडली की, या ठिकाणी शासनाने जो ठराव मांडलेला आहे त्याला माझा पूर्णपणे पाठिंबा आहे आणि त्या संदर्भात आम्ही ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचना आमच्या भावना म्हणून रेकॉर्डवर आलेल्या आहेत त्यामुळे तशा प्रकारे केंद्र शासनाला कळविण्यात यावे, असे सुध्दा आम्ही सांगितलेले आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, माझ्याकडून एक गोष्ट सांगण्याचे चुकून राहून गेले. मला या ठिकाणी एवढेच सांगावयाचे आहे की, वकिलांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मुद्दा मांडला की, सीमा प्रश्नाच्या बाबतीत बाहेरचे वकील देण्यात आलेले आहेत, त्यांची भाषा वेगळी आहे. किंवा सन्माननीय मंत्री श्री. राणे यांनीसुध्दा सांगितले की, या देशाचे माननीय पंतप्रधान सध्या रशियाच्या दौऱ्यावर गेलेले आहेत. माननीय पंतप्रधान दौऱ्यावरुन भारतात परत आल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली सर्व पक्षीय शिष्टमंडळ नेण्यात येईल आणि महाराष्ट्रातील जनतेच्या दोन्ही सभागृहातील भावना त्यांना कळविण्यात येतील तसेच या ठरावाचे गांभीर्यही त्यांच्या लक्षात आणून दिले जाईल. त्याचबरोबर वकिलांच्या संदर्भात जो मुद्दा उपस्थित केला आहे त्या संदर्भात योग्य पध्दतीने लवकरात लवकर ही केस मांडून हा सगळा भाग महाराष्ट्रात कशा पध्दतीने घेता येईल या दृष्टीने प्रयत्न केला जाईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते, या राज्याचे उप मुख्यमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार यांनी मांडलेला हा ठराव योग्य त्या शब्दात असल्याने आणि सर्व सन्माननीय सदस्यांचा त्याला एकमुखी पाठिंबा मिळण्याची आवश्यकता असल्याने या संदर्भात सुरुवातीच्या काळामध्ये मी मांडलेली उप सूचना मी मागे घेतो.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री. नरायण राणे यांनी त्यांच्या भावना व्यक्त करताना, या सदनामध्ये मी तसेच मा. मंत्री श्री. आर.आर.पाटील, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, माणिकराव ठाकरे तसेच सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी जी उप सूचना दिलेली आहे, आम्ही या प्रश्नावर अडथळा निर्माण करीत आहोत, अशा प्रकारची भावना व्यक्त केली. सभापती महोदय, एवढे सगळे सन्माननीय सदस्य ज्या वेळी तीव्रतेने एखादी गोष्ट मांडतात त्यावेळी त्याची कुठे तरी चर्चा झालेली असते. किंबहुना सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी सुध्दा पटकन सांगितले की,होय, अशा प्रकारची उप सूचना असली पाहिजे. आता विधानसभेने अमुक प्रकारचा ठराव केलेला असल्यामुळे विधानपरिषदेत सुध्दा तशाच प्रकारचा ठराव झाला पाहिजे अशा प्रकारचे बंधन आलेले आहे. या सभागृहाची ठाम भूमिका आहे की, 'ते बरखास्त' केले पाहिजे हा शब्द ठरावात असला पाहिजे. कर्नाटकामध्ये सत्तेवर असलेला पक्ष येथील त्यांच्या पक्षाचे काय वाटोळे होईल याचा विचार करीत नाही. मग महाराष्ट्रातील पक्षाने कर्नाटकमध्ये असलेल्या पक्षाची काळजी करण्याकरिता, अशा प्रकारे होऊ नये, म्हणून अशा प्रकारे एकमताने वगैरे वगैरे हा निषेध आम्हाला पसंत नाही. 'बरखास्ती' ही सूचना मी मागे घेण्यास तयार नाही पण जर एकमताने ठराव संमत करावयाचा असेल तर आम्ही सभागृहाच्या बाहेर जातो, मग शासनाने हा ठराव एकमताने मंजूर केला तरी आमची हरकत नाही. कर्नाटक शासनाकडून मराठी भाषिकांची जी छळवणूक होत आहे ती भयानक आहे, त्यांना किमान शाब्दीक टोले मारावयाला सुध्दा आम्ही घाबरत आहोत. कर्नाटक राज्यातील काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष किंवा इतर पक्ष आपली पर्वा करीत नाहीत तर मग आपण त्यांची पर्वा कशासाठी करावयाची? त्यामुळे 'बरखास्ती' हाच शब्द बरोबर आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदय,श्री. आर.आर.पाटील, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी एक पाऊल पुढे टाकले होते. ठीक आहे आपल्या काँग्रेसला पटले म्हणून आपण दिलेली उप सूचना आपण मागे घेतली तो आपला प्रश्न आहे. पण आमची भूमिका ठाम आहे. 'बरखास्ती' हा शब्द ठरावात असावयाला पाहिजे तो आम्ही मागे घेऊ इच्छित नाही.

यानंतर श्री. बरवड....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

जर आपल्याला सर्वानुमते ठराव मंजूर करावयाचा असेल तर आम्ही बाहेर जातो. जर आपण उपसूचनेसह ठराव मंजूर करणार असाल तर आम्ही सभागृहात थांबतो.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, शब्दाचा खेळ, गेली 52 वर्षे तेथील मराठी माणसांची केलेली अवस्था हे सर्व पाहिल्यानंतर आम्ही एखादा शब्द टाकण्यासाठी उपसूचना केली तर बरखास्त हा शब्द नको असे म्हटले जाते. आमच्या महाराष्ट्रातील कोणाच्या तरी भावना दुखावतात. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, आपल्या सगळ्यांचे एकमत असताना या शब्दाला का नको म्हणता हे मला कळले नाही. त्यांनी घटनेला छेद दिला, ते घटनेच्या मुळावर आले असे जेव्हा आम्ही म्हणतो त्यावेळी बरखास्ती त्यामध्ये येत नाही हे आम्हालाही कळते मग तो शब्द घालण्यामध्ये काय अडचण आहे ? म्हणून शिवसेनेचे गट नेते सन्माननीय श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे माझी भूमिका देखील ठाम आहे. अनेक वेळा आपण असे ठराव केलेले आहेत. महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेचे प्रतिनिधी आपण दिल्लीमध्ये केंद्र सरकारकडे पाठवित असतो. आपण एकमताने तशा पध्दतीचा निर्णय घेणार असाल तर त्या निर्णयाशी आम्ही सहमत नाही. आपण आम्हाला परवानगी द्यावी, आम्ही बाहेर जातो.

(सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते व रामदास कदम सभागृहाबाहेर जातात)

**उप सभापती** : आता सन्माननीय सदस्यांनी केलेल्या उपसूचना मी मताला टाकणार आहे. माननीय उपमुख्यमंत्री यांनी मांडलेल्या ठरावाला सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी खालीलप्रमाणे सुधारणा मांडली....

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, त्याची गरज नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपल्या सुधारणा मागे घेतलेल्या नाहीत.

श्री. नारायण राणे : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी आपली सुधारणा मागे घेतलेली आहे.

**उप सभापती** : त्यांनी सुधारणा मागे घेतली परंतु सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व श्री. रामदास कदम यांनी सुधारणा मागे घेतलेली नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : संबंधित सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. आपल्याला जर एकमताने हा ठराव मंजूर करावयाचा असेल तर त्याची नोंद घेण्याची गरज नाही.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, सभागृहात उपस्थित असलेल्या सदस्यांनी मिळून एकमताने ठराव मंजूर करावा.

**उप सभापती** : ठीक आहे. आता मी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेला ठराव मतास टाकतो.

ठराव एकमताने संमत करण्यात आला

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**उप सभापती** : आता शासकीय विधेयके चर्चेला घ्यावयाची काय ? विधेयके दोन मिनिटात होतील.

श्री. चंद्रकांत पाटील : आम्हाला बिलावर चर्चा करावयाची आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उप सभापती** : काही सन्माननीय सदस्य म्हणतात की, यामुळे ठरावाचे गांभीर्य जाईल आणि काही सन्माननीय सदस्य म्हणत आहेत की, आम्हाला बिलावर चर्चा करावयाची आहे.

श्रीमती शोभाताई फडणवीस : विधेयके उद्या घ्यावीत.

श्री. अजित पवार : सन्माननीय सदस्य सोमवार पासून उद्या करु, उद्या करु असे सांगत आहेत.

**उप सभापती** : यानंतर विधानसभेने संमत केलेले सन 2011 चे वि. स. वि. क्र. 48 चर्चेला घेण्यात येईल.

( सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते सभागृहात येतात )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपल्या दालनामध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते, माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित होते. या ठरावानंतर कोणतेही कामकाज करावयाचे नाही असे त्या बैठकीमध्ये ठरले होते.

श्री. अजित पवार : मान्य आहे.

श्री. दिवाकर रावते : आपण एवढ्या किळसवाण्या पध्दतीने सभागृह चालविणार आहात का ?

**उप सभापती** : मी सभागृहाचा सेन्स घेतला.

श्री. दिवाकर रावते : याबाबत तेव्हाच ठरले होते. माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले होते की, या ठरावानंतर कोणतेही कामकाज घेणार नाही. हा शोक आहे, महाराष्ट्राचा आकांत आहे. मराठी माणसाचा आक्रोश आहे. तिकडच्या मराठी माणसावर अन्याय होतो. या ठरावानंतर कामकाज करावयाचे नाही असे आपल्या दालनातील बैठकीत ठरले होते. आपण सांगत आहात की 2 मिनिटात करु या.

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**उप सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या शनिवार, दिनांक 17 डिसेंबर, 2011 रोजी...

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे जे शेवटचे शब्द आहेत ते त्यांना मागे घ्यावयास सांगावेत किंवा आपण रेकॉर्डवरुन काढून टाकावेत. ही भाषा या ठिकाणी चालणार नाही.

श्री. दिवाकर रावते : माननीय उप सभापती म्हणाले की, 2 मिनिटात विधेयक मंजूर करु या. त्या बैठकीमध्ये जे ठरले ते पाळावयाचे नाही का ?

श्री. नारायण राणे : हे सभागृह आहे. या ठिकाणी सभागृहाचीच भाषा वापरली पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : माननीय उप सभापतींबद्दल काही शब्द उच्चारला असेल तर तो मी मागे घेतो.

श्री. नारायण राणे : ठीक आहे.

**उप सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शनिवार, दिनांक 17 डिसेंबर, 2011 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 46 मिनिटांनी, शनिवार, दिनांक 17 डिसेंबर, 2011 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही